# 01 JANUARY

THURSDAY

WEEK 01

DAY 001-364

DATE 01.01.2015

| JANUARY | | | | | | 2015 |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

॥ श्री ॥

08

– स्वरधा आणि संज्ञा –

09

– गीत रामायण –

10

11

12

13

14

15

16

17

18

19

20

© www.madhaveeraghuveer.com

ॐ

08

ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते।
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते॥

09

10

ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः
भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः

11

स्थिरैरङ्गैस्तुष्टुवांसस्तनूभिः
व्यशेम देवहितं यदायुः॥

12

ॐ स्वस्ति न इन्द्रो वृद्धश्रवाः

13

स्वस्ति नः पूषा विश्ववेदाः
स्वस्ति नस्तार्क्ष्यो अरिष्टनेमिः

14

स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु॥
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः

15

ॐ सहनाववतु सहनौ भुनक्तु

16

सहवीर्यं करवावहै।
तेजस्विनावधीतमस्तु

17

मा विद्विषावहै॥

18

सर्वेऽपि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद् दुःखमाप्नुयात्॥

19

20

© www.madhuveer.com

# 03
JANUARY

SATURDAY

WEEK 01

DAY 003-362

DATE 03.01.2015

JANUARY 2015

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

08 वागर्थाविव संपृक्तौ वागर्थप्रतिपत्तये ।
जगतः पितरौ वन्दे पार्वतीपरमेश्वरौ ॥

09

10

11

12

13

14

15

16

17

18

19

20

© www.madhaveeraghuveer.com

## -- संख्या आणि संता --

परमार्थ मार्गावर वाटचाल करत असताना अनेक ठिकाणी मन संभ्रमित होते. मार्ग नीट समजत नाही. दिशांचे भान उरत नाही. किती अंतर चालून आलो आणि पुढे किती अंतर जायचे आहे याचाही नीटसा अंदाज येत नाही. कोणाला विचारायची सोय नसते. कारण ही उत्तरे ज्याची त्यानेच शोधायची असतात. प्रत्येक वेळेस मार्गदर्शक गुरु भेटतीलच असे नाही. आणि जरी भेटले तरी त्यांच्या साऱ्या वचनांवर विश्वास ठेवता येईलच असेही नसते. कारण हा मार्ग निसरडा आहे. चुकीच्या व्यक्तीच्या मागोमाग गेल्याने भरकटण्याचीही शक्यता असते. मग शेवटच्या, सर्वश्रेष्ठ पदापर्यंत पोहोचणार तरी कसे?

इथे प्रत्येकाची प्रश्नपत्रिका वेगळी आहे. त्यामुळे Copy करायलाही इथे वाव नाही. आणि दुसऱ्यांचे प्रश्न सोपे वाटतात आणि आपलेच प्रश्न कठीण वाटतात, हे या परमार्थमार्गाचे वैशिष्ट्य आहे. अगदी आपल्या जवळच्या व्यक्ती म्हणजे आई-वडील, भाऊ बहीण, पती पत्नी, मित्र हितचिंतक देखील प्रत्यक्ष मदत करू शकत नाहीत. आपला मार्ग आपणच शोधायचा. त्या मार्गातील वेडीवाकडी वळणे, खड्डे, खडबडीत रस्ता आपणच जाणून घ्यायचा आणि त्यावरचे उपायही आपणच शोधायचे. कारण या परमार्थ मार्गावरील अंतिम मुक्काम आहे आत्मज्ञान! आणि आत्मज्ञानाचा मार्ग आहे तो स्वसंवेद्य आहे. ज्याचा त्यानेच तो शोधायचा आहे परंतु हा प्रवास आहे तो अज्ञाताकडे जाण्याचा आहे. व्यक्ताकडून अव्यक्ताकडे, सगुणाकडून निर्गुणाकडे, साकाराकडून निराकाराकडे, अंधाराकडून प्रकाशाकडे, स्थूल सूक्ष्म अज्ञानाकडून ज्ञानाकडे जायचे आहे. जन्ममृत्यूच्या चक्रातून मुक्त होऊन त्या सर्वश्रेष्ठ, सर्वोत्कृष्ट, सर्वशक्तिमान, सर्वव्यापी, सर्वगामी परब्रह्मापर्यंत पोहोचायचे आहे. नुसते पोहोचायचे नाही तर त्याच्यामध्ये तद्रूप व्हायचे आहे. तदाकार व्हायचे आहे. देवरूप व्हायचे आहे.

© www.madhaveeraghuveer.com

पण हा प्रवास, ही वाटचाल देखील आपल्या हातात नाही. कारण स्वतःच्या अस्तित्वाचा, अहंकाराचा, मीपणाचा विसर पडल्याखेरीज तद्रूप होणे केवळ अशक्य आहे. माझ्यातील 'मी' चा निःशेष निरास झाल्याखेरीज ब्रह्मरूप होणे केवळ अशक्य आहे. आणि म्हणूनच त्या जगन्नियंत्याकडे प्रार्थना करायची---

असतो मा सद्गमय।
तमसो मा ज्योतिर्गमय।
मृत्योर्मा अमृतं गमय।

या प्रार्थनेमध्ये मी अंधाराकडून प्रकाशाकडे जातो किंवा जाईन म्हटलेले नाही. तर तू मला ने असे म्हटले आहे. जेव्हा कर्ता करविता केवळ तोच आहे असा विश्वास ठामपणाने अंतःकरणात ठसतो तेव्हाच मग आपोआप कर्तृत्वाचा आणि भोक्तृत्वाचा अभिमान गळून पडतो. पूर्ण शरणागतीचा भाव आतून दाटून येतो. डोळ्यातून अश्रू वाहू लागतात, कायेला कंप सुटतो आणि मुखातून सहजच असे शब्द उमटतात. अन्यथा तो केवळ शाब्दिक कसरत ठरते. या शब्दजालात न अडकता भावभक्तीच्या बळावर हा परमार्थ मार्ग आचरायचा आहे.

परंतु त्यासाठी ज्या गावाला पोहोचायचे आहे त्या गावाचे निदान नाव तरी ठाऊक असायला हवे आणि मार्गाची दिशा तरी माहिती हवी. या रस्त्यावर लागणारी गावे किंवा मैलाच्या दगडांची तोंडओळख तरी असायला हवी. या अध्यात्ममार्गावरील अधिकारी व्यक्ती जे अगम्य शब्द उच्चारतात त्यामुळे सामान्य माणूस भांबावतो, गांगरतो आणि गोंधळून जातो. ८४ लक्ष योनी, ३३ कोटि देव, ७२ हजार नाड्या। ३६ तत्वांचा देह, पंच कोश, पंच क्लेश, साधन चतुष्टय या संज्ञा ऐकूनच घाबरायला होतं. याच संख्या व तत्वांचा परिचय आपण करून घेणार आहोत. त्यातील खाचा खोचा, सगुण-निर्गुण सिद्धांत, उपासना मार्ग देखील जाणून घेणार आहोत. त्यापूर्वी परमार्थ मार्ग म्हणजे काय? हे पाहणार आहोत.



© www.madhaveeraghuveer.com

परमार्थ अध्यात्म म्हणजे काय? कुणी? कशासाठी करावे? त्याने काय होते? भोंदू (धार्मिक) साधू, बुवाबाजी, पुजाऱ्यांची लागणूक, याला अध्यात्म म्हणायचे का? संतांचा उपदेश अध्यात्माला कल्याणासाठी [illegible] पटते - - - - -

परमार्थ - अर्थ म्हणजे धन हा झाला लोकप्रिय अर्थ। परंतु 'अर्थ'चा खरा अर्थ आहे प्राधान्य। विद्यार्थी, धनार्थी, दुग्धार्थी, मोक्षार्थी यातून हा अर्थ स्पष्ट होतो.

आणि याच प्राधान्याला परम हा शब्द जोडला की परमार्थ होतो. परम म्हणजे श्रेष्ठ, सर्वोच्च। मानवदेह प्राप्त झाल्यानंतर प्राधान्य (Priority basis) द्यायचे ते कशाला? तर परमार्थाला! मुख्य ध्येय तेच असायला हवे! ते प्राप्त करताना इतर गोष्टींना दुय्यम। गौण स्थान द्यायचे. म्हणजे मिळाले तरी ठीक आणि नाही मिळाले तरी ठीकच म्हणायचे। यदृच्छालाभसंतुष्टो असे रहाता यायला हवे. प्रमुख ध्येयाशी कधीच तडजोड करायची नाही. तिथपर्यंत पोहोचता यायलाच हवे. - मनका हो तो अच्छा। मनका ना हो तो और भी अच्छा।

आणि या Ultimate Destination पर्यंत जाण्यासाठी एक अतिशय उत्तम Instrument (साधन) आपल्याला मिळाले आहे. ते म्हणजे हा सुदृढ असा नरदेह! या नरदेहाचे वैशिष्ट्य असे की या नरदेहातूनच परमेश्वरप्राप्ति करून घेता येते.

धन्य धन्य हा नरदेहो। याचा अपूर्वता पाहो।
जो जो कीजे परमार्थलाहो। तो तो पावे सिद्धीते॥

१. परमार्थ - श्रेष्ठ ज्ञेय वस्तु
२. निरतिशय धनार्थ
३. अनुपमेय ध्येय
४. संपूर्ण मूल्यवान

परंतु मनुष्याला नेमका याचाच विसर पडतो आणि क्षुल्लक किंवा नाशिवंत गोष्टी मिळवण्यात त्याचे आयुष्य वाया जाते

कबीर -

© www.madhaveeraghuveer.com

आणि माणसाचा असा गैरसमज आहे की परमार्थ साधण्यासाठी प्रपंचाचा त्याग करावा लागतो. आणि माणसाला तर प्रपंच, घरदार, पत्नी - मुले, सगेसोयरे अत्यंत प्रिय असतात आणि म्हणूनही तो परमार्थाकडे फारसा वळत नाही. वास्तविक पाहता प्रपंच आणि परमार्थ या दोन भिन्न जीवनपद्धती नाहीत तर एकाच अखंड जीवनाकडे पाहण्याच्या त्या दोन भिन्न दृष्टी आहेत. आपले स्वरूप असणाऱ्या आत्म्याची विस्मृती झाल्याने या सर्व समस्या निर्माण झाल्या आहेत. नाशिवंत गोष्टींच्या मागे लागल्याने अविनाशी तत्त्वाचा विसर पडला आहे. विवेकाने शाश्वत-अशाश्वत याचा निवाडा होतो. असत्य सोडून सत्याचाच पाठपुरावा करावा हा विचार प्रबळ होतो.

समजा आपल्याला काही वर्षांच्या करारावर (१०० वर्षे) सुपीक जमीन मिळाली आहे. मर्यादा संपल्यानंतर मात्र ती जप्त होणार आहे. परंतु जोवर तुझ्या अधिकारात आहे, तोवर हे मना, तू पूर्ण जोर लावून भरपूर पीक घे ना!

मन रे कृषिकाम जाणेना
ए मन मानव जमिनी रहली पडित!
आबाद करिले तो सोना॥

मना, तुला शेती कशी करावी ते अवगत नाही. ही मानवदेह रूपी सुपीक जमीन पडीकच ठेवलीस. तू केवळ मशागत केली असतीस तर सोने पिकले असते ना!

संत असा तळमळीने उपदेश करत असतात. त्यांना माणसांची ही बेपर्वाई बघवत नाही. ज्या प्रपंचात मनुष्य सुख शोधत असतो ते सुख त्याला गुंगारा देते. ते कायम टिकत नाही. आणि त्या उलट परमार्थ मात्र चिरंतन, अपरिमित अमर्याद सुख देतो आणि नेमका तिथेच सामान्य मनुष्य पाठ फिरवतो. अशा अज्ञानी जनांना संत समजावून सांगतात. कालांतराने त्याला जाग आल्यावर तरी उपयोग व्हावा म्हणून ग्रंथ लिहितात. काही श्रद्धावान माणसे असे ग्रंथ वाचतात. त्यातून थोडे फार समाधान मिळते परंतु पूर्ण अर्थबोध होत नाही. कारण भक्तिशास्त्राचे उपसिद्धांत व प्रक्रिया त्यांना ठाऊक नसते. पारमार्थिक ग्रंथांमध्ये सगुण - निर्गुण



© www.madhaveeraghuveer.com

विवेक-वैराग्य, साधना-उपासना, धर्म-अधर्म, ज्ञान-कर्म अशा संज्ञा वारंवार येतात. त्याचप्रमाणे अनेक संख्याही सांगितल्या जातात. अनुबंध चतुष्टय, चौदा भुवने, षडलिंगे यांचा वरवर अर्थ माहीत असतो परंतु अचूक आणि सखोल अर्थ जाणून घेण्यासाठी साधक उत्सुक असतो. आणि अशा संख्या व संज्ञा सर्वच आध्यात्मिक ग्रंथांमधून भेटत असतात. एकदा की त्या नीट समजल्या की कोणताही ग्रंथ कठीण वाटणार नाही. मग तो योगवासिष्ठ असो किंवा विवेकचूडामणि, पंचदशी असो की श्रुतिग्रंथ / आपल्याजवळ Master key असली की सगळी कुलुपे सहजतेने उघडतात. तशाच या संख्या / संज्ञा आणि त्यामागील संकल्पना / सिद्धांत समजला की सगळे सोपेच होऊन जाते.

अध्यात्मात संख्येला जरी महत्त्व असले तरी त्याला संख्यांच्या मर्यादेमध्ये बांधता येत नाही. सोयीसाठी जरी विचारवंतांनी संख्याशास्त्रानुसार मांडणी / विभागणी केली असली तरी ते परब्रह्म / परमात्मा / परमेश्वर हा अमर्याद आहे. संपूर्ण ब्रह्मांडाला व्यापून तो पुन्हा उरला आहे आणि अशी ब्रह्मांडे तरी किती आहेत? तर अनंत कोटि ब्रह्मांडे आहेत. या अनंत कोटि ब्रह्मांडापासून प्रारंभ करून आपल्याला शून्यापर्यंत पोहोचायचे आहे. म्हणजेच मोठ्या संख्येपासून (Infinite) अगदी शून्यापर्यंत हा प्रवास आहे. वाटेत लागणाऱ्या संख्या हे मैलाचे दगड आहेत. त्यावरून आपण योग्य मार्गावर आहोत ना एवढेच तपासून पहायचे आहे. नाही तर, खरे म्हणजे ही वाटचाल शून्यापासून शून्यापर्यंत आहे.

या अध्यात्ममार्गामध्ये कितीतरी प्रकरण ग्रंथ, चरित्रे, स्तोत्रे, पोथ्या, पुराणे, आरत्या अशा वाङ्मय प्रकारांशी आपला परिचय होत जातो. असेच मला आढळलेली सर्वात मोठी संख्या आहे. १८ पद्मे वानर किरीती भुभुःकारी। श्रीरामाच्या सहाय्यार्थ जी सेना होती त्याचे संख्याबळ होते १८ पद्म / रामरावणयोर्युद्धं रामरावणयोरिव / महाभारतातील धर्मयुद्धापेक्षा देखील संख्येने विराट असणारी हा वानरसेना

© www.madhaveeraghuveer.com

यानंतरचा उल्लेख आढळतो तो दासबोधातील संख्या छप्पन्न कोटि वसुंधरा! छप्पन्न कोटि योजने इतका जिचा व्यास आहे ती पृथ्वी! इतकी विशाल, इतकी बहुरत्ना, बहुप्रसवा, क्षमेची मूर्ति असणारी, अनेक चराचर वस्तूंना आधार देणारी ही वसुंधरा! हिचा असाच उल्लेख भागवतात देखील आढळतो.

आणि यानंतरची मोठी संख्या तर आपण आपल्या शरीरावर बाळगून असतो. सुमारे साडेतीन कोटि केस मानवी शरीरावर असतात, असे धर्मशास्त्र सांगते. (रेघे)

तिस्रः कोट्योऽर्धकोटी च
यानि लोमानि मानवे।

याखेरीज सर्वपरिचित आणि वारंवार कानावर पडणारा शब्द म्हणजे ८४ लक्ष योनी! सगळेच संत सांगतात की हा ८४ चा फेरा चुकवायला पाहिजे म्हणजेच या जन्म-मृत्यूच्या चक्राला कुठेतरी रोखायला पाहिजे. नाहीतर मग जन्मानंतर मृत्यु आणि मृत्युनंतर पुन्हा जन्म हे चक्र सुरूच राहील. या चक्रात फिरून फिरून जीवात्मा व्यर्थ क्षीण होतात आणि मोक्षवैभव प्राप्त करण्याचे राहूनच जाते. या ८४ लक्ष योनि तरी कोणत्या? ग्रंथराज दासबोधामध्ये याचे उत्तर मिळते.

जलजा नवलक्षाणि दशलक्षाणि पक्षिणः।
रुद्रलक्षाणि कृमयः स्थावराणां च विंशतिः।
त्रिंशल्लक्षं गवादीनां चतुर्लक्षाणि मानवाः॥

| | |
|---|---|
| जलचर - ९ लक्ष | पक्षी - १० लक्ष |
| कीटकसृष्टी ११ लक्ष | वनस्पती २० लक्ष |
| पशु ३० लक्ष | मानव - ४ लक्ष |

Head Quarter

मानवी शरीरात नाभिस्थानाच्या जवळ मूळ केंद्र आहे. तिथून ७२,००० नाड्या निघतात. व सर्व देहाचा कारभार व्यवस्थित सांभाळतात. या नाड्यांना 'दिना' असे म्हणतात. यांच्याविषयीचे ज्ञान आमच्या ऋषींना फार पूर्वीपासून होते.

प्रश्नोपनिषदामध्ये आणि बृहदारण्यकाच्या प्रथम ब्राह्मणामध्ये यांचा उल्लेख आहे. या शरीरशास्त्राचा इतका अचूक अभ्यास त्यांनी कसा केला असेल? त्यावेळी कोणतीही अत्याधुनिक उपकरणे नव्हती. X-Ray मशीन नव्हते, सोनोग्राफी नव्हती अशा वेळी मानवी शरीरातील गुंतागुंतीची रचना ऋषींनी शोधून काढली. त्यात होणारे बिघाड म्हणजेच रोग तर शोधून काढलेच. पण त्यावरील उपाय देखील त्यांना माहिती होते. यासाठी लागतो तो सूक्ष्म विचार, तरल भूमिका, जिज्ञासु वृत्ती आणि मानवी कल्याणाची तळमळ! आणि हे सर्व करत असताना कोणालाही इजा न करता, कोणत्याही प्रकारची हिंसा न करता, सर्वश्रेष्ठ जगदीश्वराची सत्ता मान्य करून, त्याच्या अस्तित्वाचा मान राखून! या सृष्टीचक्रामध्ये कोणताही अडथळा न आणता, त्याची गती अबाधित राखत कितीतरी संशोधन केले आहे आमच्या ऋषींनी! नैसर्गिक रीत्या मृत झालेल्या मानवी शरीराला मध्यवर्ती ठेवून त्यावरील निरीक्षणे नोंदवून हा अभ्यास वर्षानुवर्षे केला गेला आहे. परंतु तेही मानवी देहाचे विच्छेदन न करता! पूर्णपणे नैसर्गिक पद्धतीने! या कामी वेगाने वाहणाऱ्या नद्यांच्या खळखळाटाचा स्वाभाविक उपयोग करून घेतला गेला. जिथे प्रवाहाला जोर आहे जिथे प्रपाताप्रमाणे पाणी कोसळते आहे अशा ठिकाणी एखाद्या खडकाला हा देह बांधून ठेवला जात असे आणि बऱ्याच काळानंतर पाण्याच्या जोरदार माऱ्याने जेव्हा त्यातील रक्त, मांस, चर्म देहापासून अलग होई आणि केवळ अस्थि मज्जा युक्त देह शिल्लक रहात असे तेव्हा तो बाहेर काढून त्याचा शास्त्रशुद्ध रीतीने अभ्यास केला जाई. आज आधुनिक साधनांच्या कसोटीवर तपासून पाहिले असता ही निरीक्षणे अचूक आढळतात. तेव्हा आमची मान अभिमानाने उंचावते. खगोलशास्त्राच्या निरीक्षणाबाबतही हेच सांगता येईल.

# एकादशी

ज्ञानेश्वर माऊलीने सर्वप्रथम भूगोल हा शब्द उपयोगात आणला आहे. अशी कितीतरी संशोधने आपल्या ऋषी-मुनींनी जगासमोर आणली आहेत. त्यांच्या उत्सुकतेला, जिज्ञासु वृत्तीला, सखोल अभ्यासामुळे, बारकाईने निरीक्षण करुन कितीतरी क्रांतिकारी शोध लावले आहेत. अर्थात या सर्वाला अधिष्ठान आहे ते सर्वशक्तिमान परमेश्वरावरील श्रद्धेचे! त्याची कृपा असल्यावरीज कोणतेही कार्य पूर्णत्वाला जाणे कठीण आहे. अगदी आजच्या आधुनिक युगात देखील वेळोवेळी याचा प्रत्यय आपल्याला येतच असतो. जे काही घडत ते त्याच्या सत्तेनेच घडत असते. मात्र त्याच जोडीला मनापासून, योग्य दिशेने प्रयत्न करणाऱ्यांच्या पदरात मात्र तो यशाचे पुरेपूर माप घालत असतो. यासाठी माणसाने नेहमी त्याच्याविषयी कृतज्ञता बाळगायला हवी. पूजा-अर्चा, उपास-तापास, ध्यान-धारणा साधना-उपासना, यांच्या माध्यमातून त्याला प्रसन्न ठेवायला हवे. परमेश्वर प्रसन्न असेल तर ही सृष्टी बहरलेली आणि माणूस तृप्त राहील. परस्परांना संतुष्ट ठेवायला हवे.

आणि यासाठी सोपा मार्ग म्हणजे आपली ११ इंद्रिये विषय-उपभोगात न गुंतवता ती ईश्वराकडे न्यावयाची. होय. आज आपण ११ या संख्येचा अधिक विचार करणार आहोत. ५ ज्ञानेंद्रिये ५ कर्मेंद्रिये आणि मन ही परमेश्वराकडे वळवणे हीच खरी एकादशी आहे. त्याचबरोबर उपवासाचा देखील Scientific दृष्टीने विचार केला तरी लाभदायक ठरतो. शरीर हलके असेल तर देखील तरतरी येते. अत्यंत अल्प आहार वा फलाहाराने हे साध्य होऊ शकते. त्यातही जर ३६ तास पोट रिकामे ठेवता आले तर ध्यानधारणा उत्तम साधता येते. एकादशीच्या दिवशी पृथ्वीचा नियत अक्षाशी एक विशिष्ट कोन होत असतो. त्यामुळे सर्वच अवयवांना अनुकूल दिशा मिळते आत उघडणारी दारे सहजतेने मोकळी होऊ शकतात. म्हणून महिन्यातून दोनदा जर कमीत कमी ३६ तासांचा उपवास साधता आला तर Autophagy साधता येते आणि त्यातून



©www.madhaveeraghuveer.com

कॅन्सरशी लढा देणाऱ्या पांढऱ्या रक्तपेशींमधील T-cells activate होतात व रोगाचा धोका टळतो. जगात रोगजंतू असंख्य आहेत. आपण आपली प्रतिकारशक्ती मजबूत राखली तर कोणत्याही विषाणूशी लढा देता येतो. त्याला जोडीला नामस्मरण असेल तर उत्तम।

जय जय रघुवीर समर्थ। (११ मारुति) (११ रुद्र)

हा मंत्रदेखील अकरा अक्षरांचा आहे. म. गांधीजींनी आपल्या नित्य प्रार्थनेत सांगितलेली ११ तत्वे ही त्यांचा जीवनपट उलगडून दाखवणारी आहेत.

अहिंसा सत्य अस्तेय ब्रह्मचर्य असंग्रह
शरीरश्रम अस्वाद सर्वत्र भयवर्जन
सर्वधर्मसमानत्व स्वदेशी स्पर्शभावना
ही एकादश सेवो मी नम्रत्वे व्रतनिश्चये।
(ही एकादश सेवावी नम्रत्वे व्रतनिश्चये॥)

११ ही संख्या माया ब्रह्माचे ऐक्य दर्शविणारी आहे. कारण यात मागे पुढे एकच आहे. जीव शिव / शिव-शक्ती / गुरुशिष्य, देव-भक्त / सगुण-निर्गुण /

ईशप्रार्थनेने ११ गोष्टी साध्य होतात ---- (~~[illegible]~~)

१. श्रद्धा २. मेधा ३ यश ४. प्रज्ञा
~~५. तारुण्य ६. तेजस्वी वर्ण ७. आरोग्य ८. इंद्रियबल~~
~~९. वाक्‌सिद्धि १०. वीर्यसंपन्नता ११. उत्कृष्ट कीर्ति.~~
५ विद्या ६. बुद्धि ७. श्री ८. बल
९. आयुष्य १० तेज ११. आरोग्य

रसायनाने प्राप्त होणाऱ्या ११ गोष्टी ---- (वाग्भट)

१ दीर्घायुष्य २. स्मरणशक्ती ३. धारणा ४. आरोग्य
५. तारुण्य ६. तेजस्वी वर्ण ७. उत्तमस्वर ८. इंद्रियबल
९. वाक्‌सिद्धि १०. वीर्यसंपन्नता ११. उत्कृष्ट कीर्ति

काळाचे ११ विभाग आहेत १. निमेष २. काष्ठा ३. कला ४. मुहूर्त ५. अहोरात्र ६. पक्ष ७. मास ८. ऋतु ९. अयन १० संवत्सर ११. युग ----



© www.madhaveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

99

कालमापनाची अचूक पद्धति - Fraction of second
आणि युगानाची कल्पना होती. ज्ञानाच्या कितीतरी शाखा
ते जाणत होते. खगोल, ज्योतिष, शरीरशास्त्र, धातुशास्त्र,
जीवशास्त्र, औषधयोजना, वनस्पति, शल्यकर्म - - -
परंतु या सर्वांपेक्षा श्रेष्ठ असणारे ज्ञान उपनिषदामध्ये आहे
ते म्हणजे आत्मज्ञान! उपनिषदे (प्रमुख) ११ आहेत.
ईश, केन, कठ, प्रश्न मुंडक, मांडूक्य, ऐतरेय, तैत्तिरीय, श्वेताश्वतर,
छांदोग्य, बृहदारण्यक - - -

उपनिषद या शब्दाचे अर्थ - (१) आत्मबल (२) उत्थान
(३) ब्रह्मचर्य (४) गुरुसेवेत देह झिजवणे (५) गुरुसान्निध्य
(६) जीवननिरीक्षण (७) श्रवण (८) मनन (९) अवबोधन
(१०) आचरण (११) अनुभूति

Decentra

मंत्रिमंडळ
शरीर संरक्षक नगरीची ११ स्थाने — १. मेंदू - पंतप्रधान
२. लहान मेंदू - उपपंतप्रधान
(३) कान - नभोवाणी मंत्री
४. त्वचा - संरक्षणमंत्री
५. पाय - दळणवळण
६. पोट - अन्नधान्य
७. मस्तक - जागृत
८. बुद्धी - शिक्षणमंत्री
९. हृदय - अर्थमंत्री
१०. नाक - आरोग्यमंत्री
११. फुफ्फुस - गृहमंत्री

२ नाकपुड्या २ डोळे २ कान, मुख — उत्सर्गी
~~नाभि~~, शिश्न, गुद
नाभि, ब्रह्मरंध्र (नंदद्वार, विदृतिद्वार) जन्मतः बंद होऊन जाते.

सात्त्विक शुद्ध आहार - १. मैत्र्य २. यवागु ३ ताक ४. दूध
५. साजूचा पदार्थ ६. सातू ७. ज्वारी ८ मूग ९. जव
१० राळे ११ पेंड - योग्यांना सिद्धी प्राप्त करून देणारे पदार्थ.
यावर Negative energy काम करू शकत नाही.

© www.madhaveeraghuveer.com

॥ श्री ॥

७२,००० नाड्यांमध्ये प्रमुख तीन आहेत - इडा, पिंगळा, सुषुम्ना---

कुंडलिनी जागृत होते, तेव्हा शरीराची स्थिती सम हवी. समकायशिरोग्रीवं धारयन्नचलं स्थिरः। म्हणजेच संपूर्ण देह एका सरळ रेषेत हवा.

शरीर — मन — मस्तक - तरच ही अद्भुत अनुभूति घेता येऊ शकते. शरीराला अशा ताठ स्थितीत बसण्याची सवय लावायला हवी. आणि कोणतीही गोष्ट सवयीने साधता येते. २१ दिवस कोणतीही गोष्ट सातत्याने करत गेले तर त्याची सवय होते. पुनः पौन्येन कुर्वन्ति इति अभ्यासः। अखंडता, दीर्घकालता व श्रद्धा ही अभ्यासाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत आणि अभ्यासाने असाध्य असणाऱ्या गोष्टी साध्य होऊ शकतात.

असाध्य ते साध्य करिता सायास।
कारण अभ्यास तुका म्हणे।

अशाच प्रकारे नैसर्गिक असणाऱ्या एका क्रियेमध्ये जर आपल्याला नियमितता आणता आली तरी काही अंशी विकारांवर मात करता येईल आणि ती आहे श्वासोच्छ्वास।

जिवंत असल्याची एक खूण म्हणजे श्वास चालू असणे-- श्वास चालू आहे तोवर जीवन आणि श्वास संपला म्हणजे मृत्यु अशी साधी सरळ सोपी व्याख्या असली तरी ती केवळ इतरांना समजण्यासाठी एक खूण आहे. ऐतरेय उपनिषदामध्ये याचे सुस्पष्ट विवरण आले आहे.

'वास्तविक मी जिवंत आहे' ही गोष्ट काही सिद्ध करावी लागत नाही. मी आहे हे मी जाणते. परंतु कित्येकदा स्वतःची खात्री असूनसुद्धा इतरांना स्पष्ट होण्यासाठी काही गोष्टी कराव्या लागतात. शरीरामध्ये पंच प्राणांचे कार्य चोख सुरु आहे हे समजण्याची श्वास ही खूण आहे. पूर्वी प्रतिष्ठित, सन्माननीय व्यक्तींच्या दाराबाहेर त्यांच्या नावाची पाटी असायची आणि त्यापुढे एक खटका असायचा आहेत/नाहीत. विशेषतः डॉक्टर, वकील, मंत्री - - -

© www.madhaveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

त्यावरून ते साहेब घरात आहेत किंवा नाहीत याचा बोध इतरांना व्हायचा व त्याप्रमाणे कामाची तयारी करता यायची. श्वास हा तसाच सूचक आहे. श्वास सुरु आहे याचाच अर्थ प्राणाचे कार्य सुरळीतपणे सुरु आहे. परमेश्वरी योजनेचाच हा एक भाग आहे. माणूसही निसर्गात पाहूनच कितीतरी गोष्टी शिकत असतो. खरं पाहिलं तर आपण स्वयंपाकासाठी जो Gas वापरतो त्या गॅसला स्वतःचा असा वास नाही. तो निर्गंध आहे. वासरहित आहे परंतु जर यदाकदाचित तो Leak झाला तर त्याचा अंदाज यावा, दुर्घटना टळावी याकरीता त्यामध्ये मुद्दाम, जाणीवपूर्वक एक उग्र गंध मिसळला जातो.

आपल्या श्वासाचेही तसेच आहे. आपण तज्ञांचा अभ्यास करत आहोत. दिवसभरात म्हणजेच 24 तासात सर्वसाधारण निरोगी मनुष्य 21,600 वेळा श्वास घेतो व सोडत असतो. याचाच अर्थ दर मिनिटाला 15 श्वासोच्छ्वास होतात. प्रत्येकाचे श्वास ठरले आहेत. श्वास मोजूनच आपल्याला या जगामध्ये धाडले आहे. त्यामध्ये आपण फेरफार करु शकत नाही. मग आहे तेच श्वास व्यवस्थित पुरवून पुरवून वापरले तर? प्रत्येक श्वास हा अनमोल आहे. त्याची उधळपट्टी करायची नाही. जे मिळाले आहे ते जपून वापरायचे. अन्न, पाणी, संपत्ति आणि श्वासदेखील!

आपण जेव्हा रागावतो तेव्हा आपला श्वास शीघ्र गतीने, भरभर होत असतो आणि तेच जेव्हा आपण शांत असतो तेव्हा श्वासाची गती शांत, संथ असते. क्रोधावर नियंत्रण आणणे कठीण वाटत असेल तर आपण उलट्या क्रमाने जावे.

क्रोध आल्यावर जर श्वास जलद होत असेल तर श्वास संथ केल्यावर आपले मन शांत होऊ शकेल का? यावर प्रयोग केले गेले आणि त्याचे उत्तम Results ही मिळाले. स्वभावाला औषध नाही असे सर्वसाधारणपणे मानले जात असले तरी आमच्या ऋषी-मुनींनी स्वभाव आटोक्यात आणणे शक्य आहे हे प्रयोगाने सिद्ध केले. प्राणायामाने सवयीने, सातत्याने

हे शक्य होऊ शकते. श्वासाची गती कमी करता येते. याचाच अर्थ एका मिनिटात भरभर, घाईघाईने श्वास-उच्छ्वास करण्यापेक्षा हळके हळके ही गती संथ करता येते. संथ श्वासाबरोबर वृत्तींचे तरंगही कमी कमी होतात. आणि चित्तवृत्ती कमी झाल्या की क्षोभ होत नाही आणि मनाला मग एक प्रकारच्या शांतीचा, प्रसन्नतेचा अनुभव येतो.
वृत्ती निवळल्या प्रसन्न चित्ताची एकाग्रता वाढते आणि बुद्धि तल्लख होते.

प्रसाद [illegible]

प्राणायाम करण्यासाठी सर्वोत्तम काळ म्हणजे ब्राह्ममुहूर्त! सूर्योदयापूर्वी दीड घटकांपासून ते सूर्योदयानंतरचा काही काळ हा अतिशय योग्य असतो.
वातावरण आल्हाददायक असते. सर्वत्र नीरव शांतता असते बाह्य जगातील धकाधकी अजून सुरू झालेल्या नसतात. आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे वारा पडलेला असतो. वाहणे हा वायूचा स्वभाव असला तरी या काळात वायूचे वाहणे कमी असते. आणि आपले मन हे तर वायुरूप आहे आणि म्हणूनच बाहेरच्या निश्चलतेचा आंतरिक मनाच्या निश्चलतेवर आपसूकच परिणाम घडतो आणि अशा वेळी चंचल मन निश्चल / स्थिर होते एकाग्र होते. निर्विचार अवस्था काही काळापुरती तरी प्राप्त करता येते. आणि अशा वेळी केलेली साधना ही परमेश्वरी कृपाप्रसाद घेऊन येते त्यामुळे ती लवकर फलद्रूप होते. आणि त्यामुळेच आजच्या २१,६०० श्वासांचा हिशोब आपणच आपल्याला द्यायचा आहे. या अनमोल देणगीचा उपयोग आपण किती व कसा केला असा प्रश्न आपणच आपल्याला विचारायचा आहे. प्रत्येक नवा दिवस नवे श्वास घेऊन येत असतो.

Wake up with determination &
Go to bed with Satisfaction !!



© www.madhaveeraghuveer.com

08 यानंतरची संख्या आहे सहस्र। १०००
काही ठिकाणी ही संख्या अनेकपणाने वापरली
09 जाते. तर क्वचित्कदा ती उपलक्षणा म्हणून उपयोगात
आणली जाते. जेव्हा सहस्ररश्मि सूर्य असे म्हटले जाते
10 तेव्हा त्याची किरणे केवळ हजार नाही तर हजारो
असतात. सूर्य हा धगधगीत तप्त वायूचा गोळा आहे.
11 त्यांच्या केंद्रबिंदूपासून किती रेषा काढता येतील. त्या
वर्तुळाच्या त्रिज्या किती असतील? तर असंख्य, अगणित!
12 अनंत! अपरिमित! पण म्हणूनच मोजता न येणाऱ्या या
अर्थाने त्याला सहस्ररश्मि म्हटले आहे. आणि हेच वर्णन
13 पुरुषसूक्तामध्ये देखील त्या विराट पुरुषाचे आले आहे.
◎ सहस्रशीर्षा: पुरुषः। इथे देखील त्याच्या हजारो मस्तकांचे
14 वर्णन येते. किंवा भगवद्गीतेतील ११ व्या अध्यायात.
सहस्र असा उल्लेख नसला तरी सर्वतः पाणिपादं तत्
15 सर्वतोऽक्षिशिरोमुखम्। असे सांगताना एक प्रकारे
मोठी संख्या गृहीत धरली आहे. किंवा अनंत रूपाचे
16 स्तवन करताना — नमोऽस्त्वनन्ताय सहस्रमूर्तये।
सहस्रपादाक्षिशिरोरुबाहवे। सहस्रनाम्ने पुरुषाय शाश्वते।
17 सहस्रकोटि युगधारिणे नमः। असा स्पष्ट उल्लेख आढळतो.
मात्र शब्दशः अर्थ न घेता एक मोठी संख्या एवढाच अर्थ
18 त्यातून घ्यायचा। हरवलेली वस्तु शोधताना —
कार्तवीर्यार्जुनो नाम राजा बाहु सहस्रवान्।
19 यस्य स्मरणमात्रेण गतं नष्टं च लभ्यते।
आपल्या आराध्यदेवतांचे स्तवन करताना देखील त्यांची
20 सहस्र नावे उच्चारण्याचा परिपाठ आहे. विष्णु, गणेश, ललिता —
अथर्वशीर्षाचे सहस्रावर्तन करतात.
सहस्रभोजनाची प्रथा।

◎ ॐ सहस्रशीर्षा पुरुषः। सहस्राक्षः सहस्रपात्।
स भूमिं विश्वतो वृत्वा अत्यतिष्ठत् दशांगुलम्॥

© www.madhaveeraghuveer.com

दशांगुळे म्हणजे देखील खरोखरी दहा बोटे नाहीत तर ती बोलण्याची एक पद्धत आहे. मात्र आज आपण मात्र दहा या संख्येबद्दलच बोलणार आहोत.

(१) यापैकी सर्वांना परिचित असणारे दशावतार
मत्स्य, कूर्म, वराह, नृसिंह, वामन, परशुराम, श्रीराम
श्रीकृष्ण, बुद्ध, कल्कि

उत्क्रांत होत जाणाऱ्या या अवतारांचे साम्य डार्विनच्या उत्क्रांतिवादाच्या सिद्धांताशी जोडला येतो.

या दहा अवतारांचे वर्णन पुराणामध्ये तसेच भागवतामध्ये आढळते. अध्यात्माच्या वाटचालीमध्ये असे अनेक ग्रंथ आढळतात. त्यापैकी प्रमुख १० ग्रंथ मानले जातात. अशा दहा ग्रंथांच्या अभ्यासकांना दशग्रंथी

(२) ब्राह्मण म्हणतात. १. संहिता २. ब्राह्मण ३. आरण्यक
४. निघंटु ५. शिक्षा ६. कल्प ७. व्याकरण ८. निरुक्त
९ छंद १० ज्योतिष

ग्रंथ संकलन Script | शतपथ ब्राह्मणे | अरण्यात राहून एकांतात केलेल्या चिंतनाचे ग्रथित सार | निघंटु - आहार, आयुर्वेद भावप्रकाश
~~[illegible]~~ा - वारि वर्ग

अल्पमनुपानं विपर्यस्तेऽन्नं निरनुपानात् स एव दोषः ।
तस्मान्नरो वह्निविवर्धनाय मुहुर्मुहुर्वारि पिबेदभूरि ॥

आरण्यक - कर्मकांडाकडून निवृत्ति - ज्ञानकांडाकडे प्रवृत्ति
उपनिषद - निखळ वेदवाङ्मय - वेदांत.

वेद - विद् (ज्ञान) | प्राचीनतम वाङ्मय

(३) आपले अनमोल ठेवा - वेदवाङ्मय

(४) दश इंद्रिये व त्यांच्या देवता —
ज्ञानें | कान - दिशा | त्वचा - वायु | चक्षु - सूर्य
जिव्हा - वरुण | घ्राणेंद्रिय - अश्विनीकुमार
कर्मेंद्रिये | हात - इंद्र | पाय त्रिविक्रम | वाणी - अग्नि
उपस्थ - प्रजापति | गुद - यम

© www.madhaveeraghuveer.com

(५) दशदिशांच्या देवता

पूर्व - इंद्र                पश्चिम - वरुण
उत्तर - कुबेर              दक्षिण - यम
ईशान्य - ईश               नैऋत्य - निऋती
वायव्य - वायु              आग्नेय - अग्नि
ऊर्ध्व - ब्रह्मा              अधोदिशा - शेषनाग

(३) वेदवेदांगांचे दहा आचार्य -

ऋग्वेद - पैल               कृष्ण यजुर्वेद - वैशंपायन
शुक्ल यजुर्वेद - याज्ञवल्क्य    सामवेद - जैमिनी
अथर्ववेद - सुमन्तु           व्याकरण - पाणिनी
निरुक्त - यास्काचार्य         छंद - पिंगल
ज्योतिष - लगध             याज्ञशिक्षा - नारद

(६) वैदिक विद्या - १. उद्गीथ विद्या - ॐकार - माण्डुक्य
२. संवर्ग - केनोपनिषद ३. मधुविद्या - ४. पंचाग्निविद्या
५. आत्मविद्या - बृहदारण्यक ६. शांडिल्यविद्या ७. दहरविद्या
(उपकोसल)
८. भूमविद्या ९. दीर्घायुष्यविद्या १०. मंथविद्या.

५. दहा प्रकारचे दर्शन नित्य घ्यावीत -
१. करदर्शन २. भूमिदर्शन ३. स्वरूपदर्शन ४. सृष्टि[illegible]न
५. सूर्यदर्शन ६. मातृपितृ दर्शन ७. धेनुदर्शन
८. गुरु ९. देव १० सत्पुरुषदर्शन.

८. महापुरुष, यति, संन्यासी —— दशनाम
(१) गिरी - गोविंदगिरी | पुरी - | पर्वत | सागर - आनंद[illegible]
वन - तीर्थ - भारती तीर्थ | सरस्वती - दयानंद सर[illegible])
अरण्य - विद्यारण्य स्वामी आश्रम

© www.madhaveeraghuveer.com

कृष्णधनघोष
वैशंपायन सत्यनारायण बोस

(९)
१० प्रकारचे गुरु → १. उपाध्याय २. माता ३. पिता
४. वडील बंधू ५. शासक ६. मामा ७. श्वशुर ८. त्राता
९. आईचे वडील - मातामह १० पित्याचे वडील - पितामह.
निवृत्तिनाथ, श्रेष्ठ गंगाधर

(१०) दहा प्रकारचे यज्ञ - नित्य यज्ञ - देवयज्ञ, पितृयज्ञ, ब्रह्मयज्ञ
भूतयज्ञ, मनुष्ययज्ञ
नैमित्तिक — अग्निहोत्र, दर्शपूर्णमास, चातुर्मास्य,
पशुयाग, सोमयाग.

(११) जपमाळेचे १० प्रकार — प्रवाळ, मौक्तिक, स्फटिक
शंख, रजत, अष्टापद, चंदन, पुत्रजीविका
अब्ज (कमळकाकडीचे बीज) रुद्राक्ष

(१२) दहा जणांकडे कधीही रिक्त हस्ताने जाऊ नये
अग्निहोत्रं गृहं क्षेत्रं भार्यां मित्रं सुतं शिशुम्।
रिक्तपाणिर्न गच्छेत राजानं देवतां गुरुम्॥

(१३) आरोग्यासाठी सर्वौषधी
कुष्ठ मांसी हरिद्रे द्वे मुरा शैलेयचन्दनम्।
वचा चम्पक मुस्ते च सर्वौषध्यः दश स्मृताः
कोष्ठ, जटामांसी, साधी हळद, आंबेहळद, मुरमांसी, शिलाजित, चंदन, वेखंड, चाफा आणि नागरमोथा — — —

(१४) कोणत्याही परिस्थितीत पोषण्य असणारे.
पिता माता गुरुर्भार्या प्रजा दीनः समाश्रितः
अभ्यागतोऽतिथिश्चाग्निः पोष्यवर्ग उदाहृतः॥

(१५) शुद्ध तुपापासून होणारे लाभ - १. बुद्धी, स्मृती
विचारशक्ती, जठराग्नि, बल, आयुष्य, तारुण्य, कांती
शुक्र, दृष्टी। वाग्भटाने तुपाला सहस्रवीर्य, सहस्रकर्मकृत्
म्हटले आहे.

© www.madhaveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

(१६) ब्रह्मांडाचे चक्र सतत फिरत असते। प्रमुख १० चक्रे
१. रथचक्र - गाडीचे चाक २. कुलालचक्र - कुंभाराचे चाक
३. श्रीचक्र (श्रीयंत्र) तंत्रशास्त्र ४. आयुधचक्र - एक प्रकारचे शस्त्र
[illegible] सहस्त्रारचक्र - मूर्धा ६. षट्चक्र - योगशास्त्रातील
[illegible] शक्तीचे प्रतीक ८. राजचक्र - सार्वभौमत्व
९. सिद्धचक्र [illegible] १० कर्मचक्र - कर्माचे प्रतीक

(१७) मनो मधुकरो मेघो मानिनी मद[illegible]
मा मदो मर्कटो मत्स्यो मकारा दश चं[illegible]

(१८) काव्याचे दहा प्रकार —— महाकाव्य, लघुकाव्य, खंडकाव्य
गद्यकाव्य, चित्रकाव्य, विडंबन काव्य, पंडिती काव्य
शाहिरी काव्य, कूटकाव्य, चंपूकाव्य (गद्यपद्यमय काव्य)

(१९) अर्जुनाची दहा नावे —
अर्जुनः फाल्गुनो जिष्णुः किरीटी श्वेतवाहनः।
बीभत्सुर्विजयः कृष्णः सव्यसाची धनंजयः॥

(२०) १० प्रसिद्ध द्वंद्वयुद्धे - वाली x सुग्रीव | कृष्ण x चाणूर
बलराम - मुष्टिक | कृष्ण x चाणूर, जांबुवंत, भीम x बकासुर
भीम x हिडिंब, जीमूत कीचक, जरासंध, दुर्योधन -
ही सर्व युद्धे धर्मयुद्धाच्या नियमांना धरून होती.

(२१) पुराणकालीन दहा मूर्ख — भीष्म सांगतात.
१. दुर्योधन २. रावण ३. शिशुपाल ४. जरासंध
५. कंस ६. हिरण्यकशिपु ७. भस्मासुर ८. रुक्मी
९. जयद्रथ १० शकुनि

(२२) स्नानाचे फायदे - नित्य कर्म केले नाही तर दोष लागतो.
रूप, तेज, बल, शुचिता, दीर्घायुष्य, आरोग्य, पवित्रता,
दुःस्वप्ननाश, तप आणि बुद्धी वाढवणारे...

©www.madhaveeraghuveer.com

06.01.2020



९

॥श्री॥

यज्ञानां जपयज्ञोऽस्मि । जपय[ज्ञ] ही माझीच विभूति आहे असे भगवंत १० व्या अध्यायात सांगतात. या यज्ञासाठी कोणत्याही बाह्य सामग्रीची जम[वा]जमव करावी लागत नाही. ब्राह्मण, मंत्रोच्चारण, अन्नदान इ० [...]ची आवश्यकता नसते. मात्र विधियुक्त श[...] [क]र्म आणि श्रद्धा मात्र इथे असाव[...] [...]क श्रद्धा असली आणि बाह्य साधन [...]भाव असली तरी हा यज्ञ सिद्ध होऊ शकतो. या जपमाळेमध्ये कोणकोणत्या मण्यांचा समावेश होऊ शकतो हे आपण १० संख्येचा अभ्यास करताना पाहिले होते. स्फटिक, प्रवाळ, मौक्तिक, रुद्राक्ष याचा थोडा विचारही केला होता. परंतु जपमाळेतील मण्यांच्या संख्येविषयी थोडे चिंतन करायचे आहे. १०८ मणी - (२७ नक्षत्रे x ४) (१२ x ९)

१४ विद्या
६४ ~~विद्या~~ कला - यामध्ये भौतिक गोष्टींचा समावेश आहे.

१४ विद्या - चार वेद, सहा वेदांगे, न्याय, मीमांसा, पुराणे, धर्मशास्त्र
ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद
सहा वेदांगे व्याकरण - भाषेतील शब्दांच्या व्यवहाराचे शास्त्र
ज्योतिष - ग्रहगती तसेच सामुद्रिक जाणण्याची विद्या
निरुक्त - कठीण शब्दांचे अर्थ व व्युत्पत्ति सांगणारे शास्त्र
कल्प - धार्मिक विधि व व्रतांचे वर्णन करणारे शास्त्र
छंद - शब्दांची गेयरचना व काव्यवृत्तांचे ज्ञान
शिक्षा - शिक्षण, अध्ययन व अध्यापन
६४ विद्या - धातुशास्त्र, वृक्षायुर्वेद, बाज विणण्याची कला, शिष्टाचार, व्यायामाचे शास्त्रोक्त ज्ञान, पक्ष्यांची बोली जाणणे, वास्तुविद्या, लहान मुलांचे मनोरंजन, पाककला, कुंतल बटतील सुंदर बनवणे उखाणे - काव्यातून प्रश्न विचारणे (प्रहेलिका), प्रतिमाला - अंताक्षरी कायाकल्प - वृद्धाला तरुण! वस्त्रप्रावरणे, सुगंधी द्रव्ये यांचे ज्ञान. फसवण्याची कला. द्यूतक्रीडा, माल्यग्रथन - वेण्या, गजरे बनवणे रत्नज्ञान, शीघ्र काव्य, नृत्यज्ञान, उदकवाद्य - जलतरंग अभिनयकला, गारुडविद्या, लाकडावर कोरीवकाम करणे

© www.madhaveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

08 नऊ ही ब्रह्मसंख्या आहे. ती पूर्ण आहे. ज्या संख्येला ९ ने
भाग जातो त्या संख्येच्या सर्व अंकांची बेरीज केली तर
09 ती ९च येते. २७९ असो किंवा ७२९ / ५३६७८ असो
की ७,२९,३,८६/-
10 (आणि यानंतर येणारी ८ ही संख्या मायेची आहे
कारण ती Diminishing आहे. म्हणजेच त्यातील पाढ्यामध्ये
11 किंवा गुणाकारामध्ये ही संख्या घटत जाते
८×२ = १६ = ७ | ८×३ = २४ (६) | ८×१३ = १०४
12 ८× १२७ = १०१६ = (८)   ८×४९५१ = ३९६०८
माया ही भासमान आहे. स्थिर आहे.
13 नवरात्रि - नऊ रात्री, देवीची रूपे -
१ शैलपुत्री - पर्वतांची ~~कन्या~~ हैमवती (हिमवानाची मुलगी) वृषारूढ
14 ब्रह्मचारिणी - तपस्या केली (सती पार्वती)
चंद्रघंटा - चंद्राच्या आकारातील घंटा धारिणी (मुकुट)
15 कूष्मांडा - कोहळे - अनेक बीजे - नवनिर्मिती (अंधकार दूर)
स्कंदमाता - कार्तिकेयाची माता - चातुर्य, बुद्धिवान, कौशल्य
16 कात्यायनी - कात्य गोत्रजा।
कालरात्री - विनाशाचे प्रतीक, तेजस्वी होण्याची शक्ती
17 महागौरी - शुभ्र, निरागस (तपश्चर्या / गंगास्नानाने गोरी।
सिद्धिदात्री - अष्टसिद्धी देणारी।

18
शैलपुत्री - मन स्थिर, सहनशील (पर्वताप्रमाणे) होते. / तुपाचा नैवेद्य
19 ब्रह्मचारिणी अनंत चेतनेची अनुभूति — साखर / फळे (ध्यानाची प्रवृत्ती)
होते चंद्रघंटा - मन शांत होते. (वर्तमानात जगता येते) शौर्य / दूध / खीर
20 कूष्मांडा - सृष्टीचे मातृत्व (पुनरुत्पत्ति) विश्वनिर्मिती / मालपुवा, गोड पुरी
स्कंदमाता - निरागस, करुणा, कौशल्य - केळ्यांचा नैवेद्य
कात्यायनी - शु   मधाचा नैवेद्य
कालरात्री — शुभंकरी माता (सूर्याप्रमाणे ऊर्जा / गूळाचे पदार्थ गूळ
महागौरी - गौरी, शुभ्रता - श्वेताम्बरधरा (जीवनाचे उज्ज्वल) नारळ
सिद्धिदात्री - सर्व देव हिची आराधना करतात. तीळ / तीळतेल.

© www.madhaveeraghuveer.com

सत्व, रज, तम X ३ शक्ती - प्रकृति, योग, माया = ९ रात्री
यज्ञोपवीत - ३ X ३ धागे = ९ नवरात्र - चैत्र, आश्विन, आषाढ, माघ
प्रतिपदेपासून नवमीपर्यंत.

✡ नवग्रह जरी दूर असले तरी त्यांचा प्रभाव मानवी जीवनावर असतो
नवग्रहांचा प्रभाव काही अंशी कमी करण्यासाठी. To pacify
ग्रहदोषांची लक्षणे - वृक्ष आराधना

ग्रहाधीनं जगत् सर्वं मंत्राधीनाश्च ते ग्रहाः।
ते मंत्राः ब्राह्मणाधीनास्तस्मात् ब्राह्मणदेवता ॥

मूळांक - १, १, १०, १९, २८ तारीख | परिक्रमा -

(रवि) सूर्य - मांदार - ६ | गुरु - पिंपळ
(सोम) चंद्र - पळस - २. | शुक्र - उंबर
(लाल वस्त्र) मंगळ - खैर, खादिर | शनि - शमी
(प्रखर बुद्धि) बुध - अपामार्ग, जाडेखिरे | राहू - कनक
| केतु - कुश

नवग्रहांची रत्ने

सूर्य - माणिक | चंद्र - मोती
मंगळ - प्रवाळ | बुध - पाचू
गुरु - पुष्कराज | शुक्र - हिरा
शनी - नील | राहू - गोमेद
केतु - वैडूर्य

त्या त्या ग्रहांची रत्ने धारण केल्याने त्या ग्रहांची प्रसन्नता लाभते.

ब्रह्मा मुरारिस्त्रिपुरान्तकारी (मार्कंडेय पुराण)

नवनाथ

©www.madhaveeraghuveer.com

☆ ब्राह्मणाने अवश्य करावीत अशी ९ कर्मे.
१. स्नान २. संध्या ३. जप
४. होम ५. स्वाध्याय ६. देवपूजा
७. वैश्वदेव ८. अतिथिसत्कार ९. पितृतर्पण
स्नानं संध्या जपो होमः स्वाध्यायो देवतार्चनम्।
वैश्वदेवस्तथाऽतिथ्यं नवमं पितृतर्पणम्॥ (स्कंदपुराण)

☆ नवद्वारे - देह देवाचे मंदिर ——
देहातील प्राण यापैकी कोणत्यातरी द्वाराने मृत्युसमयी बाहेर पडणार आहे. ही नवद्वारे स्वच्छ असावीत.
२ डोळे, २ कान, २ नाकपुड्या, मुख, गुदद्वार, मूत्रद्वार ---

☆ नवनाग - अनंत, वासुकी, शेष, पद्मनाभ, कंबल शंखपाल, धृतराष्ट्र, तक्षक, कालिया - -

☆ सम्राट चंद्रगुप्ताच्या दरबारातील नवरत्ने -
धन्वंतरी (वैद्य) क्षपणक (फलज्योतिष)
अमरसिंह (कोशकार) शंकु (भूमापनशास्त्र)
वेतालभट्ट (मंत्रशास्त्र) घटकर्पर (शिल्पशास्त्र)
कालिदास (कवी) वराहमिहिर (ज्योतिष)
वररुचि (वैय्याकरणी)

☆ अकबरकालीन नवरत्ने - श्रेष्ठ पुरुष / विद्वान व्यक्ती
स्वतः अकबर हा गुणी व गुणग्राहक होता. त्यामुळे तो स्वतःला मध्यभागी ठेवून इतर ८ रत्नांचा सन्मान करत असे. घालीत केही द्वारा मानुनिया मध्यमेरु आपणाते।
१. बिरबल - चातुर्य, स्वामिनिष्ठ, वाक्चातुर्य / हजरजबाब न्यायविभागातील उच्चविभूषित
२. अबुल फजल - कुशाग्र बुद्धि, साहित्य, इतिहास, दर्शनशास्त्र ग्रंथ वादविवाद पटु. इतिहासकार, राजदूत, सेनानायक / एने अकबरी.
३. राजा तोडरमल - वित्तशास्त्र, मंत्री, भूमि व्यवस्था / मालगुजारी भूमि कर व्यवस्था प्रणाली प्रथम अकबराने केली
४. मानसिंग - साहस, उच्चवंशीय / राजा मानसिंह प्रधान सेनापती फर्जंद / मिर्झाराजे / हिंदूंविषयी सकारात्मक दृष्टीकोन



अकबराच्या राणी मानसिंगच्या मोठ्या बहिण होत्या

©www.madhaveeramahaveer.com

देहबुद्ध्या तु दासोऽहं जीवबुद्ध्या त्वदंशकः ।
आत्मबुद्ध्या त्वमेवाहं इति मे निश्चिता मतिः ।



## साहित्यशास्त्रातील नवरस व नवभाव

शृंगार - रतिभाव
हास्य - आनंदभाव
करुण - शोकभाव
रौद्र - क्रोध
वीर - उत्साह
भयानक - भीति
बीभत्स - जुगुप्सा
अद्भुत - विस्मय
शांत - शम

## नवविधा भक्ती व नऊ भक्तश्रेष्ठ—

श्रवण - परीक्षित
कीर्तन - शुकाचार्य
स्मरण - प्रल्हाद
पादसेवन - लक्ष्मी
अर्चन - पृथु राजा
वंदन - अक्रूर
दास्य - हनुमान
सख्य - अर्जुन
आत्मनिवेदन - बली -- पूर्ण समर्पण

श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् ।
अर्चनं वन्दनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥

१. तानसेन - संगीतसम्राट | सन्माननीय | कलाप्रेमी | मंत्रमुग्ध
२. अब्दुल रहीम खाने खाना - उच्च कोटिचे विद्वान व कवी | फारसी, अरबी, तुर्की, संस्कृत, हिंदी, राजस्थानी भाषा अवगत.
३. अबुल फैजी - फारसी कविता - गणित शिक्षक, राजकवी
दीन-ए-इलाही चे समर्थक
४. मुल्ला दो प्याजा - मेहनती व एकनिष्ठ (अब्दुल हसन)
प्रभारी - शाही परिवारका बावर्चीखाना मुर्गियोंके लिए इस्तेमाल.
५. हकीम हमाम - मुख्य सल्लागार | बावर्चीखाना चे प्रमुख | आचारवान उदार, मधुर वाणी



© www.madhaveeraghuveer.com

चंद्र - व्यास - 3468 कि.मी
१२
सूर्य

# 27 JANUARY

TUESDAY १२६५२
WEEK 05 १३,९१०७६
DAY 027-338
DATE 27.01.2015 1391

| JANUARY | | | | | | 2015 |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

१०८ संख्येचे महत्व -

सूर्याचा व्यास जेवढा आहे त्याच्या १०८ पट अंतर सूर्य व पृथ्वीमध्ये आहे. / चंद्राचा व्यास×१०८ चंद्र-पृथ्वी मधील अंतर

शरीरातील १०८ चक्र कार्यरत होतात.

Systeme gets alligned with cosmic systeme

जे ब्रह्मांडात आहे तेच पिंडात आहे.

मोबाईल नंबर मध्ये १०८ संख्या असावी यासाठी अनेक जण पाठपुरावा करतात. आधिक पैसे मोजतात.

हिंदू, जैन, बौद्ध धर्मातही १०८ चे महत्व

It stands for Supreme truth or Good consciousness

१२ राशि आणि ९ ग्रह यांचे परस्परांवर परिणाम होतात.

१२ x ९ = १०८

२७ नक्षत्रे व त्यांच्या ४ दिशा या पूर्ण Galaxy cover करतात

हे ब्रह्मांड १०८ तत्वांचे बनले आहे. Elements

ब्रह्मांडाचे प्रतिबिंब मानवी शरीरात पडते.

भक्त हा भगवंतापासून १०८ युनिट दूर असतो

१८ पुराणे, १०८ उपनिषद, १८ अध्याय

१०८ मर्मस्थाने weak spots आहेत.

श्रीयंत्र = ९ त्रिकोण ५४ ठिकाणी छेदन करतात.

५४ + ५४ = १०८
पुरुष स्त्री

२४ तासात श्वासोच्छ्वास - २१६००
१२ तासात " १०८०० ( १०८ ची माळ करून जप

कल्याण १०० पट जास्त मिळेल. (सूर्य-चंद्र नाडी)

2015

© www.madhaveeraghuveer.com

श्री

~~संदेश~~ २८ ४ ~~विषय~~ - ~~[illegible]~~

॥श्री॥

— संख्या आणि संज्ञा — (पान २८)

६/४/~~[illegible]~~ -

या पृथ्वीवर आजपर्यंत अक्षरशः अनंत प्राणी जन्माला आले आणि गेले. अब्जावधी माणसे या पृथ्वीवर जगून गेली. परंतु त्यापैकी किती जणांना आनंदाचा शोध लागला? आनंदाची प्राप्ती झाली? तर अगदीच बोटावर मोजता येतील इतक्या माणसांनाच हा आनंद प्राप्त करून घेता आला.

आनंदो ब्रह्म व्यजानात् । असे श्रुतिवचन आहे.
आचार्य म्हणतात — योगरतो वा भोगरतो वा - - -
तुकाराम महाराज — आनंदाचे डोही आनंद तरंग ।

प्रत्येकाला आनंद हवा असतो पण काही केल्या तो सापडत नाही. हातातून निसटून जातो. उपनिषदकारांनी आनंदाच्या श्रेणी सांगितल्या आहेत. मानुष आनंद, गंधर्व आनंद, देव आनंद आणि यापेक्षा सर्वश्रेष्ठ असा ब्रह्मानंद आहे. परंतु या सर्वोच्च आनंदाची कल्पनादेखील सामान्य मनुष्याला करता येत नाही. तो आपल्या मोजमापाच्या पट्ट्या लावण्याचा प्रयत्न करतो. पण तेही नीटसे साधत नाही.

याचे महत्त्वाचे कारण आहे अविद्या! विश्वामध्ये सर्वव्यापीपणाने काम करणारी माया जेव्हा व्यक्तीमध्ये प्रगट होते तेव्हा ती अविद्या असते. अविद्या म्हणजे ईश्वराचा / आत्मस्वरूपाचा विसर होय. अविद्येच्या पगड्यामुळे स्वस्वरूपाचा विसर पडतो आणि त्यामुळे त्याला आपला देह आणि हे जगत् खरे वाटायला लागते. या अविद्येच्या पडद्याकरिता उपनिषदांमध्ये ग्रंथी, असत्, तमस्, अज्ञान, जाळे, भास, दृश्य, वाचारंभण, विकार, असे शब्द वापरलेले आढळतात. थोडक्यात अविद्या म्हणजे आनंदाचा लोप आहे. आणि हा आनंद लोपल्यामुळे अज्ञानाचा अंधकार जीवाला ग्रासून टाकतो आणि जी

आनंद मिळवण्यासाठी दृश्यामध्ये चाचपडत रहातो ज्यात्यामध्ये जे नाही ते तिथे आहे असा भ्रम होणे हा अविद्येचा प्रभाव समजावा. मी आनंदस्वरूप आत्मा आहे. आनंदाचा झरा माझ्याच हृदयात आहे या सत्याचा पूर्णपणे विसर पडतो आणि मग मी देह आहे. इंद्रियांच्या माध्यमातून मी आनंद मिळवेन या ठाम कल्पनेने तो जन्मभर भरकटत जातो ही या अविद्येची करामत आहे. त्यामुळेच मग तो सत्ता, पैसा, मान, घरदार, बायकामुले, मित्रमंडळी यात अडकत जातो. अविद्येची पकड मोठी दाट असते. जगाबद्दलच्या अवास्तव कल्पना खोट्या ठरवणारे अनेक प्रसंग आयुष्यभर येत असतात, परंतु अविद्येच्या अंमलाखाली वावरणारा मनुष्य अनुभवाने कधीच शहाणा होत नाही. मृगजळाप्रमाणे तो सतत भौतिक सुखाच्या मागे धावत सुटतो.

अशा या अविद्येच्या कचाट्यातून सुटण्याचा उपाय एकच! आणि तो म्हणजे विद्या!

उपनिषद — २ विद्या — परा व अपरा

परा म्हणजे पलीकडची आणि अपरा म्हणजे अलीकडची

" " अपरोक्षानुभूति " " " प्रत्यक्ष वा परोक्ष

सर्व विद्यांमध्ये श्रेष्ठ पराविद्या / अध्यात्मविद्या

अध्यात्मविद्या विद्यानाम् ।

अपरोक्षानुभूति साधल्यावर अज्ञान असे काहीच उरत नाही. ॐ यज्ज्ञात्वा नेह भूयोऽन्यत् किंवा यस्मिन् विज्ञाते सर्व विज्ञातं भवति ।

अपरोक्षानुभूति झाली असता जगाचे मिथ्यत्व समजून लागते, ते भासमान आहे हे कळते. म्हणजे जगाचा नाश होत नाही तर ते आपल्यापुरते संपते. जगाचा अर्थ बदलतो. मूळ अधिष्ठान ब्रह्म आहे आणि त्यावर हे भासमान विश्व उभारले आहे हे निःसंदेहपणाने समजते. त्यासाठी पराविद्या (ब्रह्मविद्या) महत्त्वाची आहे. परा विद्येमुळे जसे समाधान मिळते तसे अपरा विद्येने मिळत नाही हे खरे.

© www.madhaveeraghuveer.com

क्षेत्रज्ञाला जाणण्यापूर्वी क्षेत्राची तत्त्वे समजावून घ्यायला हवीत. ज्ञेय जाणण्यापूर्वी ज्ञेय जाणायला हवे.



परंतु तरीही अपरा विद्या देखील जाणून घ्यायला हवी कारण अपरा विद्येचा जसजसा उत्कर्ष होतो तसतशी माणसाला आपल्या प्रचंड अज्ञानाची तीव्र जाणीव होते. आणि ब्रह्मविद्येच्या दृष्टीने ही जाणीव फार मोलाची आहे. या मार्गावरचे ते पहिले पाऊल आहे. अविद्येचा अंमल क्षीण व्हायला लागतो. तो आत्मसन्मुख व्हायला लागतो. सद्गुणांचे संवर्धन होते आणि मग आपोआप चित्तशुद्धी होते.

अशा चौदा विद्या व चौसष्ट कला आहेत.

८ × ८ = ६४. — अष्टौप्रहर — ~~अष्टप्रहर~~ —

१. निशांत - ब्राह्म मुहूर्त - सूर्योदयापूर्वी दोन तास
२. प्रातःकाल - सूर्य उगवण्यापूर्वी व नंतर काही घटिका
३. पूर्वान्ह - कोवळ्या उन्हाचा काळ - कच्ची धूप
४. माध्यान्ह - दुपारी १२.३० ते २.३०
५. अपरान्ह - उन्हे कलती झाली की
६. सायान्ह - ५ ते ७.३०
७. प्रदोष - दिवेलागणीची वेळ
८. निशा - यामिनी, रजनी

अष्टगंध - कस्तुरी, केशर, कृष्णागरु, गोरोचन, चंदन, रक्तचंदन गोपीचंदन, मलयागरु

अष्ट दिशा व दिग्पाल - पूर्व - इंद्र | पश्चिम - वरुण
आग्नेय - अग्नि | दक्षिण - यम | नैऋत्य - निऋति
वायव्य - मरुत | उत्तर - कुबेर | ईशान्य - ईश

अष्ट पाश - घृणा शंका भयं लज्जा जुगुप्सा चेति पंचमी।
कुलं शीलं च मानं च अष्टौ पाशाः प्रकीर्तिताः॥

अष्टावधानी - Multi tasking

| JANUARY | | | | | | 2015 |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

अष्टप्रधान मंडळ - पंतप्रधान, पंत अमात्य, पंतसचिव
मंत्री, सुमंत, सेनापती, न्यायाधीश, पंडितराव।

अष्टाक्षरी मंत्र - ॐ भक्ति भिक्षां देहि।
हरहर महादेव। ज्ञानदेव तुकाराम।

अष्टसात्त्विक भाव - कंप, रोमांच, स्फुरण, स्वरभंग,
स्वेद, अश्रू, स्तंभन, वैवर्ण्य

वर्णमालेतील प्रमुख अष्ट वर्ग - अ(१६) क(५) च(५) ट(५) त(५) प(५) य(४) श(७) = ५२

वायनदान - व्रतसमाप्ति - हळकुंड, सुपारी, दक्षिणा, खण, सूप,
कंकण, धान्य, मणि (एकसर)

अष्टविनायक - मोरगाव - मयुरेश्वर | थेऊर - चिंतामणि
लेण्याद्रि - गिरिजात्मज | ओझर - विघ्नहर
पाली - बल्लाळेश्वर | महड - वरदविनायक
सिद्धटेक - सिद्धिविनायक | रांजणगाव - महगणपती

अष्टविवाह - ब्राह्मविवाह - सत्कृत कन्यादान
दैवविवाह - यज्ञप्रसंगी ऋत्विजास दान म्हणून
आर्ष - धन घेऊन
प्राजापत्य - धर्माचरणार्थ कन्यादान करणे.
आसुर - शुल्क घेऊन
गांधर्वविवाह - परस्पर अनुमतीने
राक्षसविवाह - जबरदस्तीने आणणे.
पैशाच विवाह - चोरून आणणे.

अष्टधा प्रकृति - भूमिरापोऽनलो

© www.madhaveeraghuveer.com

८

अष्ट लक्ष्मी – धनलक्ष्मी, धान्यलक्ष्मी, धैर्यलक्ष्मी, विजयलक्ष्मी, वीरलक्ष्मी, संतानलक्ष्मी, गजलक्ष्मी, विद्यालक्ष्मी.

टाळी देण्याचे ८ प्रमुख प्रकार

१. अभिनंदन टाळी
२. आरती टाळी
३. भाकरी थापताना
४. झिम्मा खेळताना
५. चांडाळ चौकडी – गप्पा
६. पत्ते खेळताना
७. नपुंसकाची टाळी
८. ब्रह्मानंदी टाळी लागणे.

८ मराठी छंद – अभंग, दिंडी, साकी, घनाक्षरी, सवाई, छप्पा, ओवी, कटिबंध

आठ प्रमुख स्मृतिकार – मनु, याज्ञवल्क्य, नारद, विष्णु, कात्यायन, आपस्तंब, व्यास, देवल ---

काव्यशास्त्रातील आठ गण – (लघु गुरु अक्षरगणावरून)

१. म गण (तिन्ही अक्षरे गुरु) माताजी — तत्त्व – पृथ्वी
२. य गण (आद्य अक्षर लघु) यशोदा – आप –
३. र गण (मध्य अक्षर लघु) रामजी – अग्नी
४. स गण (अंत्याक्षर गुरु) सरिता – वायु
५. त गण (अंत्याक्षर लघु) ताराप – आकाश
६. ज गण (मध्याक्षर गुरु) उदास – सूर्य
७. भ गण (आद्याक्षर गुरु) भारत – चंद्रमा
८. न गण (तिन्ही अक्षरे लघु) नगर – नाग

अष्टाध्यायी – पाणिनी कृत व्याकरण ग्रंथाचे ८ अध्याय.

गोत्रप्रवर्तक ८ ऋषी – विश्वामित्र, जमदग्नी, भरद्वाज, गौतम, अत्री, वसिष्ठ, कश्यप, अगस्ती

© www.madhaveeraghuveer.com

अष्ट आत्मगुण — १. अनसूय- (निर्मत्सरता) २. भूतदया ३. सहनशक्ती क्षान्ति ४. अनायास - हव्यास न बाळगता संतुष्ट ५. मांगल्य - संतोषजन्य आनंद ६. शौच शौच (अंतर्बाह्य शुचिता) ७. अकार्पण्य - कृपणतेचा अभाव (दीनवाणे नसणे) ८. अस्पृहा - लालसा नसणे. (अनभिलाषी)

आठ अभिमानस्थाने - १. कुल २. रूप ३. तारुण्य ४. गर्व ५. तप ६. संपत्ति ७. राज्य (अधिकार) ८. विद्या

आठ प्रकारची ऐश्वर्य - १. धन २. धान्य ३. पुत्रपौत्र ४. दासदासी ५. बंधुवर्ग ६. वास्तु ७. वाहन ८. दीर्घायुष्य.

आठ वृक्षदेवता (१) अश्वत्थ (पिंपळ) - विष्णु (२) पळस - ब्रह्मदेव ३. वटवृक्ष - सदाशिव ४. आवळी - शक्तीदेवता ५. बेल - श्रीशंकर ६. आंबा - इंद्र ७. औदुंबर - श्रीदत्त ८. शमी - सत्यादेवी त्या त्या देवतेचा अधिवास असतो.

अष्टक - देवतांची अष्टके - म. वाल्मिकी गंगा स्तोत्र
नर्मदाष्टक, गुर्वष्टक, भवानी अष्टक
मंगलाष्टक विवाहकार्यातील आशीर्वादपर ८ श्लोक

८ जणांचा नाश ८ कारणांनी - मूल - लाडाने
शरीर - अनियमिततेने
मुलगी (विवाहित) - अति माहेरवास
इच्छित कार्य - बडबडीने (क्रियेविण वाचाळता व्यर्थ आहे)
मोती - मातीसंगे, दूध - ताकासंगे
बुद्धी - दैवयोगाने धंदा - आळसाने

08 अष्टनायिका — १. वासकसज्जा २. विरहोत्कंठिता
३. स्वाधीनभर्तृका ४. कलहांतरिता ५. खंडिता
09 ६. विप्रलब्धा ७. प्रोषितभर्तृका ८. अभिसारिका
रसमंजिरीमध्ये नायिकांचे ११४२ प्रकार वर्णन केले
10 आहेत. त्यापैकी या प्रमुख आठ आहेत.

11 अष्टसिद्धि १. अणिमा २. महिमा ३. लघिमा ४. गरिमा
५. प्राप्ती ६. प्राकाश्य ७. वशित्व ८. ईशित्व ----
12 दूरश्रवण, दूरदर्शन, कामरूप सिद्धि अशा गौण सिद्धि
आहेत. शिवाय स्तंभन, प्रतिस्तंभ किंवा त्रिकालज्ञान अशा
13 क्षुद्र सिद्धि आहेत. परंतु सर्वश्रेष्ठ सिद्धि आहे ती
'परासिद्धि'

14
अष्टधा प्रकृति —

15

16

17

18

19

20

© www.madhaveeraghuveer.com

||श्री||

हे संपूर्ण विश्व म्हणजे द्वैताचा पसारा आहे. सर्व सृष्टी ही भेदाने भरलेली आहे. इथे सगुण आहे, तसेच निर्गुणही आहे. व्यक्त आहे तसे अव्यक्तही आहे. चर आहे अचरही आहे. दृश्य / अदृश्य यांनी युक्त आहे.

इंद्रियांना दिसणाऱ्या स्थूल दृश्य विश्वाला सूक्ष्म प्राणतत्वाचा आधार आहे. दृश्य विश्वाला तितक्याच गुंतागुंतीच्या अदृश्य विश्वाची बाजू आहे.

सामान्य मानवी बुध्दीची रचना अशी आहे की, तिला इंद्रियांना जाणवणाऱ्या सृष्टीचा अभ्यास करणे सोपे जाते. दृश्य सृष्टीचा अभ्यास करुन प्रचंड ज्ञान मिळवता येते हे विज्ञानाने सिध्द केले आहे. दृश्य वस्तूंचे इंद्रियांनी सूक्ष्म निरीक्षण करणे हा तर विज्ञानपध्दतीचा आत्मा आहे. पण आपल्या इंद्रियांची शक्ती मर्यादित असल्याने वस्तूचे सूक्ष्म निरीक्षण करण्यासाठी यंत्रांचे सहाय्य लागते. फार दूरवरचे तारे, ग्रह साध्या दृष्टीने दिसत नाही, त्यासाठी दुर्बिणीची मदत घेतली जाते. किंवा आपल्याच शरीरातील रोगजंतू डोळ्यांनी पहाता येत नाहीत त्यासाठी माणूस सूक्ष्मदर्शक यंत्राची मदत घेत असतो. अशा अनेक प्रकारच्या यंत्रांनी आपले जीवन समृध्द झाले आहे, हे मान्य करायलाच हवे आणि त्याच जोडीला विज्ञानाचे कौतुकही करायला हवे. परंतु हे खरे असले तरी बुध्दी ही बहिर्मुख असते अर्थात ती इंद्रियांच्या नादात असते.

पराञ्चि खानि व्यतृणत् स्वयम्भूः
तस्मात्पराङ् पश्यति नान्तरात्मन्)

आणि म्हणूनच अदृश्याचे ज्ञान करुन घेण्यासाठी बुध्दीला प्रथम इंद्रियांच्या नादातून सोडवून अंतर्मुख करायला हवे. जसजशी बुध्दि अंतर्मुख होत जाईल तसतशी ती सूक्ष्म होत जाते आणि मग तिला अदृश्य विश्वाच्या व्यवहाराचे आपोआप आकलन होऊ लागते. काही भाग्यवान पुरुषांना अशी सूक्ष्म बुध्दी जन्मजात असते. तर काहींना ती प्रयत्नाने साध्य करुन घेता येते.

© www.madhaveeraghuveer.com

ही सृष्टी अत्यंत गुंतागुंतीची आहे. तिच्या रचनेमध्ये एका टोकाला अत्यंत सूक्ष्म असा आत्मा आहे. तर दुसऱ्या टोकाला अत्यंत जड असे पंचभौतिक विश्व आहे. या दोन टोकांमध्ये एक सूक्ष्म सृष्टी वास करते. वासना हे तिचे मूळ द्रव्य असून ती आत्म्याच्या छायेप्रमाणे राहते. या शक्तिमय वासनेच्या जोरावर सर्व दृश्य विश्व हालचाल करते. ती सर्वच ठिकाणी सारख्याच दाटपणाने पसरलेली नाही. जिथे ती विरळ आहे तिथे आत्म्याचा प्रकाश स्वच्छ पडलेला असतो तर जिथे ती अत्यंत दाट किंवा घट्ट आहे तिथे आत्म्याचा प्रकाश पोहोचतच नाही. उपनिषदांमध्ये वासनेच्या या थरांना 'लोक' असे नाव दिलेले आढळते.

ज्या लोकात वासना अतिशय विरळ व शुद्ध असते तेथील वातावरण भगवंताच्या प्रेमाने भारलेले असते, तो पुण्यलोक!

मात्र पापलोकांतील वासना अतिशय दाट व अशुद्ध दूषित असतात. तेथील वातावरण पूर्ण स्वार्थाने भरलेले असते. अर्थात एखाद्या इमारतीतील मजल्यांप्रमाणे हे लोक एकावर एक नसतात. तर एकाच भूतलावर असतात. निरनिराळ्या योग्यतेची अनेक माणसे जशी एकाच जमिनीवर राहतात त्याचप्रमाणे वासनामय जगतामध्ये सर्व प्रकारच्या योग्यतेचे जीव एकाच ठिकाणी रहात असतात.

मुंबईमध्ये - मलबार हिल पाली हिल, जुहू बीच आहे त्याचप्रमाणे धारावी देखील आहेच ना! याच पृथ्वीवर फळाफुलांनी बहरलेला कॅलिफोर्निया आहे तसेच गोबीचे किंवा सहारा वाळवंट देखील आहेच की!

अर्थातच सारखी आवड असणारे जीव एकाच ठिकाणी जमतात हे ही सत्य आहे.

परंतु या वासनामय विश्वामध्ये जीवाला आपली वासना शुद्ध करण्याची संधि नसते. मात्र जो जीव जिवंतपणी विवेकाने वागून आपली वासना भगवंताकडे वळवतो.

©www.madhaveeraghuveer.com

08 त्यालाच अदृश्य अवस्थेमध्ये समाधान लाभते.
आपला हा देह पंचमहाभूतांचा बनलेला असतो. capsule
09 त्याच्याकडे बोट दाखवून आपण 'हा मी' असे म्हणत असतो. मरणोत्तर अवस्थेमध्ये मात्र देह शिल्लक नसतो
10 परंतु वासना शिल्लक असते. तेव्हा ती वासना म्हणजे 'मी' असतो. प्रत्येकाच्या अंतकाळी जी प्रधान वासना
11 पुढे येते त्याचे कवच जीवाभोवती बनते आणि त्यानुसार जीव सुख दुःख भोगतो. आणि यासाठी अंतकाळी
12 भगवंताची वासना टिकावी अशी सावधगिरी अध्यात्म मार्गावरून वाटचाल करणाऱ्या मनुष्याने ठेवायला हवी.
13 आणि त्यासाठी भगवंताचे अखंड अनुसंधान ठेवावे.
अन्तकाले च मामेव ---
14 व्यापारी - ४ मुलगे — वासना दुकानात
∴ पुढचा जन्म उंदीर होऊन दुकानात वास्तव्य!

15

वासनेच्या आवरणानुसार या ब्रह्मांडामध्ये ६४ भुवने
16 आहेत. सप्त स्वर्ग आहेत तसेच सप्त पाताळ आहेत.
त्यांचा अभ्यास करताना आपण ७-७ चा विचार
17 करणार आहोत. सप्तपदी, सप्तरंगी इंद्रधनुष्य, सप्तस्वर
सप्त चिरंजीव, सप्तर्षि ---
18 परंतु त्यापूर्वी काही मोठ्या संख्या विचारात घेऊया.
५६ भाषांचा उल्लेख अभंगामध्ये आढळतो
19 ज्ञानेश्वर माऊलींचा गौरव करणाऱ्या अभंगात म्हटले आहे.
छप्पन भाषेचा केलासे गौरव। भवार्णवी नाव उभारली।

20

५२ मातृका - मंत्राणां मातृका देवी शब्दानां ज्ञानरूपिणी
ॐ काराच्या साडेतीन मात्रांपासून पुढे ५२ अक्षरे
तयार झाली. १६ स्वर व ३६ व्यंजने
४९ मरुद्गण - देवांचे सैनिक। दिति + कश्यपांचे पुत्र

© www.madhaveeraghuveer.com

वैवस्वत मन्वंतरातील सप्तर्षि - १. कश्यप २. अत्रि ३. भरद्वाज ४. विश्वामित्र ५. गौतम ६. जमदग्नि ७. वसिष्ठ

तारकासमूहातील ७ ऋषि -
१. मरीचि २. अत्रि ३. अंगिरस ४. पुलस्त्य ५. पुलह ६. क्रतु ७. वसिष्ठ (जवळील लहान तारा अरुंधती)

सप्त चिरंजीव -
अश्वत्थामा बलिर्व्यासो हनुमांश्च बिभीषणः। १
कृपः परशुरामश्च सप्तैते चिरजीविनः॥

अग्निच्या सात जिव्हा - काली, कराली, मनोजवा, सुलोहिता, सुधूम्रवर्णा, स्फुलिंगिनी, दिव्य वरदायी

सप्त धातू (खनिज) - सोने, रूपे, तांबे, शिसे, जस्त, कथिल, लोखंड
शरीरातील धातू - रस, रक्त, मेद, मांस, अस्थि, मज्जा, शुक्र २

सप्तद्वीप - जंबुद्वीप, प्लक्षद्वीप, शाल्मलीद्वीप, कुशद्वीप, क्रौंचद्वीप, शाकद्वीप, पुष्करद्वीप --- ३

सप्त अरण्ये - दंडकारण्य, खंडारण्य, चंपकारण्य, वेदारण्य, नैमिषारण्य, ब्रह्मारण्य, धर्मारण्य ---

सप्तप्रयाग - प्रयागराज (गंगा + यमुना) नंदप्रयाग, कर्णप्रयाग, रुद्र प्रयाग (मंदाकिनी + अलकनंदा), देवप्रयाग, पार्वती प्रयाग, विष्णुप्रयाग

आरोग्याची सप्तसूत्रे - १. व्यायाम २. विश्रांती ३. मोकळी हवा ४. समतोल आहार ५. भरपूर पाणी ६. सूर्यप्रकाश ७. मानसिक समाधान

© www.madhaveeraghuveer.com

विवाहातील सप्तपदीमध्ये स्त्री पतीबरोबर सात पावले चालून प्रत्येक पावलाबरोबर १।१ मागणी करते.
१. अन्न २. बल ३. धनवस्त्रादि ४. सुख ५. गाय
६. सर्व ऋतुंमध्ये सुखकारक वस्तू ७. सख्य
धर्मे अर्थे च कामे च नातिचरामि ॥
सज्जनांबरोबर सात पावले चालले तर मैत्री होते.

3

वैदिक कालामध्ये ऋषींनी ईश्वराकडे केलेली मागणी---
१. दीर्घायुष्य २. सुप्रजा व कीर्ति ३. धनधान्यसमृद्धी ४. प्रभुत्व-ऐश्वर्य ५ अनासक्ती ६. ज्ञानसंपत्ती ७ अनुभवामृत

ज्ञानाच्या सात भूमिका - १. शुभेच्छा २. विचारणा ३. तनुमानसा ४. सत्त्वापत्ती ५. असंसक्ती ६. पदार्थभावनी ७. तुर्यगा ——— योगवासिष्ठ-बोध

सप्त महारथी - १. द्रोण २. कर्ण ३. कृपाचार्य ४. कृतवर्मा ५. अश्वत्थामा ६. शल्य ७. जयद्रथ ---
या सातजणांनी मिळून अभिमन्यूचा वध केला.

सप्त मृत्तिका - वास्तुशांति / मंगलकार्यासाठी
१. अश्वपागा / २. हत्तीच्या पायाखालील ३. चव्हाट्यावरील ४. वारुळातील ५. संगमावरील ६. डोहजवळील ७. गोठ्यातील.

सप्तपुरी - अयोध्या मथुरा माया काशी कांची अवंतिका
पुरी द्वारावती चैव सप्तैता मोक्षदायिकाः ॥

इंद्रधनुष्य - ता ना पि हि नि पा जा Vibgyor

६

सप्तस्वर - सरगम - सा रे ग म प ध नी
षड्ज, ऋषभ, गंधार, मध्यम, पंचम, धैवत, निषाद



© www.madhaveeraghuweel.com

गीता, सप्तशती - ७०० श्लोक 90

सप्तसंपत्ति - जनसंपत्ति, धनसंपत्ति, पुत्रसंपत्ति, कलत्रसंपत्ति, विद्या संपत्ति, इष्टफलसंपत्ति, शरीरसंपत्ति.

सप्तलोक, सप्तव्याहृति - भूः भुवः स्वः जनः महः तपः सत्यम्।
१. अस्तित्व २. ज्ञान ३. प्रकाश ४. महत्व
५. प्रजनन ६. सहनशक्ती ७. सत्यनिष्ठा
असे हे सांकेतिक शब्द (व्याहृति) आहेत.

सात दिवसांचा सप्ताह - ग्रंथवाचन - पारायण सप्ताह
गुरुचरित्र, सप्तशती, दासबोध, ज्ञानेश्वरी, भागवत
सात वर्षांमध्ये शरीरातील रक्ताचा थेंब न् थेंब बदलतो.
स्वभाव बदलतो, विचार बदलतात. ७

सप्त सागर -
क्षीरसमुद्र क्षारसमुद्र। दधि मधु घृत समुद्र।
सहावा तो इक्षुरससमुद्र। सुरासमुद्र सातवा॥

सात आश्चर्ये - सृष्टीतील ---
१. आकाशाला खांब नाही. -
२. तळहातावर केस नाही.
३. समुद्राला झाकण नाही.
४. घोड्याला स्तन नाही.
५. देवाला आई वडील नाहीत.
६. जिभेला हाड नाही.
७. केसांना रक्त नाही.

भारतातील सात आश्चर्ये -
१. आग्र्याचा ताजमहाल - अप्रतिम कारागिरी. ३६ - कुराणवचने
२. वेरूळची लेणी - आधी कळस मग पाया। पिढ्यान् पिढ्या



© www.madhaveeraghuveer.com

३. विजापूरचा गोलघुमट - ध्वनिशास्त्राची किमया
४. दिल्लीचा कुतुबमिनार - गंज न लागणारा धातू
५. मीनाक्षी मंदिर - व्याप्ति, विस्तार व सौंदर्य
६. श्रवणबेळगोळ - गोमटेश्वर - भव्य रेखीव मूर्ति
७. चितोड येथील जयस्तंभ - शौर्याचे चिरंतन स्मारक.

जशी भावना तशी सिद्धि —
मंत्रे तीर्थे द्विजे देवे दैवते भेषजे गुरौ।
यादृशी भावना यस्य सिद्धिर्भवति तादृशी। १

७: सात ठिकाणी सत्यवचनाचा त्यागही सद्गुण ठरतो.
१. अजाण मुले २. रोगी ३. वेडा माणूस ४. शत्रू
५. मृत्युशय्येवरील व्यक्ती ६. अधिकाराशिवाय प्रश्न विचारणारे वकील ७. चोर
या ठिकाणी सत्य बोलण्याचा नियम पाळू नये.

भर्तृहरीला डाचणारी सात शल्ये --- ११
शशी दिवसधूसरो गलितयौवना कामिनी।
सरो विगतवारिजं मुखमनक्षरं स्वाकृतेः।
प्रभुर्धनपरायणः सततदुर्गतः सज्जनो
नृपाङ्गणगतः खलो मनसि सप्त शल्यानि मे॥

चंद्राला दिवसा प्रकाश नसणे, ये कामिनीला जरा।
पद्मावीण जले, निरक्षरमुखी जो नेटका गोजिरा
दात्याला धनलोभ नित्य वसते दारिद्र्य विद्वज्जनी।
दुष्टाच्या पगडा महीपतिगृही ही सात शल्ये मनी॥

शाणोल्लेख जसा असा मणि रणी, जो वीर घायाळला।
संभोगे शिणली अशी नववधु, हत्ती न मस्तावला।
ज्यांची स्वच्छ शरद्नूत पुळिने, त्या निम्नगा चंद्रही
बीजेचा प्रभु पात्रदत्तधनी जो, हे शोभती सर्वही॥



© www.madhaveeraghuveer.com

26 January 2021

Republic Day

प्रजासत्ताक दिन

(६)

॥ श्री ॥

08 एखाद्या एकत्र कुटुंबामध्ये ५० / ६० माणसे असतात.
त्यातील पणजोबा, पणजीबाई ८५ - ९० वर्षांचे असतात.
09 त्यांची ८/१० मुले, त्यांची २५ मुले त्यापैकी काहींची
लग्ने होऊन त्यांना ३०/१२ मुले असायची. असे
10 सगळे जमले असताना पणजोबा अभिमानाने म्हणायचे
की हा सगळा परिवार माझा आहे. आणि खरंच आहे
11 ते! त्यांच्या रक्ताचा अंश त्यांच्या पणतवापर्यंत पोहोचला
होतांच की! आणि त्या पणजोबांमध्ये सुद्धा त्यांच्या
12 खापर पणजोबांचेच रक्त उतरले होते. कोणी त्यांचा रंग,
कोणी त्यांचे रूप (गुण), डोळे, बुद्धिमत्ता, कलेचा वारसा
13 घेतला होता. कुणाची जिद्द, कुणाची धडपड, कुणाची एखादी
लकब पुढच्या पिढीपर्यंत पोहोचले. हे जर एखाद्या
14 कुटुंबामध्ये, व्यवहारामध्ये घडत असेल तर या सृष्टीच्या
बाबतीतही हे असेच होत असणार हे मात्र निश्चित!
15 मूळ स्वरूपापासून शिव आणि शक्ती निर्माण
झाले आणि त्यांच्यापासून ही अवाढव्य व विविधतेने
16 नटलेली सृष्टी निर्माण झाली. या विविधतेमध्ये प्रत्येक
ठिकाणी त्या परमात्म्याचा अंश असतोच असतो. तो तुमच्या
17 माझ्यामध्ये, प्रत्येकामध्ये आहेच आहे. अंशरूपाने आहे. पण
मग तो दिसत का नाही? प्रयोगशाळेमध्ये समुद्राच्या
18 पाण्याच्या एका थेंबाचे पृथक्करण केले तर समुद्रजलाचे सगळे
गुणधर्म त्या थेंबात आढळतात. अगदी तसेच मूळ भगवंताच्या
19 स्वरूपाचे सर्व गुणधर्म आपल्या हृदयात वास करणाऱ्या
आत्म्यामध्ये असतातच. ही गोष्ट आत्मज्ञानी पुरुषांच्या
20 अनुभवाने सिद्ध झाली आहे.
फक्त फरक असा आहे की परमेश्वराचे गुण
आपल्यात प्रकट होताना ते विकृत स्वरूपात प्रगट होतात.
शुद्ध स्वरूपात नाही.

(३) परमात्मा सत् आहे तिथे असत् नाही अभाव नाही
नाहीपणाची जाणीवच नाही. तो आहेच आहे. परंतु तरीही
माणूस मात्र सत् असणाऱ्या अंतरात्म्याला विसरून धडपडीत



© www.madhaveelaghuveer.com

अशाश्वत अशा देहाला तो मीपणाने मानतो.

नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः।
उभयोरपि दृष्टोऽन्तस्त्वनयोस्तत्त्वदर्शिभिः।

② अखिल विश्वात सत्ता/अधिकार चालवणे हा भगवंताचा गुण आहे परंतु माणूस मात्र थोड्याशा क्षेत्रावर (राज्य, देश, गाव, विभाग) जरी सत्ता चालवायला मिळाली तरी त्याला त्या सत्तेचा मद चढतो. हे मूळ सत्तेचे विकृत रूपच आहे.

③ भगवंत चैतन्याने परिपूर्ण आहे. त्याच्या हातून सहज लीलेने सृष्टी निर्माण होते. व जगातील कार्ये चालतात. माणूस देखील कितीतरी कार्ये करण्यासाठी धडपड करत असतो. मात्र या दोन्ही कार्यामध्ये कितीतरी अंतर आहे. भगवंत स्वतः साक्षित्वाने राहून अकर्तेपणाने सृष्टी चालवतो तर मनुष्य कर्तेपणाच्या अभिमानाने कर्मे करतो व बंधनात सापडतो आणि कर्माच्या आसक्तीमुळे उगाचच सुख दुःखे भोगत राहतो. परमेश्वर मात्र कशातच लिप्त नसल्याने बंधनाच्या पलीकडे राहतो. सुख-दुःखाचा स्पर्शदेखील त्याला होत नाही

④ भगवंत जसा आनंदमय आहे तसाच माणूस देखील वस्तुतः आनंदमयच आहे. परंतु भगवंताचा आनंद त्याच्यामध्ये आहे तर माणूस मात्र आनंद मिळवण्याच्या नकळीने इंद्रियांच्या द्वारे बाह्य, जड गोष्टींच्या मागे लागतो आणि अंतर्यामी असणाऱ्या आनंदाला पारखा होतो,

⑤ या सगळ्याचे मूळ कारण असे की भगवंताच्या ठिकाणी आत्मबुद्धि आहे ज्यामध्ये आनंदाचा झरा, अनुभव आहे. तर माणसाच्या ठिकाणी देहबुद्धी आहे आणि देहबुद्धीच्या मर्यादा, दुःख येतेच. या आत्मबुद्धीमुळे भगवंत सर्वव्यापी आहे आणि अर्थातच ⑥ निःस्वार्थी आहे. परंतु मनुष्य मात्र देहबुद्धिमुळे देहापुरताच, माझ्यापुरताच विचार करतो आणि त्यामुळेच तो अत्यंत स्वार्थी आहे.

देहबुद्धीकडून आत्मबुद्धीकडे जाणे याचे नाव अध्यात्म!

देहबुद्धी ते आत्मबुद्धी करावी।

©www.madhaveeraghuveer.com

परंतु देहबुद्धीची आत्मबुद्धी करणे म्हणजे काही कोणती क्रिया नाही. शेवटी ती मनाची अवस्था आहे. मनाला भगवंताचा अनुभव घेण्यालायक बनवणे हेच तर परमार्थ साधनेचे मर्म आहे. आणि सर्व ऋषि, मुनी, संत महात्मे आपल्याला हाच बोध करत असतात.

सामान्य माणसाने ज्ञानाच्या कितीही गप्पा ठोकल्या तरी जोपर्यंत चित्तशुद्धी घडत नाही तोपर्यंत त्याच्या हृदयात भक्तीचा उगम होत नाही. अर्थात जिथे भक्तीचा ओलावा असेल तिथे आपोआपच दृश्याची आसक्ती कमी कमी होत जाते. परंतु सर्वसाधारणपणे माणूस जोपर्यंत 'देह म्हणजेच मी' मानतो, त्याचे मन देहाला घट्ट चिकटून बसलेले असते. देह दृश्य आहे, जड आहे हे जरी शब्दशः पटत असले तरी तत्वतः आचरणात आणता येत नाही आणि म्हणून सुखाच्या शोध घेताना माणूस देहालाच शरण जातो. देह आणि जगातील जड वस्तू आपल्याला सुख देतील या विश्वासाने धाव धाव धावतो. शिक्षण काय, नोकरी-व्यवसाय काय, विवाह काय घरसंसार, मुलबाळे, नावलौकिक, मानपान या चक्रात गुरफटत जातो, त्यातून आपल्याला सुख मिळेल या मृगजळामागे धावताना खऱ्या आनंदाला मात्र मुकतो.

हे सर्व टाळण्यासाठी आधी आपली सुखाची कल्पना बदलायला हवी. सुख केवळ एकाच ठिकाणी आहे आणि ते फक्त भगवंतापाशीच आहे हा विश्वास दृढ व्हायला की त्याची श्रद्धा होते. मग आपोआपच भगवंत खरा वाटू लागतो. आणि त्यानंतर त्याच्याविषयी प्रेम वाटू लागते. संतांच्या मुखातून उपदेशाचे श्रवण घडले की या प्रेमाला पुष्टि मिळते. उपनिषदे ही देखील संतवाणीच आहे.

आपल्याला हा मनुष्यदेह एका विशिष्ट कामासाठी मिळाला आहे. ज्या कामासाठी आपण या जगात आलो ते काम न करताच आपण परत गेलो तर येण्याजाण्याचे श्रम अनावश्यक वाया गेले असे म्हणावे लागेल आणि संतांना

© www.madhaveeraghuveer.com

वित्ताकर्षण वाढले की चित्ताकर्षण कमी होत जाते. प्रपंचाची ओढ अधिक असेल तर परमार्थाची तळमळ वाटत नाही.

पान - ३२४

साधेच वाईट वाटते. नित्याच्या व्यवहारात देखील आपल्याला हे चित्र दिसते. परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी गेलेला मुलगा जर ध्येय विसरून गेला, मौज मजेत, व्यसनामध्ये गुंतून गेला. सगळे पैसे संपवून केवळ सुंदर पत्नी घेऊन स्वदेशी परत आला तर त्याच्या वडीलांना जितके वाईट वाटेल, सोन्यासारखी संधि हातची दवडल्याने जेवढे दुःख होईल, त्यापेक्षा अनेक पटींनी दुःख संतांना होते.

★ हीरा जनम अनमोल था, कौडी बदले जाय। – कबीर

अशी ही कळवळ्याची जाती। लाभाविण करी प्रीती।

काहींना हा संताचा उपदेश समजतो, पटतो आणि त्या दृष्टीने ते आपल्या आचार विचारांमध्ये सुधारणा करतात. संत सांगतात की प्रपंचातील इतर सर्व कामांपेक्षा परमार्थ महत्त्वाचा। आणि त्यातही सर्व गोष्टी बाजूला सारून आत्मज्ञान करून घेणे हे आद्य कर्तव्य असावे. भोजनापेक्षा भजन महत्त्वाचे। परंतु सामान्यजनांना हे पटत नाही आणि पचतही नाही. भोजन-सरस। भजन नीरस

प्रपंच हा मीठासारखा असावा. अतिरेक नको

८ तास निद्रा। ८ तास प्रपंच। ८ तास परमार्थ।

(A) पहिला वर्ग – आत्मज्ञानाची तळमळ असते अशा लोकांना जरी आत्मदर्शन झाले नाही तरी त्यांच्या आयुष्याचे त्या अर्थाने चीज होते.

(B) दुसरा वर्ग – प्रपंचातील कर्तव्ये यथासांग पार पाडून उरलेला वेळ आत्मज्ञानाच्या साधनात घालवतात. (A) त्यांची अध्यात्माची ज्योत सतत तेवत असते. ते तीर्थयात्रा, भजनपूजन, सद्ग्रंथश्रवण करतात.

(C) तिसरा वर्ग – ज्यांचे सगळे लक्ष प्रपंचातच असते. उगीच कधीतरी देवदर्शन, प्रवचन इ. एखादा माणूस श्वास सुरू आहे म्हणून जिवंत आहे म्हणायचा इतकेच।

परंतु विवेकाचा उपयोग केला तर वरची पायरी चढता येते. आपल्या जीवनाची प्रत। दर्जा वाढवता येतो. हा विवेक वाढवण्यासाठीच उपनिषदांचा आधार घ्यावा.



© www.madhaveeraghuveer.com

षडाक्षरी मंत्र

रामकृष्ण हरि ।- वारकरी पंथामध्ये नित्य जपला जातो

वंदे मातरम् । पारतंत्र्य काळात देशासाठी प्राणार्पण करणाऱ्या क्रांतिकारकांचा हा परवलीचा शब्द होता

षडैश्वर्यसंपन्न भगवान —

ऐश्वर्यस्य समग्रस्य धर्मस्य यशसः श्रियः ।
ज्ञानवैराग्ययोश्चैव षण्णां भग इतीरणा ॥

सर्व प्रकारचे ऐश्वर्य, धर्म, यश, श्री, ज्ञान व वैराग्य या सहा दिव्य गुणांच्या समुदायाला मिळून भग अशी संज्ञा आहे. आणि या गुणांनी युक्त असणाऱ्या पुरुष देवतेला भगवान आणि स्त्रीरूपातील देवतेला भगवती असे म्हटले जाते.

हे झाले देवताबद्दल। परंतु मनुष्याला स्वतःची उन्नति करायची झाल्यास, ऐश्वर्यापर्यंत पोहोचायचे असल्यास त्यामध्ये ६ गुण असणे आवश्यक आहे.

उद्यमः साहसं धैर्यं बलं बुद्धिः पराक्रमः ।
षडेते यत्र तिष्ठन्ते स सर्वं प्राप्नुयात् पुमान् ॥

षड्दर्शने — न्याय - गौतम ऋषी
वैशेषिक - वैशेषिक ऋषी
सांख्य - कपिल मुनी
योग - पतंजली
(कर्मकांड) पूर्वमीमांसा - जैमिनी — अथातो धर्मजिज्ञासा
(शुद्धउपासना) उत्तरमीमांसा - बादरायण व्यास अथातो ब्रह्मजिज्ञासा

नास्तिक दर्शने -
१. जैन २. बौद्ध ३. चार्वाक -

© www.madhaveraghuveer.com

वेदांची षडंगे -

शिक्षा कल्पो व्याकरणं निरुक्तं छन्दसां तथा।
ज्योतिषामयनं चैव वेदाङ्गानि षडेव तु॥

१. शिक्षा - वर्णोच्चार शास्त्र, शुद्ध उच्चारण - य, ज, व।
२. कल्प - विधिविधान - ४ प्रकारची आहेत
३. व्याकरण - वैदिक साहित्यातील शब्दांची निर्मिती व शुद्धता।
४. निरुक्त - दुर्बोध वाटणाऱ्या शब्दांच्या अर्थाशी जुळणारी व्युत्पत्ति।
५. छंद - वेदांमध्ये आलेल्या विविध छंदांचा अभ्यास
६. ज्योतिष - ग्रहे, तारे, नक्षत्र, तिथी। यज्ञकर्म करताना आवश्यक ज्ञान
कपिलाषष्ठीचा योग - साठ वर्षांनी एकदा येतो - - -
भाद्रपद मास। कृष्णपक्ष। मंगळवार
रोहिणी नक्षत्र। व्यतिपात। षष्ठी - - -

षड्रस - मधुर, कटु, तिक्त, लवण, कषाय, आम्ल

षड्रिपु - काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर - - -
काम हे सर्वांचे मूळ आहे.
⑥ विषयांच्या आसक्तीमधून काम उत्पन्न होतो.
इच्छा पूर्ण झाली तर मद आणि
" " " नाही तर क्रोध येतो.
आपल्याला हवी असणारी वस्तू दुसऱ्याला मिळाली तर
मत्सर वाटतो.
आणि जेव्हा दोनमध्ये निवडा करण्याची वेळ येते तेव्हा
स्पष्ट निर्णय घेता न आल्यास मोह (संदेह, Doubt)
काम एव क्रोध एष.
ध्यायतो विषयान्पुंसः सङ्गस्तेषूपजायते।

देहाचे षड्विकार
आहेत, जायते, विपरिणमते, वर्धते, अपक्षीयते, नश्यति

⑦ व्यवहाराला जरूर असणारे काम, क्रोधादि विकार काही प्रमाणात

आवश्यक आहेत. मायकोला काही प्रमाणात वागू नये.

© www.madhaveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | |

षडंगन्यास - संकल्प - - करन्यास -
अंगुष्ठ, तर्जनी, मध्यमा, अनामिका
कनिष्ठिका, करतलकरपृष्ठ - - - -

गणितातील प्रमुख षड्विधि - - -
बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार
वर्गमूळ घनमूळ

नित्य पठनीय ६ ग्रंथ - - -
स्वशाखेचे उपनिषद, विष्णुसहस्रनाम, गीता
पुरुषसूक्त, रुद्र, सौरसूक्त - - -

सहा प्रकारचे गुरु - - -
प्रेरक — प्रेरणा देणारा
सूचक — सुचवणारा
वाचक — तोंडाने स्पष्ट सांगणारा
दर्शक — दाखवून देणारा
बोधक — बोध करवून देणारा
शिक्षक — उपदेशातून शिकवणारा -

मनःषष्ठानीन्द्रियाणि - ५ कर्मेंद्रिये + मन
५ ज्ञानेंद्रिये + मन
प्रकृतिस्थानि कर्षति।

नकार हा ६ प्रकारांनी दिला जातो।

मौनं कालविलम्बश्च प्रयाणं भूमिदर्शनम्।
भृकुट्यन्यमुखी वार्ता नकारः षड्विधा स्मृताः॥

©www.madhaveeraghuveer.com

आदर्श स्त्रीचे सहा गुण —

कार्येषु मंत्री करणेषु दासी।
भोज्येषु माता शयनेषु रम्भा।
धर्मानुकूला क्षमया धरित्री
भार्या च षाड्गुण्यवतीह दुर्लभा॥

महान परोपकारी —

रविश्चन्द्रो घना वृक्षा नदी गावश्च सज्जना:
एते परोपकाराय युगे देवेन निर्मिता:।

सहाजणी मातेसमान —

राजपत्नी गुरो: पत्नी मित्रपत्नी सती तथा।
पत्नीमाता स्वमाता च सर्वास्ता मातर: स्मृता:॥

प्रश्नोपनिषदातील सहा ऋषींचे सहा प्रश्न॥

१. कबन्धी — या सर्व प्रजा कुणापासून व कशा निर्माण झाल्या?
२. भार्गव — या प्रजांमध्ये कोणकोणते देव इंद्रिये म्हणून राहतात?
३. आश्वलायन — प्राण या शरीरात प्रवेश कसा करतो?
४. सौर्यायणी — जागते कोण? निजते कोण? स्वप्न कोण पाहते.
५. सत्यकाम — ओंकार उपासनेचे फळ काय?
६. सुकेशा — षोडश कलांनी युक्त पुरुषाला आपण जाणता का?

षड्लिंग। १. उपक्रमोपसंहार —
प्रारंभी प्रतिपाद्य विषय मांडणे व
अंती गेल्या पुन्हा सारत्वाने त्याचा पुनरुच्चार करणे.
गीता २ रा व १८ वा अध्याय —
दासबोध — कोठे पुसती कोण ग्रंथ?
जाले साधनाचे फळ ---

२. अभ्यास — प्रतिपाद्य विषय वारंवार ठसवणे.
तस्मात् युध्यस्व भारत। विवरलेचि विवरावे

३. अपूर्वता — श्रुतिप्रामाण्य असणे हे अपूर्वतेचे द्योतक आहे.
भगवद्वाक्याविरहित नसे। बोलणे येथीचे॥

© www.madhuraveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | |

४. फल - प्रतिपाद्य विषयाच्या ज्ञानाने ज्या वस्तु/विषयाची प्राप्ती होते त्याला फल म्हटले आहे.
मोहनाश, हे गीताभ्यासाचे फल आहे.
'अहं ब्रह्मास्मि' हे छांदोग्य उपनिषदाचे फल आहे

५. अर्थवाद - प्रतिपाद्य विषयाची स्तुति करणे
उपनिषदे - ब्रह्मवस्तूची स्तुति करून महत्त्व पटवले आहे.

६. उपपत्ति - सिद्धांत स्पष्ट करण्यासाठी दृष्टांत देणे.
छांदोग्यात सोने, माती - कार्य हे कारणाहून भिन्न नसते.
ब्रह्म अद्वितीय आहे.

वेदांची अंगे — कल्प - ४ प्रकारचे विधिविधान
१. श्रौतसूत्रे - यज्ञविधिचे नियम - जमीन, उतार, विटा, मंत्र, ऋत्विज- शाखा, हविर्द्रव्याची शुचिता, दक्षिणा।
२. धर्मसूत्रे - सामाजिक व राजकीय नियम
राजा व प्रजा यांचे आदर्श आचरण
३. गृह्यसूत्रे - गृहस्थाश्रमाचे नियम - सोळा संस्कार
अतिथिधर्म, शेजारधर्म, मानवधर्म
४. शुल्बसूत्रे - श्रौतसूत्रांबरोबर येतात.
अग्निवेदी बांधण्याची मापे येतात.
प्रत्येक यज्ञ-यागाचे कुंड वेगवेगळ्या आकाराचे असते.

© www.madhaveeraghuveer.com

संख्या आणि संज्ञा

॥श्री॥

न तत्र सूर्यो भाति न चन्द्रतारकं
नेमा विद्युतो भान्ति कुतोऽयमग्निः।
तमेव भान्तमनुभाति सर्वं
तस्य भासा सर्वमिदं विभाति।

कठोपनिषद--

सूर्य, चंद्र, तारे, नक्षत्रे, वीज यापैकी कोणीही त्या आत्म्याला प्रकाशित करू शकत नाहीत. मग हा अग्नि तरी कसा बरे प्रकाशित करू शकेल? आत्मा स्वयंप्रकाश आहे. त्याच्याच प्रकाशाने हे सर्व विश्व प्रकाशते. त्याच्याच तेजाने हे विश्व उजळून निघते.

थोडक्यात अशा स्वयंप्रकाश आत्म्याचा प्रकाश म्हणजेच हे विश्व आहे. अनेक उपनिषदांमध्ये आलेला हा मंत्र मोठा अर्थगंभीर आहे. काश या धातुचा अर्थ दिसणे, प्रकट होणे, प्रकाशणे असा आहे. त्याला 'प्र' हा उपसर्ग लागल्यामुळे प्रकर्षाने प्रकट होणे – Prominently असा अर्थ होतो. आणि स्वयं या शब्दातून आपणहून, विनाकष्ट, सहज असा अर्थ स्पष्ट होतो. स्वयम्भू म्हणजे स्वतः होऊन प्रकट झालेला --- त्याला प्रकट होण्यासाठी दुसऱ्या कोणाच्या मदतीची आवश्यकता नसते. उलट त्याच्यामुळेच इतर सर्वांना तेजाचा, प्रकाशाचा, चैतन्याचा, जाणीवेचा पुरवठा होतो.

आपण देवापुढे निरंजन, समई, कापरादिवा लावतो. किंवा इलेक्ट्रिकचा दिवा, ट्यूब लावतो. Torch लावतो, रोषणाई करतो. या सर्वांना शक्तीचा पुरवठा बाहेरून होतो. इतकेच कशाला, आता अंधार पडला आहे. दिवा लावावा ही जाणीव देखील होते ती सुद्धा त्याच्याच मुळे! म्हणजे बुद्धिमध्ये प्रकाश टाकणारा देखील तोच आहे. अशा त्या स्वयंप्रकाश आत्म्याच्या प्रकाशामुळे, त्या दिव्य ज्योतिमुळेच हे सर्व विश्व प्रकाशित होते. आपल्याला ज्या वस्तू दिसतात त्यासाठी (पुस्तक, घर, डोंगर, नद्या, तुम्ही, आम्ही) जाणीवेची गरज आहे. जाणीव म्हणजेच ज्ञान आणि म्हणूनच वेदांतामध्ये जाणीवेला प्रकाश, ज्ञानाचा प्रकाश म्हटलं आहे. जाणीव चिन्मय आहे. जिवंत आहे. जाणणे हा



© www.madhaveeraghuveer.com

तिचा सहजधर्म आहे. ती कमी अधिक व्यापक असते ज्या मानाने तिचा विस्तार असतो त्या मानाने त्या त्या माणसाच्या ठिकाणी ज्ञानाचा प्रकाश आढळतो. जेव्हा ही जाणीव विशाल होत होत सर्वव्यापी बनते त्या वेळी तिला जाणायला इतर वस्तु उरतच नाहीत.

यज्ज्ञात्वा नेह भूयोऽन्यज्ज्ञातव्यमवशिष्यते।

अशा वेळी ती स्वतःच स्वतःला जाणते, प्रकाशित करते.

याच अर्थाने आत्मा सर्व वस्तुंना जाणतो किंवा प्रकाशित करतो. परंतु कोणतीही वस्तु आत्म्याला प्रकाशित करु शकत नाहीत. अगदी सूर्य, चंद्र, अग्नि इ.

रवि शशि अग्नि नेणती ज्या रुपा।
स्वप्रकाशरुपा नेणे तुज नमो।

किंवा — न तत्र भासयते सूर्यो
न शशांको न पावकः। प्रवेश करुन

हा एकमेवाद्वितीय परमात्मा अनेक वस्तूंमध्ये प्रगट होतो. निरनिराळी रुपे धारण करतो. समुद्रामधून लाटा उत्पन्न होतात. समुद्राच्याच आधारावर उभ्या रहातात व समुद्रामध्येच विलीन होतात. त्याचप्रमाणे विश्वरुपाने प्रगट होणे आणि पुन्हा नाहीसे होणे हा त्या परमात्म्याचा, जाणिवेचा विलास / खेळ आहे.

ही झाली ज्ञानी पुरुषाची दृष्टी. पण आपल्यासारख्या सामान्य माणसाने यापासून काय व कसा बोध घ्यायचा? त्यासाठी म्हणजेच आत्म्याचे सर्वव्यापीपण समजावून घेण्यासाठी दोन मार्ग आहेत.

(१) आपल्या जीवनात ज्या ज्या गोष्टी (चांगल्या / वाईट) घडतात. त्या सर्व त्या आत्म्याच्या इच्छेनेच घडतात. सर्व जगाला चालवणारी एक सत्ता आहे. आणि ती ज्ञानमय असल्याने तिच्या हातून चूक घडतच नाही हे लक्षात ठेवून आपल्या चित्ताची समता ढळू देऊ नये.

(२) जर हे संपूर्ण विश्व म्हणजे त्या आत्म्याचाच विलास असेल तर आपणही त्या विलासाचीच एक लहर आहोत



© www.madhaveeraguweer.com

म्हणून आपल्याच जीवनाकडे एक खेळ म्हणून पहायला शिकावे. खेळ म्हटले की कधी हार तर कधी जीत होणार यश। अपयश दोन्हीही तात्पुरती असल्याने आपले समाधान भंगू देऊ नये, पण अगदी खेळ झाला तरी तो डाव आपल्या अंगावर येऊ देऊ नये. खेळाच्या नियमाप्रमाणे त्यात यश मिळवण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. आणि मग होईल तसे होऊ द्यावे. जे लाभेल ते खिलाडूपणे स्वीकारावे.

भगवंत जसा या विश्वाचा अवाढव्य खेळ खेळतो पण त्यातील सुख दुःखे त्याला बाधत नाहीत. त्याप्रमाणे आपण देखील आपल्या जीवनात येणाऱ्या जय पराजयाचा आनंदाने स्वीकार करावा.

आत्मानंद म्हणजे शाश्वत सुख आणि शांति!

परंतु माणसाची जिज्ञासा त्याला स्वस्थ बसू देत नाही. विश्वाच्या कोणत्याही बाजूकडे बारीक नजरेने पहायला गेलो तर त्यात ते गूढ, अगाध, अनंत आहे हे समजते. एक साधे माणसाचे शरीर जरी अभ्यासाच्या दृष्टीने पहायला गेलो तर त्याची रचना, गुंतागुंत आणि तरीही त्यातील नियोजन पहायला लागलो तर त्या शक्तीच्या चातुर्याचे नवल वाटते. आपण असे मानतो की डोक्यातील मेंदू हे बुद्धीचे स्थान आहे परंतु प्रत्यक्ष काढून पाहिला तर त्यात मांसाच्या नाड्यांशिवाय काहीही नाही. मग हा मांसाचा गोळा बुद्धी कशी प्रगट करतो हे गूढच आहे. बरे! एवढ्या अफाट माणसांमध्ये विविधता तरी किती आहे. एक काही दुसऱ्यासारखा नाही. आणि हाच नियम वनस्पती, प्राणी, पक्षी, मासे यांना लागू आहे. अहो, अगदी एक ठसा काही दुसऱ्यासारखा नसतो. माणसाच्या हाताचे ठसे प्रत्येकाचे वेगळे आहेत असे अनंत नमुने पाहिले की त्याचा आकार आणि नाश व उत्पत्ती शक्तीचा अखंड घटत आणि पुन्हा या शक्तीचा अंमल [illegible] व्यवस्थित चालतो. कोठेही गडबड नाही गोंधळ नाही भोंगळपणा नाही. सारे काही अचूक आणि शिस्तबद्ध!

© www.madhaveeraghuveer.com

MAR
APR
MAY
JUN

भगवंताची ही शक्ती अगाध अतर्क्य, भव्य अन् प्रचंड असल्याने तिच्याशी मिळते जुळते घ्यायला हवे. तिच्यापुढे नमते घ्यायला हवे. भिऊन वागायला हवे. तिचा आदर करायला हवा. कारण मनुष्य देखील त्याच शक्तीचा आविष्कार आहे. त्या शक्तीशी समरस होण्यातच त्याचे समाधान दडलेले आहे.

याची जाणीव आमच्या पूर्वजांना होती. आमच्या ऋषींनी या शक्तीची स्तुति केली. त्यांना उद्देशून सूक्तगायन केले. विशाल आकाशात दिसणाऱ्या चंद्र - सूर्य - ग्रह - नक्षत्र - तारे यांचा अभ्यास केला.

त्यांच्या भ्रमणकालावरून, कक्षेवरून, त्यांना सुयोग्य अशी नावे दिली. ग्रह वेगळे, तारे वेगळे आणि नक्षत्रे वेगळी! न क्षरति इति नक्षत्रः। अशी २७ नक्षत्रे आहेत आणि त्यांचा स्वामी आहे तो चंद्र!

नक्षत्राणामहं शशी। असे गीता सांगते. तर उपनिषदांमध्ये 'सुधाकर' अशा त्याला उपमा। अशा क्रूर ग्रहांचाही उल्लेख येतो. अशा २७ नक्षत्रांमध्ये १२ राशी विभागल्या आहेत. म्हणजेच प्रत्येक राशीमध्ये सव्वादोन नक्षत्रे येतात.

१. अश्विनी २ भरणी ३. कृत्तिका ४. रोहिणी ५. मृग ६. आर्द्रा ७. पुनर्वसु ८. पुष्य ९. आश्लेषा १०. मघा ११ पूर्वा १२. उत्तरा १३. हस्त १४. चित्रा १५. स्वाती १६ विशाखा १७. अनुराधा १८. ज्येष्ठा १९. मूळ २० पूर्वाषाढा २१. उत्तराषाढा २२. श्रवण २३. धनिष्ठा २४. शततारका २५. पूर्वा भाद्रपदा २६. उत्तरा भाद्रपदा २७. रेवती.

नक्षत्रे व त्यांचा मानवी जीवनावर होणारा परिणाम यांचा परस्परसंबंध याचाही सखोल अभ्यास केला होता. या अभ्यासातूनच पुढील भाकितेही करता येऊ लागले. म्हणजे आडाखेही बांधता येऊ लागले. भविष्यात घडणाऱ्या शुभ अशुभ घटनांचाही वेध घेता येऊ लागला.



© www.madhaveeraghuveer.com

या सर्वांचे एक स्वतंत्र शास्त्र निर्माण झाले. ते म्हणजे पंचांग
तिथी —— वार —— नक्षत्र —— योग —— करण
या सर्वांना एकत्रितपणे पंचांग म्हटले जाते.

अभ्यासाची ५ अंगे ———

१. निरीक्षण - Keen Observation.
२. अभ्यास - पुनः पौन्येन कुर्वन्ति इति अभ्यासः।
३. लेखन - टिपणे - Notes.
४. चर्चा - परस्पर विचारांची देवाणघेवाण.
एकरूपतो विद्यार्थी.
५. विद्वानांचे मार्गदर्शन - ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः।

शरीरातील पंचकोश — विवेकचूडामणि - १५० नंतर

१. अन्नमय
२. प्राणमय
३. मनोमय
४. विज्ञानमय
५. आनंदमय

पंचक्लेश - अविद्या, अस्मिता, राग, द्वेष, अभिमान

पंचखाद्य - खारिक, खोबरे, खडीसाखर, खिसमिस, खसखस.

पंचामृत - दूध, दही, तूप, मध, साखर

पंचगव्य - दूध, दही, तूप, गोमय, गोमूत्र.

पंचकन्या - अहल्या द्रौपदी सीता तारा मंदोदरी तथा
पंचकन्या स्मरेन्नित्यं महापातकनाशनम्।

पंचज्ञानी —
कृष्णो योगी शुकस्त्यागी नृपो जनकराघवौ।
वसिष्ठः कर्मकर्ता च पञ्चैते ज्ञानिनस्मृताः।।

©www.madhaveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | |

## पंचप्राण –

प्राण – नाकावाटे सरळ आत जातो. संचयस्थान – हृदय
अपान – नाभिखाली संचार – मलमूत्रत्याने बाहेर – गुदद्वार
व्यान – संपूर्ण शरीरभर संचार
समान – अन्नपचन, रक्त रसायन निर्माण करतो. समतोल. (उष्ण/शीत)
उदान – शरीरातील विजातीय द्रव्ये बाहेर फेकतो. Toxins.

## उपप्राण –

नाग — ढेकर –
कूर्म — पापणीची हालचाल – त्राटक्या अभ्यास करा)
देवदत्त – जांभई देणे – थकवा दूर होतो
धनंजय – उचकी / हृदयाच्या झडपेची हालचाल.
कृकल – शिंकणे. डोकेदुखी थांबते.

पंजाब – पंच + आप — झेलम, चिनाब, रावी, बियास, सतलज

## पाच भारतीय महाकाव्ये –

रघुवंश – कालिदास
कुमारसंभव – कालिदास
किरातार्जुनीय – भारवी
शिशुपालवध – माघ
नैषधीयचरित – हर्ष

## जगातील पाच महाकाव्ये –

रामायण – वाल्मीकि
महाभारत – व्यास
इलियड – होमर (ग्रीक)
ओडिसी – " "
पॅराडाइज लॉस्ट – मिल्टन

© www.madhaveeraghuveer.com

सरा बीभत्सा हरा दुर्गराते ।
धरा श्रीभरा हरा अंतराते ॥

08 पंचमहाभूतात्मक लिंगे व देवालये---

| | |
|---|---|
| पृथ्वीलिंग – | कांचिवरम् |
| 09 आप | जंबुकेश्वरम् |
| तेज | अरुणाचलम् |
| 10 वायु | कालहस्ती |
| आकाश – | चिदंबरम् |

11

पंचमहासरोवरे —

| | |
|---|---|
| 12 बिंदुसरोवर – | सिद्धपुर — मातृगया |
| नारायण " | कच्छ प्रांत |
| 13 मानस | हिमालय |
| पुष्कर | अजमेरजवळ |
| 14 पंपा | हॉस्पेटजवळ – |

15 पंच महायज्ञ – कंडनी पेषणी चुल्ली उदकुम्भी च मार्जनी ।
पंच सूना गृहस्थस्य ताभिः स्वर्गं न विन्दति ॥

16 ब्रह्मयज्ञ – नित्य अध्ययन व अध्यापन
पितृयज्ञ – वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे
17 देवयज्ञ – प्रत्येकामध्ये परमेश्वरी अंश याची जाणीव---
भूतयज्ञ – माझे कर्तृत्व शून्य — परमेश्वरच सर्वकर्ता ।
18 नृयज्ञ – अतिथिसत्कार – समाजाचे देणे । Respect Others.

19 पाच पांडव – सद्गुण X दुर्गुण
दृश्यन्ते भुवि भूरि निम्बतरवः कुत्रापि ते चन्दनाः ।
20 पाषाणैः परिपूरिता वसुमती वज्रो मणिर्दुर्लभः ।
श्रूयन्ते करटारवाश्च सततं चैत्रे कुहूकूजितं
तन्मन्ये खलसंकुलं जगदिदं बिरलाः क्षितौ सज्जनाः ॥

दुर्भर असे पंच जकार---
जामाता जठरं जाया जातवेदो जलाशयः ।
पूरिता नैव पूर्यन्ते जकाराः पञ्च दुर्भराः ॥



© www.madhaveeraghuveer.com

पंच लकार असणारी स्त्री---
अनुकूला विमलांगी कुलजा कुशला सुशील संपन्नाम्।
पंच लकारा भार्या पुरुषः पुण्योदयात् लभते॥

पंचकल्याणी घोडा--
चारी पाय गुडघ्यापर्यंत पांढरे व चेहऱ्यावर
पांढरा पट्टा असणारा अश्व शुभलक्षणी असतो.

वृक्षाची पाच अंगे उपयुक्त असतात -
साल, पान, फळ, फूल, मूळ
दालचिनी, तमालपत्र, जायफळ, लवंगफूल, सुंठ

पंच तन्मात्रा, पाच आसक्ती --
कुरंग मातंग पतंग भृंग मीना:
शब्द स्पर्श रूप रस गंध
हताः पंचभिरेव पंच॥

पंचायतन —
आदित्यं गणनाथं च देवीं रुद्रं च केशवम्।
पंचदैवतमित्युक्तं सर्वकार्येषु पूजयेत्॥

जीवनाचे पंचशील -
प्रत्यय, प्रबोध, प्रयत्न, प्रयोगशीलता, प्रसन्नता.

पाचामुखी परमेश्वर - Great men think alike.
पाच बोटे आत वळवली तर मूठ तयार होते.

पंचनामे वर्ज्य - आत्मनाम, गुरुनाम, कृपणनाम
४ ज्येष्ठापत्यनाम ५. पत्नीनाम

सुखाने निद्रा करणारे - ऋग्वेद - खिलसूक्ते -

© www.madhaveeraghuveer.com

08 अगस्तिर्माधवश्चैव मुचकुन्दो महामुनिः ।
कपिलो मुनिरास्तिकः पञ्चैते सुखशायिनः ॥

09

पाच गोष्टी प्रगट करू नयेत---

10 अर्थनाशं मनस्तापं गृहे दुश्चरितानि च ।
वंचनं चापमानं च मतिमान्न प्रकाशयेत् ॥

11

प्राप्त धनाचा विनियोग पाच प्रकारे करावा---

12 १. धर्माय २. यशसे ३. स्वजनाय ४. अर्थाय ५. कामाय

13 वैराग्याचे पाच प्रकार -

१. त्रासवैराग्य २. स्मशानवैराग्य ३. मैथुन वैराग्य
14 ४. प्रसूतिवैराग्य ५. शुद्ध ज्ञानजनित वैराग्य --

15

16

17

18

19

20

© www.madhaveeraghuveer.com

(५) संख्या आणि संज्ञा

॥ श्री ॥

## - पंचमहाभूते -

नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः।
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः॥

सर्वपरिचित असणारा हा गीतेतील श्लोक।

आत्मवस्तूचे वर्णन करणारा। अर्जुनाच्या मनात उद्भवलेल्या मोहाची / शोकाची निवृत्ति करण्यासाठी भगवान श्रीकृष्ण त्याला उपदेश करतात की तुझ्या मनाला जी टोचणी लागली आहे की मी स्वजनांना कसे युद्धात ठार करू? मला त्यामुळे पाप लागेल. या विषादातून बाहेर काढण्यासाठी भगवान त्याला सांगतात की तू ज्यांना मारणार आहेस ती तर त्यांची शरीरे आहेत आणि या नाशिवंत शरीरामध्ये राहणारा आत्मा तर अमर आहे. त्याला मारणे सर्वथा अशक्य आहे. आत्मा अविनाशी आहे. तू कितीही शूरवीर असलास तरी तू फार तर शरीरांना नष्ट करू शकशील पण चिरंतन अशा आत्म्याला नाही. अरे तूच काय, पण या विश्वातील कोणत्याही दृश्य वस्तूला या आत्म्याचा नाश करणे शक्यच नाही कारण या सृष्टीतील वस्तू, पदार्थ व्यक्तींचा विध्वंस करण्यासाठी आपण जी काही साधने वापरतो ती सारी या आत्म्यामुळे निष्प्रभ ठरतात. म्हणजे कोणतेही शस्त्र याच्यावर वार करू शकत नाही. आणि याला जाळू शकत नाही. पाणी याला बुडवू तर शकतच नाही पण ओले सुद्धा करू शकत नाही. किंवा वारा याला सुकवू शकत नाही. हा अर्थ आपणा सर्वांना साधारण माहिती आहे. परंतु एवढ्यापुरताच हा मर्यादित नाही याला खूप मोठा व्यापक असा परिप्रेक्ष्य आहे. श्लोकातील चार चरणामध्ये चार महाभूतांची हालचाल दिसून येते. कोणतेही शस्त्र घ्या त्यामध्ये प्राधान्याने पृथ्वीतत्त्व आहे. म्हणजे भाला-तलवार, धनुष्य-बाण, चक्र गदा या सर्वांना पृथ्वी तत्त्वाचा आधार आहे. अगदी

अश्मयुगात जी शस्त्रे असे वापरली जायची ती देखील पाषाणापासून म्हणजे पृथ्वीतत्वापासून बनवलेली होती. आणि इतर काही, धातुपासून, लाकडापासून म्हणजेच सर्व पदार्थांपासून बनवलेली आहेत अर्थात पृथ्वी तत्वाचा इथे आधार घेतला आहे.

पावक म्हणजे अग्नि! या अग्निमध्ये कोणत्याही वस्तूचे भस्म करून टाकण्याचे सामर्थ्य आहे. परंतु इतका सर्वशक्तिमान अग्निदेखील या आत्मतत्वाला जाळू तर शकतच नाही पण स्पर्शदेखील करू शकत नाही. त्याचप्रमाणे जलतत्व म्हणजेच आप. म्हणजेच पाणी! पाणी हे जितके संजीवक आहे तितकेच ते संहारक देखील असते. पाणी जगवते, तसेच ते मारते पण कुणाला तर या सृष्टीतील प्राण्यांना वस्तूंना! आत्मवस्तू मात्र या सर्वांच्या पलीकडे आहे. त्याचप्रमाणे मारुत म्हणजेच वायुतत्व या सृष्टीमध्ये उलथापालथ घडवून आणू शकते. मात्र आत्मवस्तूला मात्र तसूभर देखील हलवण्याचे सामर्थ्य वायूत नाही. ही चारही महाभूते त्या आत्म्याचे काहीही बिघडवू शकत नाहीत. कारण हा आत्मा अर्थात परमात्मा त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ आहे. बलवान आहे. या सगळ्याचा निर्माता आहे. अजर आहे, अमर आहे.

मात्र आज आपण या आत्म्याचा नाही तर या पंचमहाभूतांचा अभ्यास करणार आहोत. त्यांचे गुणधर्म, शक्ती. मर्यादा आणि कार्य, व्यापकता यांचा विचार करणार आहोत. गीतेतील या मंत्रामध्ये चारच भूतांचा विचार केलेला दिसतो पाचवे भूत यात अंतर्भूत नाही असे वरवर वाटू शकते. ते आहे आकाश! ते का बरे नसावे? तर ते दिसत नसेल तरी आहे. आणि त्याचं महत्व तर ते सर्वात मोठे काम करते आणि ते म्हणजे या सर्वांना आपापले काम करण्यासाठी Space देते. अवकाश देते, जागा देते.

जे अत्यंत सूक्ष्म आहे. जे दिसत नाही पण आहे. असीम तरल आहे, व्यापक आहे. अशा या पंचमहाभूतांचा विचार आपण करणार आहोत.

© www.madhaveeraghuveer.com

MAR APR MAY JUN

या सृष्टीच्या निर्मितीपूर्वी काहीही नव्हते. केवळ एकच एक परब्रह्म होते. ते एकाकी होते. त्याला एकट्याला करमेना एकाकी न रमते। त्याच्यामध्ये संकल्प उठला 'एकोऽहं बहुस्याम् प्रजायेयम्।' मी एकटाच आहे तो मी आता अनेकरूपाने प्रकट होतो. संकल्प उठला म्हणजेच स्फुरण झाले. म्हणजेच हालचाल झाली. त्या हालचालीमुळे एक ध्वनि निनादला. तो होता प्रणवध्वनि म्हणजेच ॐकार। अ.उ.म. त्या परब्रह्माचीच शक्ती म्हणजे मूळमाया। त्यातून क्रमाक्रमाने गुणक्षोभिणी माया झाली. सत्व, रज, तम या तीन गुणांची उत्पत्ति झाली. त्यानंतर एकेक गोष्टी घडत गेल्या. अशाच एका पायरीवर आकाशाची निर्मिती झाली. आकाश म्हणजे अवकाश। म्हणजेच Space।

सृष्टीची निर्मिती करायची तर त्यासाठी प्रथम जागा हवी। म्हणून आकाश निर्माण झाले. या आकाशात हालचाल झाली त्यातून वायु निर्माण झाला. वायुच्या घर्षणाने तेज निर्माण झाले तेजातून आप म्हणजे जल निर्माण झाले आणि हेच पाणी जेव्हा अखळले तेव्हा त्यातून पृथ्वीची निर्मिती झाली.

यानाच महाभूते अशी संज्ञा मिळाली. भूत म्हणजे झालेले, उत्पन्न झालेले, घडलेले। अशी महाभूते ५ आहेत म्हणून पंचमहाभूते। Great Elements. ही सूक्ष्म महाभूते ~~सर्वात आकाश हे अतिशय सूक्ष्म~~ आहे. आहेत. या सूक्ष्म महाभूतांना अपंचीकृत महाभूते म्हटले आहे. प्रत्येक भूताचे स्वरूप निरनिराळे आहे. हे संपूर्ण ब्रह्मांडच पंचभूतात्मक आहे. त्यामुळे या सृष्टीतील सर्व जीव हे पंचभूतात्मक आहेत. ही पंचमहाभूते दृश्य विश्वाच्या आतबाहेर गच्च भरून राहिली आहेत. म्हणजेच दृश्य विश्व आणि पंचमहाभूते यांच्यामध्ये ऐक्याची मैत्री आहे अगदी आपल्या देहाला देखील पांचभौतिक देह असेच म्हटले जाते.

© www.madhaveeraghuveer.com

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| भूतपंचक | आकाश - | वायु | तेज | आप | पृथ्वी |
| विषयपंचक | शब्द | स्पर्श | रूप | रस | गंध |
| ज्ञानेंद्रिय | कान | त्वचा | डोळे | जीभ | नाक |

पंचभूतांचे संबंधित विषय

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| आकाश - | काम, | क्रोध, | शोक, | मोह, | भय |
| वायु - | चळण | वळण | प्रसारण | निरोध, | आकुंचन |
| तेज - | भूक | तहान | आळस | झोप | मैथुन |
| आप - | रेत | रक्त | लाळ | मूत्र | स्वेद |
| पृथ्वी - | अस्थि | मांस | त्वचा | नाडी | रोम |

या सृष्टीनिर्मितीचा प्रवास वरून खाली म्हणजेच सूक्ष्मापासून स्थूलाकडे होतो तर याला दासबोधामध्ये उभारणी म्हटले आहे तर संहारणीच्या वेळी उलट्या क्रमाने हा पसारा आवरला जातो म्हणजे पृथ्वी जलतत्वात, जलतत्व तेजतत्वामध्ये, तेज वायुमध्ये तर वायु आकाशामध्ये आणि आकाशाला कवेत घेणारा तो परमात्मा आहे.

भूजल तेज समीर ख रवि शशी काष्ठादिकां असे भरला ।
स्थिरचर व्यापुनि अवघा तो ~~परमात्मा~~ जगदात्मा दशांगुळे उरला ॥

असा हा पंचमहाभूतांचा खेळ चालतो.

या पंचभूतांचे पंचीकरण झाले तेव्हा प्रत्येक भूतामध्ये इतर चारही सामावली गेली म्हणजे पृथ्वी~~तत्त्वा~~मध्ये पृथ्वी तत्व ५० % आणि इतर ४ भूत १२.५० % आहेत: असेच इतर भूतामध्येही आहेत. कशाला कोणते नाव द्यायचे किंवा ओळखायचे याचे सरळ, साधे सोपे मार्गदर्शन दासबोधात आहे.

१ जे जे जड आणि कठीण । ते ते पृथ्वीचे लक्षण ।
३ जे जे उष्ण आणि सतेज । ते ते जाणावे तेज
४ चेतन्य आणि चपळ । ते हा वायोचि केवळ
५ शून्य आकाश निश्चळ । आकाश जाणावे ।
२ मृदु आणि ओलेपण । तितुके आप



© www.madhaveeraghuveer.com

नावे
पृथ्वी, धरा, वसुधा, अवनी, क्षमा, वसुमती
जल, नीर, आप, तोय, उदक, जीवन, अंबु, सलील, जीवन
तेज, उष्ण, स्फुलिंग, वैश्वानर, जातवेद, अनल (पावक), वह्नि
वायु, समीर, अनिल, मातरिश्वा, समीर, पवन: पवतामस्मि
आकाश, अंबर, गगन, नभ, अवकाश

गदिमांच्या गीतामध्ये हीच भूते वेगळ्या नावाने भेटतात
माती पाणी उजेड वारा
तूच मिसळीशी सर्व पसारा।
आभाळाच मग ये आकारा।
तुझ्या घटांच्या उतरंडीला नसे अंत ना पार।
नाहीतरी खरेच आहे. या चार भूतांच्या मिश्रणामधून जे काही आकाराला येते तो घटच आहे. आणि ह्या घटाच्या आत बाहेर आकाशच व्यापून आहे. म्हटले तर सर्व काही पूर्ण आहे आणि म्हटले तर सर्व शून्य आहे
अंत: पूर्ण: बहि: पूर्ण: सर्व: पूर्ण: इवार्णवे।
अन्त: शून्य: बहिशून्य सर्व: शून्य इवाम्बरे।
समुद्रातील घड्याच्या आतही पाणी अन् बाहेरही पाणीच असते आणि रिकाम्या वाटणाऱ्या घड्यातही आकाश आहेच.
या सृष्टीमधील प्रत्येक जीव हा पंचमहाभूतांच्या Permitation & Combination पासून बनला आहे.
मानवी शरीरात तर हे अधिक स्पष्टपणे, ठळकपणे जाणवते. आपल्या शरीरामध्ये जो काही घट्ट आहे, Solid आहे, ज्याला वजन आहे ते ते सारे काही पृथ्वीतत्त्व आहे. अस्थी, मांस, मज्जा, रोम, नाड्या, त्वचा हे सर्व घटक पृथ्वीतत्त्वाचे म्हणूनच पाच विषयांनी युक्त आहे. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध - -
त्यानंतर आप किंवा जल तत्त्व। म्हणजेच या शरीरात जे काही प्रवाही आहे Liquid / Fluid आहे ते सारे जलच।
रक्त, रस, मूत्र, वीर्य, स्वेद, लाळ हे सर्व ओले आहे.
तेज - डोळ्यातील, बुद्धीतील चमक, पोटातील आग

© www.madhaveeraghuveer.com

वायु – श्वासनलिका, Lungs, घ्राणेंद्रिय या इंद्रियांमधून वायु संचार करत असतो. शिंक, उचकी, ढेकर, जांभई या क्रियांच्या वेळी वायुच कार्यरत असतो.

आकाश – आपले शरीर जरी घट्ट असले तरी त्यामध्ये कितीतरी पोकळी आहे आणि या पोकळीचे प्रमाण जोवर मर्यादेत असते तोवर आरोग्य उत्तम राहते. जेव्हा नाकातील हाड, मांस वाढते. मणक्यातील Gap कमी जास्त होते, तेव्हा आकाशतत्त्व बिघडते आणि मग समस्या सुरू होते. हे आकाश अत्यंत सूक्ष्म आहे आणि म्हणूनच सर्वव्यापी आहे.

या पंचमहाभूतांमुळेच हे विश्व सुरळीत सुरू आहे. त्याचा समतोल जोवर साधला जातो तोवर, सगळे विश्व आणि शरीर शिस्तीत सुरू असते. त्यासाठी त्याच्याविषयी कृतज्ञता हवी आणि आपल्या संस्कृतीमध्ये याचीही सोय आहे. आपण आपल्या घरातील कोणत्याही पूजेच्या वेळी याला वंदन करतो आणि त्याचे आशीर्वादही घेतो.

पूजा – आसन, कलश, समई/निरांजन, उदबत्ती, वातावरण प्रोक्षण करतो ती पंचभूतांची पूजा असते.

अथर्वशीर्ष – त्वं भूमिरापोऽनलोऽनिलो नभः।
गीता – भूमिरापो नलो वायुः खं मनो बुद्धिरेवच।
तैत्तिरीय उपनिषद – तस्माद् वा (एतस्मादात्मन आकाशः सम्भूतः)
(पान-239) आकाशात् वायुः। वायोरग्निः। अग्नेरापः।
अद्भ्यः पृथिवी। पृथिव्या ओषधयः।
ओषधिभ्यः अन्नम्। अन्नात् पुरुषः।
स वा एष पुरुषः अन्नरसमयः।
अन्नमय कोश – बाह्य देह -

© www.madhaveeraghuveer.com

08 पंचमहाभूतांचे प्रमाण प्रत्येकाच्या शरीरामध्ये भिन्न असते. अर्थात
अध्यात्मसाधनेच्या फलस्वरूप म्हणून भिन्न भिन्न अनुभव येतात.
09 ज्यांच्या प्रकृतित आकाशतत्त्व अधिक त्यांना नाद ऐकू येतात.
" " तेज " " प्रकाश
10 " " वायु " " स्पर्श
" " आप " " स्वाद
11 " " पृथ्वी " " गंध
आपण योग्य मार्गावर असल्याची खूण यातून पटते.

12

13

14

15

16

17

18

19

20



© www.madhaveeraghuveer.com

05 MARCH

THURSDAY

WEEK 10

DAY 064-301

DATE 05.03.2015

MARCH 2015

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

(२)

संख्या आणि संज्ञा

॥ श्री ॥

हे विश्वचि माझे घर। ऐसी ज्याची मति स्थिर।
किंबहुना चराचर। आपणचि झाला॥

खरोखर कैवल्यपदापर्यंत पोहोचलेल्या महात्म्यांना आपपर असा भाव उरतच नाही. त्यांच्या दृष्टीने या सृष्टीतील भेद सरून जातो आणि अभेद अशा परब्रह्माचाच त्यांना अनुभव येतो. त्यांना सर्वत्र केवळ आत्मतत्त्वच दिसत असते.

सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि।
ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः॥

किंवा

अयं निजः परोवेति गणना लघुचेतसाम्।
उदारचरितानां तु वसुधैव कुटुम्बकम्॥

सर्व चराचर सृष्टीविषयी त्यांच्या मनामध्ये कळकळ असते. त्यांच्यासाठी हे संपूर्ण विश्व हा एक परिवारच आहे. परंतु परिवार म्हटला म्हणजे घर आले आणि घर म्हटले की त्याचे विभाग आले. आपल्या घरातही आपण कामाप्रमाणे खोल्यांची विभागणी करतो. पाहुण्यांसाठी दिवाणखाना, स्वयंपाकासाठी स्वयंपाकघर, निजण्यासाठी शयनकक्ष, पूजेसाठी देवघर असते. त्याचप्रमाणे या विश्वाच्या घरामध्ये दिवाणखाना आहे तो म्हणजे अमेरिका अनेक अमोलिक व मूल्यवान, शोभिवंत वस्तूंनी सजलेला. युरोप हे त्याचे शयनकक्ष तर चीन, ~~जपान~~ हे त्याचे स्वयंपाकघर आहे. जपान हा बगीचा मानला तर भारत हे त्यातील मंगल असे देवघर आहे. ~~मंदिर आहे.~~ जिथे आपले मस्तक सहजच आदराने झुकते, हात आपोआपच जोडले जातील असे हे मंदिर आहे. आणि हे पवित्र मंदिर भक्कम आणि तरीही आकर्षक अशा १६ खांबावर उभारलेले आहे. ते १६ खांब म्हणजे ४-४ चे ४ समूह आहेत. ४ वर्ण, ४ आश्रम, ४ वेद आणि ४ पुरुषार्थ... आणि हे मंदिर व त्याचे १६ खांब केवळ भारतीयांसाठी नाही तर प्रत्येक मानवासाठी मार्गदर्शक आहेत.

© www.madhaveeraghuveer.com

नारसिंह, अच्युत, जनार्दन, उपेंद्र, हरी, श्रीकृष्ण-



या सर्वांचा विचार आपण या भागात करणार आहोत.
संख्या आणि संज्ञा - ४.

परंतु याच मालिकेतील २६ नक्षत्रांचा विचार मागील भागात केला होता आज आपण २४ चा विचार करू या.

गायत्री मंत्राची २४ अक्षरे - X

ॐ भूर्भुवः स्वः
तत् सवितुर्वरेण्यं
भर्गो देवस्य धीमहि
धियो यो नः प्रचोदयात्।

२४ तीर्थंकर । २४ गायत्री - गणेश, विष्णु, लक्ष्मी, हंस। दत्त, देवी, शंख, राम। लक्ष्मण, हनुमंत, कृष्ण, परशुराम रुद्र, गरुड, नाग, नरसिंह। गुरु, चंद्र, सूर्य, गंगा। गोप, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य - ..

संध्येची २४ नावे - केशव, माधव, नारायण, गोविंद, विष्णु मधुसूदन, त्रिविक्रम, वामन, श्रीधर, हृषीकेश, पद्मनाभ दामोदर, संकर्षण, वासुदेव, प्रद्युम्न, अनिरुद्ध, पुरुषोत्तम, अधोक्षज

दत्तात्रेयांचे २४ गुरु-

पृथ्वी - क्षमाशीलता
आकाश - अभंग, असंग
अग्नि - तेजस्विता
सूर्य - भेदाभेदशून्यत्व
अजगर - निरलस उदासीन
पतंग - बाह्यस्वरूपाला भुलू नये
हत्ती - विषयलंपट नसावे
हरिण - नादाने मोहित
पिंगला - आशेने दुःख होते.
बाल - चिंताशून्यता
शरकृत - चित्ताची एकाग्रता
ऊर्णनाभि - विश्वाची उभारणी संहारणी

वायु - निर्लिप्तता
उदक - स्वच्छता (जल)
चंद्रमा - देहाला विकार
कपोत - आसक्तीमुळे नाश
समुद्र - स्थिरता
मधुकर - आसक्तीने नाश
मधुप - संचय वृत्ति
मीन - रसना ताब्यात हवी.
कुरर - प्रिय वस्तूचा त्याग
कुमारी - एकाकी करणे
सर्प - संगरहित, एकटा.
भिंगुरी - ध्यानसामर्थ्य.

[सर्वसाधारणपणे मानवी आयुर्मर्यादा १०० वर्षे आहे. हे एकाच व्यक्तीचे आयुष्य असले तरी ते एकसुरी नसते. निरनिराळ्या टप्प्यांवर मनुष्याचे विचार, इच्छा, कर्तव्ये बदलत जातात. आणि या सगळ्याचा साकल्याने विचार आमच्या पूर्वजांनी केला होता.]

आश्रम

चंदनाला सुगंध, मधाला माधुर्य आणि हिमालयाला बर्फ कधीही सोडून रहात नाही. त्याचप्रमाणे कोणत्याही काळात, कोणत्याही देशात, कोणत्याही समाजात माणसाला ज्ञानाची लालसा सोडून रहात नाही. अलीकडच्या काळात जसे शास्त्रज्ञ, विज्ञानपंडित सुसज्ज प्रयोगशाळांमध्ये संशोधन प्रयोग करून नियम शोधून काढतात तसेच रानावनात आश्रम बांधून राहणाऱ्या ऋषींना देखील ज्ञानाचे वेड लागले होते. त्यासाठी त्यांनी निसर्गाचे निरीक्षण केले. समाजाचे केले, स्वतःच्या देहाचे केले त्यातून आत्मचिंतन केले आणि त्यातून मानवी आयुष्याच्या उत्तम नियोजनासाठी, समाजाच्या सुचारू व्यवस्थापनासाठी काही नियम ~~शोधून काढले~~. तयार केले. [- - -]

वेगवेगळ्या वळणांवर माणसाचे आदर्श जीवन कसे असावे, ज्यातून त्याला स्वतःला आनंद मिळेल आणि समाजाची घडी व्यवस्थित बसेल. यासाठी त्याने ~~[illegible]~~ आश्रम पद्धत शोधून काढली. इथे आश्रम म्हणजे कुटी किंवा निवासाची जागा एवढाच अर्थ नाही तर ती एक जीवनशैली आहे. आणि ती समाजनियमांनी बद्ध आहे.

१६ संस्कार

खरे तर, गर्भावस्थेपासूनच मानवी जीवनाला आकार देण्याचे काम आपल्या ऋषिमुनींनी केले आहे. सोळा संस्कार हे त्यासाठीच असतात. बाळाचा जन्म झाल्यानंतर त्याच्यावर काही संस्कार - जावळ, उष्टावण, असे संस्कार केले जातात. उपनयन मौंजीबंधन संस्कारापर्यंत त्याची वाणी शुद्ध स्पष्ट झालेली असते. तो बऱ्याच प्रमाणात स्वावलंबी झालेला असतो. अशा वेळी घरापासून दूर परंतु जवळच गुरूंच्या



© www.madhaveer.com

सान्निध्यात म्हणजे गुरुकुलामध्ये त्याला घडले जाते. निश्चित शिस्तशीर व नियमबद्ध आचरण त्याचे ध्यानीमनात घडवत असते. शुद्ध, स्पष्ट, उच्चारणामुळे वाणी स्वच्छ होते. ज्ञानाची भूक ह्ये पूर्ण केली जाते. त्याचबरोबर आचार्यांच्या गुरुपत्नीच्या सहाध्यायांच्या वर्तनातील उत्तमोत्तम गोष्टी आत्मसात केल्या जातात. शारीरश्रमामुळे त्याचा देहही उत्तम आकार घेत असतो. अशा १२ वर्षांच्या अनुशासित अध्ययनातून एक परिपूर्ण व्यक्ति आकाराला येते. हा आहे ब्रह्मचर्याश्रम (पहिला आश्रम)

पूर्वी केवळ श्रुति पद्धतीने अध्ययन अध्यापन चालायचे. त्यामुळे पुन्हा पुन्हा घोकून सर्व काही मुखोद्गत व्हायचे. त्यातून स्मरणशक्ती तल्लख व्हायची. विधिवत उच्चारणामुळे सहजच प्राणायाम घडत असे. मन, मनगट व मेंदू या तिन्हींचा गुणोत्कर्ष घडत असे. त्यातून एक सन्मान्य, जबाबदार आर्य नागरिक तयार होत असे. समावर्तन प्रसंगी आचार्य त्याला उपदेश करत असत. आणि सुशील सद्गुणी कन्येशी विवाह करून पुढील आश्रमात म्हणजेच गृहस्थाश्रमात प्रवेश करण्याचा आदेश देत असत.

घरी परतल्यानंतर काही काळ मातापित्यांची सेवा करून ज्ञानसाधना सुरु असे. पुढे आई वडिलांच्या मतानुसार सुयोग्य कन्येशी विवाह करून तो गृहस्थाश्रमात प्रवेश करत असे. धन्यो गृहस्थाश्रमः! अशी श्रुतींनी देखील प्रशंसा केली आहे. गृहस्थाश्रमावरच इतर तिन्ही आश्रम अवलंबून असतात. ~~[illegible]~~ कुलधर्म, कुलाचार, अतिथि अभ्यागत, यज्ञकर्म इ. नित्यकर्म आचरत असतानाच त्याचा संसार फुलत जातो. प्रजातन्तु न व्यवच्छेत्सीः हा आचार्यांचा उपदेश असतो त्यानुसार मुलाबाळांनी त्याचे घर फुलून जाते. सामाजिक इतर व्यक्तींना देखील मोठा गृहस्थाचा आधार वाटत असे.

साधारण पन्नाशीपर्यंत सर्व कर्तव्ये पार पाडल्यानंतर जेव्हा ज्येष्ठ अपत्याला पहिला पुत्र होतो, तेव्हा या गृहस्थाने संसारात गुंतलेले लक्ष थोडेसे काढून घ्यायचे. हळूहळू आपल्याच मुलाबाळांवर, लेकीसुनांवर गृहकृत्यांची जबाबदारी सोप[illegible]



©www.madhaveeraghuveer.com

आपण थोडेसे बाजूला व्हायचे. कर्तेपणाचा अभिमान टाकून आता पुढच्या पिढीवर कोणतीही जबाबदारी सोपवायची.

सगळा कारभार मुलासुनांवर
सोपवून आपण व्हावे स्वस्थ
याचेच नाव वानप्रस्थ!

अर्थात अडीअडचणीला, अडल्या पडल्याला, कठीण प्रसंगी आम्ही आहोतच असा धीर द्यायचा, पण रोजच्या आयुष्यात ढवळाढवळ न करता थोडेसे तटस्थपणे बघायचे हा खरा वानप्रस्थाचा खरा अर्थ आहे.

आणि मुलांवर जबाबदारी सोपवली की, सुनांना त्या कामाचे मान येते. पदार्थांची, पैशांची किंमत कळते. आणि एकदा का ते सगळ्या गोष्टी गंभीरपणे सांभाळू लागले की मग पूर्णपणे निवृत्त होऊन केवळ परमेश्वराचे नामस्मरण, जपध्यान, करणे, तप:पूत जीवन जगून आयुष्याचे सार्थक करून घेणे हा आहे संन्यासाश्रम।

अशी ही चार आश्रमांची महती आहे. कोणाकडून संथ गतीने जाणारी रेल्वे जशी सांधा बदलताना खडखडाट करत नाही. त्याचप्रमाणे या आश्रमरचनेप्रमाणे जीवन जगताना नात्यांमध्ये देखील कुठेही खडखडाट होणार नाही. अशी ही आमच्या पूर्वजांनी आम्हाला दिलेली ही अमूल्य देणगी आहे.

ज्या समाजात आम्ही राहतो त्या समाजामध्ये विविधता आहे. भिन्नत्व आहे. नानात्व आहे. आणि गरजाही निरनिराळ्या आहेत. केवळ अध्ययन करून काही पोट भरणार नाही. त्यासाठी कोणीतरी धान्य पिकवायला हवे. कोणीतरी व्यापार करायला हवा कोणीतरी गोपालन करायला हवे आणि कोणीतरी शत्रूपासून दुष्ट शक्तींपासून रक्षण करायला हवे. आणि या सगळ्याबरोबरच आपापल्या निसर्गदत्त प्रेरणेनुसार वागायला हवे. आणि या पृथ्वीत विधात्याने प्रत्येक मनुष्य वेगळा बनवला आहे. रंग, रूप, वर्ण, आकार, आवडी निवडी प्रत्येकाच्या भिन्न आहेत. पण म्हणूनच जगण्यात मजा आहे. आणि म्हणूनच प्रत्येकासाठी एक काम आहे. त्यातून सर्वांच्या

© www.madhaveeraghuveer.com

सर्व गरजा पूर्ण केल्या जातात. प्रत्येकाला योग्य मोबदलाही मिळतो समाधानही मिळते आणि समाजाची बांधणी दृढ होत जाते.
अशा या कार्यानुसार केलेल्या विभागणीला नाव आहे चातुर्वर्ण्य पद्धति -- ही जन्मानुसार नाही तर कर्मानुसार ठरते. प्रत्येकाचे गुणधर्म वेगळे असू शकतात.

चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः।

[म्हणजेच क्षत्रियाच्या मुलाला वेदाध्ययनामध्ये विशेष गती असेल तर ते करण्याचा त्याला अधिकार आहे.]

ब्राह्मण हे समाजाचे मस्तक आहे. — अध्ययन अध्यापन
क्षत्रिय हे " भुजा आहेत. संरक्षण
वैश्य हे " मांड्या आहेत. - कृषि गोपालन व्यापार
(Service Industry) शूद्र हे " पाय आहेत - त्रिवर्णांची सेवा.

यात वस्तुतः उच्च-नीच असा भेदभाव नाही. कारण चारही वर्ण उत्तम समाजबांधणीसाठी आवश्यक आहेत.

पुरुषार्थ - धर्म - अर्थ - काम - मोक्ष
अर्थ म्हणजे प्रामख्य
माणसाने या उत्तम जन्म ~~प्राप्त~~ मिळाल्यानंतर कोणत्या चार गोष्टी मिळवून प्राप्त करायच्या त्याला पुरुषार्थ असे म्हटले आहे.
धर्माचरण - क्षात्र धर्म, पत्नी धर्म, राजधर्म, मानवधर्म
शास्त्रविधिनुसार आपल्या धर्मानुसार आचरण करावे.
राजधर्म, मित्रधर्म, स्वभावधर्म. | कर्तव्यकर्म हाच धर्म
मोक्ष - Ultimate Destination अंतिम गंतव्य
जन्ममृत्युच्या फेऱ्यातून मुक्ती म्हणजेच मोक्ष.
पुनरपि जननं पुनरपि मरणम् ।
अर्थ - जीवन सुखाने आनंदाने जगण्यासाठी आवश्यक साधन परंतु ते साध्य नाही. तर Instrument --
काम - प्रजाविस्तारासाठी आवश्यक असले तरी त्याच्या आहारी जाऊन चालणार नाही. संयत उपभोग - शास्त्रानुसार --
धर्माविरुद्धो भूतेषु



© www.madhaveeraghuveer.com

चतुर्वेद - ऋषींनी अवती भवतीच्या निसर्गाचे निरीक्षण केले. दूरवर असणाऱ्या खगोलाचे निरीक्षण केले. स्वतःच्या शरीराचे निरीक्षण करून त्यावरून काही अंदाज बांधले. हे सर्व करत असताना अर्थातच निरीक्षणानंतर चिंतन मनन केले जायचे. त्यासाठी ते ध्यान करत ध्यानाच्या परमोच्च अवस्थेत कित्येकदा 'जडता मनाची गेली' अशी अवस्था यायची. देहाचे भान हरपून जायचे. देहापलीकडील तरल अवस्था अनुभवता यायची तेव्हा एका विलक्षण शांतीचा, समाधानाचा अनुभव यायचा. या जड देहापलीकडे जो नित्य, शुद्ध, बुद्ध आत्मा आहे त्याची ओळख व्हायची. अशा अवस्थेत काही वेळा प्रातिभ श्रवण, प्रातिभ दर्शन घडायचे. कधी कधी कधीही न ऐकलेले परंतु दैवी असे नाद ऐकू यायचे तर कधी ज्योतिच दर्शन घडायचे. अशाच तरल अवस्थेमध्ये ऋषींना वेद दिसले. ऋषिदर्शनात असे म्हटले जाते.

वेद म्हणजे मंत्र तो साक्षात परमात्म्याचा आदेश आहे. ते पाहून, ते ऐकून ऋषी आनंदविभोर झाले. मात्र कुणीही त्याचे कर्तृत्व स्वतःकडे घेतले नाही. वेद म्हणजे परमेश्वराची निःश्वासिते आहेत असे मानले जाते. अशा अनुभूतीतून आलेल्या मंत्रांचे एकत्रीकरण करण्यात आले. त्यांना वेद असे म्हटले जाते. पुढे म. वेदव्यासांनी त्यांचे तीनचार भागांमध्ये वर्गीकरण केले- ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद. वेदांमध्ये निसर्गदेवतांची स्तुति आढळते.

१. ऋग्वेदामध्ये अशी सूक्ते म्हणजेच स्तवने आहेत. इंद्र सूक्त, वरुण सूक्त, अग्निसूक्त, उषासूक्त ! या देवतांना प्रसन्न करून घेऊन त्यांनी आपल्यावर कोपू नये नेहमी प्रसन्न रहावे अशी प्रार्थना केली आहे.

२. निसर्गाला देव मानल्याने निसर्गातील समतोल राखला गेला पाहिजे याची जाणीवही त्यांना होती. त्यासाठी यज्ञ केले जात असत. यज्ञामुळे वातावरण शुद्ध होते विधिपूर्वक केल्या जाणाऱ्या यज्ञामध्ये जे मंत्र म्हटले जातात

त्यांना यजुस असे म्हणतात. यांचा अंतर्भाव यजुर्वेदामध्ये केला जातो. या यजुर्वेदाचे पुन्हा दोन भाग आहेत. शुक्ल-कृष्ण

3. ऋग्वेदातील काही ऋचा गेय स्वरूपात असल्याने त्यांचे वारंवार गायन केले जायचे. याला सामगायन म्हटले जाते. सामवेद ही भगवंताची विभूति आहे. ध्यान त्यांचा निवास आहे असे प्रत्यक्ष भगवंतांनी विभूतियोगात सांगितले आहे.

4. अथर्ववेद - याचा अंतर्भाव काही काळानंतर केला असावा. कारण प्र. तीन त्रैविद्यांचा किंवा ऋग्, साम, यजु यांचाच उल्लेख वारंवार येतो. किंवा या अथर्ववेदामध्ये कृष्ण-यजु म्हणजेच Black magic चा वापर काही ठिकाणी केलेला आहे. जारण मारण तंत्रविद्या यांचा समावेश इथे केलेला दिसतो. परंतु तरीही हाही महत्त्वाचा वेद आहेच. म. व्यासांनी वेदराशीचे विभाजन केल्यानंतर आपल्या एकेक शिष्याकडे त्याचे अध्यापन सोपवले. आणि प्रत्येक वेदाचे एक महावाक्य आहे.

ऋग्वेद - प्रज्ञानं ब्रह्म | पैल
यजुर्वेद - अहं ब्रह्मास्मि | वैशंपायन/याज्ञ...
सामवेद - तत्त्वमसि सुमंतु
अथर्ववेद - अयमात्मा ब्रह्म जैमिनी

चार प्रकारचे वाद Ism -
आरंभवाद - कणाद - प्रणेते - नैय्यायिक, मीमांसक
संघातवाद - बौद्ध - संघ
परिणामवाद - सांख्य, पातंजल
विवर्तवाद, मायावाद - शंकराचार्य - अद्वैत वेदांती Non-Dualism.

चार व्यास - वृद्ध व्यास, बृहत् व्यास, वेदव्यास, मानवव्यास

चार वर्णांचे चार सण - ब्राह्मण - श्रावणी, क्षत्रिय - विजयादशमी, वैश्य - दिवाळी, शूद्र - होळी

©www.madhaveeraghuveer.com

चार वाणी - परा - नाभि - स्फुरण
पश्यन्ती - हृदय - ~~[illegible]~~ अर्थ
मध्यमा - कंठ - ध्वनि
वैखरी - जिव्हा - प्राकट्य - शब्द

चार उपासना - ज्ञान मार्ग (सांख्य) -
कर्म मार्ग
ध्यान मार्ग
उपासना (भक्ति) मार्ग

वनस्पतींचे चार वर्ग -
वनस्पती - फुले न येताच फळ येणारे - वेळ, उंबर
वानस्पत्य - फुले व फळे धारण करणारे - संत्री डाळिंब
औषधी - फळधारणेनंतर सुकून नष्ट - गहू, तांदूळ, ज्वारी
वीरुध - पसरत जाणारे - काकडी, कलिंगड

ग्रंथाचे अनुबंध चतुष्टय -
प्रयोजन - उद्देश -
विषय - प्रतिपाद्य -
अधिकारी - कोणी ग्रंथ वाचावा?
संबंध - ग्रंथ व वाचक यांचा परस्पर संबंध - [illegible]

श्रोत्यांचे चार प्रकार -
चातक श्रोता - केवळ एखादाच (श्रीकृष्णलीला) आवडतो. इतर विषयांमध्ये रुचि नाही.
हंस श्रोता - सारासार, निर्णय घेऊन ऐकणारा
शुक श्रोता - परिमित पण गोड इच्छा करणारा
मीन श्रोता - मुकाट्याने रसास्वादन करणारा

वक्त्याचे चार दोष - प्रमाद - विषयाचे पूर्ण ज्ञान नसणे
~~[illegible]~~ - श्रोत्यांची उपेक्षा करणे

© www.madhavaraghuveer.com

लिप्सा - मोबदल्यावर अधिक दृष्टी - विलक्षणा, लोकेषणा --
करणापाटव - साधनांमध्ये दोष / चुकीच्या हालचाली
वाणीमधील दोष, तोतरेपणा, अडखळणे
भ्रम - अवास्तव कल्पना, चुकीचे सिद्धांत सांगणे.

चार प्रकारचे लोक ---
एते सत्पुरुषाः परार्थघटकाः स्वार्थं परित्यज्य ये ।
सामान्यास्तु परार्थमुद्यमभृतः स्वार्थाविरोधेन ये ।
तेऽमी मानवराक्षसाः परहितं स्वार्थाय विघ्नन्ति ये
ये विघ्नन्ति निरर्थकं परहितं ते के न जानीमहे ॥

लोकांना आपलेसे करण्यासाठी चार उपाय ---
लुब्धमर्थेन गृह्णीयात्
क्रुद्धं अंजलिकर्मणा ।
मूर्खं छन्दानुवृत्तेन
याथातथ्येन पण्डितान् ॥

साम - दाम - दण्ड - भेद

गीतेतील चार वक्ते - उवाच
भगवान श्रीकृष्ण - केवलं ज्ञानमूर्तिम् ।
धनुर्धर अर्जुन - मोहित, भ्रमित
संजय - निष्पक्षपाती, साक्षी भाव
धृतराष्ट्र - अत्यंत स्वार्थी

सुवर्णपरिक्षा - चार कसोट्या
घासून, कापून, तापवून, ठोकून.

यथा चतुर्भिः कनकं परीक्ष्यते निघर्षणच्छेदनतापताडनैः ।
तथा चतुर्भिः पुरुषः परीक्ष्यते त्यागेन शीलेन गुणेन कर्मणा ॥
चार प्रकारचे उपदेश - व्यावहारिक, नैतिक, धार्मिक, पारमार्थिक

© www.madhaveeraghuveer.com

व्यावहारिक उपदेश -

१ व्यावहारिक - दैनंदिन जीवनाची घडी नीट बसल्याशिवाय माणूस पारमार्थिक साधना करू शकत नाही. हे वास्तव आहे आणि म्हणूनच तुकाराम महाराज म्हणतात — —

☆ ओडोनिया धन उत्तम वेव्हारे। उदास विचारे वेच करी।
किंवा असाध्य ते साध्य करिता सायास
कारण अभ्यास तुका म्हणे।

समर्थ सांगतात,

☆ राखावी बहुतांची अंतरे। भाग्य येते तदनंतरे।
प्रपंच सुखे करावा। परंतु काही परमार्थ वाढवावा।

२. नैतिक उपदेश -

☆ समर्थ - खरे सत्य बोलावे। यथातथ्य चालावे।
तुकाराम - पराविया नारी माउली समान।

३. धार्मिक उपदेश -

समर्थ - मुलुख बडवावा की बुडवावा
धर्म रक्षणा कारणे।

एकनाथ - जे धर्माची वाट मोडे। अधर्माची शीग चढे
ते आम्हा येणे पडे। संसारास्थिति - -

ज्ञानदेव - अगा स्वधर्मु जो आपुला। जरी का कठीण जाहला।
तरी तोचि अनुष्ठिला। भला देखे॥

४. पारमार्थिक उपदेश - संतसाहित्याचा गाभा, मूळ उद्देश
गीता - असंगशस्त्रेण दृढेन छित्वा - -
तुकाराम - न करी रे संग। राहे रे निश्चळ
लागो नेदी मळ। मनाच्या ॥

© www.madhaveeraghuveer.com

साधन चतुष्टय -

१. नित्यानित्यविवेक - ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या।
नित्य म्हणजे सत्य, शाश्वत, टिकणारे
अनित्य ,, मिथ्या नाशिवंत, संपणारे परिवर्तनशील -

२. वैराग्य - इहपरलोकातील भोगांविषयी वैराग्य
वैराग्यामुळे मुमुक्षा तीव्र होत जाते

३. शमदमादि षट् संपत्ति -
शम - दम - उपरति - तितिक्षा - श्रद्धा - समाधान

४. मुमुक्षा - मोक्षप्राप्तिची तीव्र इच्छा --

महाभारतकालीन चांडाळ चौकडी - १ दुर्योधन
२. दुःशासन ३. कर्ण ४. शकुनि

चारी ठाव स्वयंपाक

चतुरस्त्र व्यक्तिमत्व

चार धाम यात्रा / चार पीठे

चारचौघी

संन्यासी - दंड, कमंडलु, खडावा, मुंडन

© www.madhaveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

॥ श्री ॥

जग हे बंदिशाला । जगी सर्वसुखी असा कोण आहे?

आपण वारंवार जग या शब्दाचा उपयोग करत असतो. परंतु जेव्हा आपण जग हा शब्द वापरतो तेव्हा त्याचा अर्थ निश्चित नसतो. अशा वेळी दृश्य म्हणून आपण बघत राहतो आणि आपल्या सभोवार पसरलेले जग दृश्य म्हणून पाहतो. खरं तर आपण पहातो तो खऱ्या जगाचा एक छोटासा भाग असतो. खरं पाहिलं तर समग्र जग कोणीच पाहू शकत नाही. जे थोडेसे जग आपल्याला दिसते त्यावरून आपण संपूर्ण जगाची कल्पना करत असतो. त्याचे गुणधर्म व रचना ठरवत असतो. जगत हा शब्द गम् धातुपासून तयार झाला आहे. द. का. व्या. वि. जगत् म्हणजे जाणारे, बदलणारे, परिवर्तनशील । आणि जे सतत बदलत असते ते सत् असणे शक्य नाही. आणि म्हणून ते मिथ्या आहे. अर्थात पूर्णपणे सत्य असणाऱ्या ब्रह्म स्वरूपाच्या मापाने त्या तुलनेत जगाला मिथ्या म्हटले आहे. इथे मिथ्या हा शब्द मूल्यवाचक आहे. यातही मिथ धातु आहे. मिथ म्हणजे संयोग होणे, एकत्र येणे असा आहे. चुकीने, गैरसमजाने अज्ञानाने खऱ्या खोट्याची सरमिसळ झाली आहे आणि त्यामुळे अडचण अशी झाली आहे की खरे व खोटे अज्ञानाने एकत्र आल्यामुळे जे खरे आहे ते धड कळत नाही आणि जे खोटे आहे ते गळून पडत नाही. त्यातून अनेक भ्रम, चुकीच्या समजुती निर्माण होतात व त्यातून दुःख भोगावे लागते. जगाचे अपूर्णत्व, मिथ्यात्व शब्दशः कळते परंतु तरीही कळेनास आपण ते खरे मानतो व त्यात रमून जातो.

आपल्याला हे माहिती आहे की आपल्यासकट हे सारे पदार्थ नाशिवंत आहेत. मी नातुरता व अपूर्ण आहे. माझी इंद्रिये, माझे ज्ञान अपूर्ण आहे. ज्या वस्तूपासून मी सुख घेण्यासाठी धडपडतो त्या वस्तू अपूर्ण आहेत आणि तरीही अपूर्ण इंद्रियांच्या सहाय्याने अपूर्ण वस्तूपासून मी पूर्ण सुख मिळवण्यासाठी धडपड करतो हेच माझे केवढे तरी अज्ञान आहे.

© www.madhaveeraghuveer.com

त्यामुळे जगाचे खरे स्वरूप काही कळत नाही. आणि जे काही कळते ते त्याचे खरे स्वरूप असत नाही. आपली बुध्दी हे आपले खरे ज्ञानसाधन आहे. परंतु बुध्दी ही प्रत्यक्षानुसारी आहे, तर जगाची माहिती पुरवणारी इंद्रिये ही अल्पदर्शी आहेत. ती जगाबद्दल अपुरी व सदोष माहिती पुरवतात. त्या माहितीच्या पायावर बुध्दी अनुमान रचते. आणि बुध्दीलाही शेवटी मर्यादा आहेतच. त्यामुळे तिला जगाचेही सम्यक् ज्ञान, यथार्थ ज्ञान होत नाही. त्या ज्ञानामध्ये असत्याचा अंश असतोच असतो. म्हणूनच जग हे मिथ्या आहे असे म्हटले जाते. त्यातच जीव हा सांत आहे अल्प आहे अज्ञानी आहे. त्या मानाने विश्व हे अनंत, भूमा व ज्ञानमय आहे. परंतु तरीही जीवाला विश्वाचा विचार केल्याशिवाय चैन पडत नाही. त्यामुळे आपल्या कल्पना तो विश्वावर लादतो आणि त्यातून त्याला विश्वाचे विपरीत किंवा अर्धवट ज्ञान होते. आणि त्यामुळे 'जग मिथ्या आहे' हे विधान सुसंगत वाटते. परंतु याच जगाचे यथार्थ ज्ञान होण्यासाठी अनुभवाची कक्षा बदलावी लागते.

इंद्रियांना दिसणारे जग आपल्याला खरे वाटते म्हणून मन तिथे लगेच चिकटते. आपोआप दृश्याकडे धाव घेते. ही मनाची दृश्याकडे खेचणारी धाव थांबल्याखेरीज अंतर्मुख / आत्मसन्मुख होता येणार नाही. दृश्याला चिकटण्याची मनाची सवय जाण्यासाठी त्याचे मिथ्यत्व मनापासून पटायला हवे. ते पटण्यासाठी विवेक हा जबरदस्त उपाय आहे. जसजसा आत्मानात्मविवेक अंतःकरणात स्थिर होत जातो त्या मानाने दृश्याचे मूल्य क्षीण होत जाते आणि त्याचबरोबर आत्मस्वरूपाचे मूल्य वाढत जाते. आणि त्याचे मूल्य वाढत गेले की ते हवेसे वाटायला लागते. त्याच्यावाचून जीवन अर्थहीन वाटते. आणि दृश्यामध्ये गुंतून रहाणे नकोसे वाटू लागते आता यानंतरचे आयुष्य तरी आत्मदर्शन करून घेण्यासाठी कारणी लागावे असे वाटायला लागते. एक खरा देव हवासा वाटतो. यातच शुध्द भक्तीचे मूळ आहे. अशा या विरक्ती व भक्ती एकमेकांना पोषक आहेत.

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

दृश्याबद्दलची अनासक्ती हा विरक्तीचा प्राण आहे. तर ईश्वराच्या सहवासाची प्रेमजन्य तळमळ हा साधन-भक्तीचा प्राण आहे. माणसाला जेव्हा अनुताप होतो तेव्हा बद्धाचा मुमुक्षु होण्याची प्रक्रिया सुरु होते.

प्रत्येक माणूस - मग तो अतिसामान्य असो किंवा ब्रह्मज्ञानी असो. तो या समाजातच जन्मतो, समाजातच वाढतो आणि समाजातच देह ठेवतो. परंतु कोणताही मानवी समाज म्हणजे अनेक व्यक्तींचा समूह असतो. या समाजामध्ये बहुसंख्य व्यक्ती या स्वार्थी असतात. (अधम) काही स्वार्थासाठी ते कोणतेही दुष्कृत्य करायला तयार होतात. तर काहीजण मध्यम स्वरूपाचे असतात. तुही मध्यम सुखी रहा. मीही सुखी राहतो. अशी लोक काही प्रमाणात ईश्वराभिमुख असतात. तर काही मोजक्याच उत्तम सज्जन व्यक्ती स्वत: तोशीस सोसून इतरांसाठी धडपडत असतात. अशांना उत्तमगुणांनी युक्त असे संत सत्पुरुष म्हटले जाते. यांच्या अंतःकरणात ईश्वराचे अधिष्ठान असते. ते आपल्या दिवसाचा अधिकाधिक काळ सत्कार्यात, पूजाअर्चा मध्ये व्यतीत करतात. इतरांसाठी झीज सोसतात. सर्व भूतमात्रांविषयी त्यांच्या मनात तळमळ असते.

संख्या आणि संज्ञा - २१ व ६८ ——> ३

२१ प्रकारची पत्री - गणेशपूजेसाठी ----

| | | | |
|---|---|---|---|
| १. मालती | २ माका | ३ बेल | ४. दुर्वा |
| ५. बोर | ६ धोतरा | ७. तुळस | ८ आघाडा |
| ९. शमी | १० केवडा | ११. कण्हेर | १२ आपटा |
| १३ मदार | १४. अर्जुन | १५. विष्णुक्रांत | १६ डाळिंब |
| १७. देवदार | १८ मरवा | १९ निर्गुडी | २० जाई |
| २१ अगस्ती (हदगा) | | | |

© www.madhaveeraghuveer.com

गंगेची १८ नावे — गंगा, त्रिपथगा, भागीरथी, त्रिस्रोता, त्रिदशदीर्घिका, जाह्नवी, मंदाकिनी, भीष्मजननी, सरिद्वरा, विष्णुपदी, सिद्धगंगा, स्वर्गा, स्वर्गंगा, खगा, आपगा, स्वापिकुल्या, हैमवती, सर्वापी, हरशेखरा--

गीतेची १८ नावे —

गीता गङ्गा च गायत्री सीता सत्या सरस्वती
ब्रह्मविद्या ब्रह्मवल्ली त्रिसंध्या मुक्तगेहिनी।।
अर्धमात्रा चिदानन्दा भवघ्नी भ्रान्तिनाशिनी॥
वेदत्रयी परानन्ता तत्त्वार्थज्ञानमंजिरी॥

१८ धान्ये - (कडबोळे)

गहू, साळ, तूर, जव, जोंधळा, वाटाणा, लाख, चणा, जवसे, मसूर, मूग, राळा, तीळ, हरीक, कुळीथ, सावा, उडीद, चवळी

१८ अक्षौहिणी सैन्य — (भारतीय धर्मयुद्ध)

| | | | |
|---|---|---|---|
| एक अक्षौहिणी — | २१,८७० | रथ | — १८ |
| | २१,८७० | हत्ती | — १८ |
| | १०९,३५० | पायदळ | — १८ |
| | ६५,६१० | घोडे | — १८ |
| | २,१८,७०० | एकूण | — १८ |

एका ओळीत २७ रथ अशा २७ ओळी असा ७२९ रथांचा चौरसचौरस चौकोन

| | |
|---|---|
| युद्ध | १८ दिवस |
| जयग्रंथ | १८ पर्वे |
| भगवद्गीता | १८ अध्याय |
| पुराणे | १८ |
| स्थितप्रज्ञ लक्षणे - | १८ श्लोक |

© www.madhavveeraghuveer.com

| MARCH | | | | | | 2015 |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

औट - साडेतीन -

08 साडेतीन पीठे - तुळजापुरची भवानी —— १
माहूरची (मातापूर) रेणुका —— १
09 आंबेजोगाई —— योगेश्वरी १
कोल्हापूरची —— महालक्ष्मी १/२

10 साडेतीन मुहूर्त - बलिप्रतिपदा —— १
11 वर्षप्रतिपदा —— १
विजयादशमी —— १
12 अक्षयतृतीया —— १/२

13 साडेतीन शहाणे - १. सखारामबापू बोकील —— १
२. देवाजीपंत चोरघडे —— १
14 ३. विठ्ठल सुंदर —— १
४. नाना फडणवीस —— १/२

15 साडेतीन मात्रांचा ॐकार -
16 अकार, उकार, मकार आणि बिंदु
अ + उ + म + ं

17 औटकी, अडीचकी, दीडकी ---

18 (३) श्रीराम | विठ्ठल | हरिःॐ | ॐ तत् सत् |

19 तीन अग्नि — १. दावाग्नि २. वडवाग्नि ३. जठराग्नि
20 १. गार्हपत्य २. दक्षिणाग्नि ३. आहवनीय

प्राणायाम - पूरक + कुंभक + रेचक

वारकरी संप्रदाय साधना -
वारी + तुळशीची माळ + नामस्मरण --

© www.madhaveeraghuveer.com

08 जीवनाची तीन मूल्ये - सत्यम् शिवम् सुन्दरम्।

09 तीन त्रिस्कंध धर्म - छांदोग्य उपनिषद — गीता
यज्ञ दान तप — समतोल राखला जातो ---

10 सृष्टी समाज व्यष्टि } मनुष्याला पावन करणारी
सन्मान संघटन दान } कर्मे

11

सत् + चित् + आनंद - परब्रह्मस्थिति

12

ब्रह्मांडाच्या तीन अवस्था - उत्पत्ति + स्थिति + लय

13

देहाच्या अवस्था जागृति + स्वप्न + सुषुप्ति
14 बाल्य + तारुण्य + वार्धक्य

15 स्त्रीच्या अवस्था कन्या कांता माता

16 एषणा दारेषणा, वित्तेषणा, लोकेषणा
Wine, Wealth & Woman.

17

18 काव्यातील प्रमुख गुण — उपमा, अर्थगौरव, पदलालित्य --

19 उपमा कालिदासस्य भारवेरर्थगौरवम्।
दण्डिन: पदलालित्यं माघे सन्ति त्रयो गुणा:॥

20

तीन गोष्टी शेष ठेवू नयेत,
ऋणशेषोऽग्निशेषश्च व्याधिशेषस्तथैव च।
पुनश्च वर्धते यस्मात् तस्मात् शेषं न कारयेत्॥

© www.madhaveeraghuveer.com

दुर्लभ गोष्टी —
दुर्लभं त्रयमेवैतद् देवानुग्रहहेतुकम्।
मनुष्यत्वं मुमुक्षुत्वं महापुरुषसंश्रयः॥

आरोग्यप्रद गोष्टी ---
भोजनान्ते पिबेत् तक्रं वासरान्ते पिबेत् पयः।
निशान्ते च पिबेत् वारि त्रिभिर्रोगो न जायते॥

त्रिदोष — शरीरातील — वात, कफ, पित्त
अंतःकरणातील — मल, विक्षेप, आवरण
आरशावरील धूळ — मल
धुराने वेढलेला अग्नि — विक्षेप
वारेमुळे आवृत झालेला गर्भ — आवरण।

दुसऱ्याच्या स्वाधीन करू नये ---
पुस्तकं वनिता वित्तं परहस्तगतं गतम्।
यदि चेत् अनुरायाति नष्टं भ्रष्टं च खण्डितम्॥

नामधारी - विद्याधरो यथा मूर्खो जन्मान्धस्य दिवाकरः।
लक्ष्मीधरो दरिद्रश्च त्रयस्ते नामधारकाः॥

तीन उपासना - कर्म — भक्ति — ज्ञान

तीन रत्ने — पृथिव्यां त्रीणि रत्नानि जलमन्नं सुभाषितम्।
मूढैः पाषाणखण्डेषु रत्नसंज्ञा विधीयते॥

सत्तात्रय - पारमार्थिक, व्यावहारिक, प्रातिभासिक

ज्ञानप्राप्तिसाठी - प्रणिपात, परिप्रश्न, सेवा

©www.madhaveeraguruveer.com

प्रस्थानत्रयी - उपनिषदे, ब्रह्मसूत्र, भ.गीता

त्रिकर्म - नित्य, नैमित्तिक, काम्य

त्रितत्त्वे जीव - जगत - जगदीश्वर

त्रिपथगा भागीरथी - स्वर्ग पृथ्वी पाताळ

क्षितौ तारयते मर्त्यान्
नागांस्तारयतेऽप्यधः।
दिवि तारयते देवान्
तेन त्रिपथगा स्मृता॥

त्रिपुटी - यापैकी एक नसेल तर इतर दोघांची सिद्धी होणार नाही.

सत् - चित् आनंद
साध्य साधक साधन
ज्ञेय ज्ञाता ज्ञान
उपमेय उपमान उपमा
अकार उकार मकार
ब्रह्म माया जीव

त्रिफळा हिरडा, बेहडा आवळा

त्रिपुंड्र - भस्मरेखा

त्रिभुवन त्रिलोक - स्वर्ग पृथ्वी पाताळ

त्रिताप - आधिभौतिक आधिदैविक आध्यात्मिक

त्रिस्थळी

त्रिसूत्री एकदेश, एकजाती, एकभाषा - - -

© www.madhaveeraghuveer.com

| MARCH | | | | | | 2015 |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

॥ श्री ॥

संख्या आणि संज्ञा या प्रवचनमालेच्या समारोपाकडे जात असताना अधून मधून सिंहावलोकनही आवश्यक असते. या मालिकेत आपण काही पारिभाषिक संज्ञा व त्यांच्याशी निगडित अशा काही संख्या आपण पाहिल्या. मात्र हा अभ्यास करत असताना त्याच्या जोडीला काही सैद्धान्तिक संकल्पनाही अभ्यासल्या. ज्ञान म्हणजे काय? गुरु कोणाला म्हणावे? प्रार्थना केल्यामुळे नक्की कोणता लाभ होतो? सृष्टीची उत्पत्ति कशी झाली? या सर्व सृजनाची मूळ प्रेरणा कोणती? आत्मज्ञान कशाला म्हणायचे? यातील काही विचार आपल्याला अंतर्मुख होऊन विचार करायला लावतात.

आपल्या अंतर्यामी एक खरा मी व दुसरा खोटा मी असे दोन 'मी' वावरत असतात. आत्मज्ञान होण्यासाठी प्रथम 'खोटा मी' बाजूला सारून खरा मी शोधावा लागतो. त्यासाठी प्रथम सद्गुरुंकडून आत्मस्वरूपाबद्दल श्रवण करावे लागते. 'आत्मा व ब्रह्म' एकच आहे हे मनावर ठसावे लागते. ब्रह्म एकमेव अद्वितीय आहे. अभेद आहे. असे असले तरी त्यात भेदाचा अनेकत्वाचा, चंचलपणाचा भास होतो. ती मूळमाया आहे. मूळमायेमध्ये शुद्ध जाणीव आहे तो ईश्वर आहे. साऱ्या विश्वामध्ये एकच ~~मूळमाया~~ मूळ जाणीव काम करते तिला जगज्ज्योति असे म्हणतात. सर्व कर्तेपण तिचेच आहे. पिंडामध्ये तीच अंमल गाजवते. अज्ञानामुळे जीव त्या जगज्ज्योतिला विसरतो आणि मी स्वस्वरूप नसून मी देहच आहे अशी दृढ भावना धरतो. त्यामुळे होते काय? तर जीव संकुचित बनतो व मी कर्ता, मी भोक्ता, मला जन्ममरण आहे या कल्पना जगात वावरतो. हीच अहंता आहे. या अहंकारामुळे जीव कोता बनतो. स्वतःचे सामर्थ्य विसरून दीनवाणा होतो. हे दीनवाणेपण टाकून त्याला स्वतःच्या स्वरूपाची, सामर्थ्याची स्मृति असायला हवी. त्यासाठी सतत चिंतन हवे. या स्वरूप चिंतनाला निदिध्यास म्हणतात. याचेच फलस्वरूप म्हणून आत्मसाक्षात्कार घडतो. स्वस्वरूपाच्या अनुसंधानात तो



© www.madhaveeraghuveer.com

आत्मज्ञानापर्यंत पोहोचतो. हा विचारप्रधान मार्ग आहे. मानवी जीवनात सारासार विचाराला म्हणजेच विवेकाला सर्वश्रेष्ठ स्थान आहे. मात्र हा विवेक कल्पनानुसारी नसावा. तर तो प्रत्यक्ष अनुभवानुसारी असावा. प्रतीतीवाचून परमार्थ वाया जातो. उपनिषद्कालीन ऋषींपासून ते अगदी आजच्या युगातील विज्ञानापर्यंत सर्वांनी याच अनुभूतिजन्य ज्ञानाचा पुरस्कार केला आहे.

याच्या पुढची पायरी आहे लोकसंग्रह! ब्रह्मरूप झालेला जीवन्मुक्त पुरुष अकर्तेपणाने, लोकांचा लोकसंग्रह करतो. नाना प्रकारच्या वासना बाळगून संतांकडे जाणाऱ्या अज्ञानी लोकांना निर्वासन आत्मस्थितीकडे वळवणे सोपे नाही. सुगंधित फुलांमधून अत्तर काढणे एकवेळ शक्य आहे परंतु मातीमधून अत्तर काढणे ही खरी करामत आहे. परंतु संतांना ही कला साधते. वासनेने वेढलेल्या प्रापंचिकाला ते आत्मज्ञानाचा अधिकारी बनवू शकतात. हेच आमच्या संत मांदियाळीचे खरे मर्म आहे.

ईश्वरी नवांचे वाडे । संत होय लोकडे
हे अमोघ ज्ञानाचे ते गाडे । भरले असती प्रत्यक्ष ॥

म्हणूनच परमार्थमार्गामध्ये पाऊल टाकू इच्छिणाऱ्यांनी प्रथम संत चरित्रे वाचायला हवीत. ज्यांना संतांचा प्रत्यक्ष सहवास लाभला नसेल त्यांना या संतचरित्रांतून मोठाच लाभ होतो. आपल्या चरित्राने सामान्यजनांना मार्गदर्शन करणाऱ्या संतांचे उपकार अपार आहेत.

एकनाथ महाराजांसारख्या संतांनी प्रपंच व परमार्थ यांचा सुयोग्य समन्वय साधला. समर्थांनी सांगितले - - -

आधी प्रपंच करावा नेटका । मग घ्यावे परमार्थ विवेका ।

या उपदेशातील मर्म समजून घ्यायला हवे. प्रपंच हा देवाचा समजून करायला हवा. व्यवहारकुशलतेने करायला हवा. ईश्वरार्पण बुद्धीने कर्म करीत गेले तर वासना क्षीण होतात. आणि प्रपंचातले काही गुण परमार्थात उपयोगी पडतात. निष्ठा, चिकाटी, कष्टाळूपणा, काटकसरपणा नियमितपणा, दुरदृष्टी सोसणे, मानपान गिळणे



© www.madhaveeraghuveer.com

यातूनच अहंता कमी होते, चित्त निर्मळ बनते, निरासक्त कर्म आपोआप घडू लागते. संत-महंतांचे जीवन हे अशा आदर्शाचे जीवन आहे. त्यांच्या आचरणाकडे पाहून भक्तजनांना तसे वागण्याची प्रेरणा मिळते.

अभेदबुद्धि हा आत्मज्ञानाचा प्राण आहे तर भेदबुद्धि हा व्यवहाराचा प्राण आहे.

वस्तुत: मुळात एकरूप असलेली जाणीव देह अहंतेपायी विभागली गेली. संकल्प विकल्प कल्पना, स्मृति, वासना, भावना विचार अशी नाना रूपे तिने घेतली. सामान्य प्रापंचिक अशा भेदांमध्ये वावरत असतो. नानात्वाचे त्याला आकर्षण वाटत असते. ईश्वर निराळा, मी निराळा अशी त्याची ठाम समजूत असते.

१. जीवा जीवामधील भेद
२. जीव शिवामधील भेद
३. जीव जगतामधील भेद
४. जगत व जगदीशामधील भेद

हे सारे द्वैत आहे. त्याचाच विचार आपण करणार आहोत परंतु त्यापूर्वी काही संस्था पहाणार आहोत.

~~[illegible] मंत्र~~ — पापनाशक मंत्र.

हरे राम हरे राम राम राम हरे हरे।
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे॥

सोळा संस्कार —

गर्भाधानं पुंसवनं सीमन्तोन्नयनं तथा
जातकं नामसंस्कारो निष्क्रमअन्न भोजनम्।
चौलकर्मोपनयनं वेदव्रतचतुष्टयम्
केशान्त: स्नानमुद्वाह: संस्कारा: षोडशा: स्मृता:॥

© www.madhaveeraghweer.com

१६ शृंगार—

चार चतुष्पद चार खगपद चार फूल फल चार।
राधाजीके बदनपर ये सोलह सिंगार॥

चार चतुष्पद — तुरंगवत् घुँघट
कुरंगवत् - नेत्र
गजवत् - गती
सिंह - कटी

चार खगपद — कोकिला - स्वर
भ्रमराकृती - भुवई
शुकचंचुवत् - नासिका
मीनखंजनवत् - नेत्रांची चंचलता

चार फूल — चंपकवत् - कांति
केतकीवत् - सुगंध
कमलाकृती - नाभि
गुलाबवत् - गाल

चार फल — कपित्थवत् - कुच
दाडीमीबीजवत् - दंत
आम्रबीजवत् - हनुवटी
प्रवालवत् - अधर

१६ लिपी — १. देवनागरी २. गुरुमुखी ३. गुजराती ४. ओडिया ५. आसामी ६. बंगाली ७. तेलगु ८. कन्नड ९. तमीळ १० मल्याळम् ११. अरबी १२ उर्दू १३. फारसी १४ मोडी १५. रोमन १६.

१६ तिथी | १६ कलांचा पुरुष— प्राण, श्रध्दा, आकाश, वायु, अग्नि, जल, पृथ्वी, इंद्रिय, मन, अन्न, वीर्य, तप, मंत्र, कर्म, लोक, नाम---

©www.madhaveeraghuveer.com

विष्णूची १६ नावे आणि ती घेण्याचा काळ - - -

१. औषध - विष्णु
२. भोजन - जनार्दन
३. शयन - पद्मनाभ
४. विवाह - प्रजापति
५. युद्ध - चक्रधर
६. प्रवास - त्रिविक्रम
७. अंतकाळ - नारायण
८. प्रियसंगम - श्रीधर
९. दुःस्वप्न - गोविंद
१०. संकट - मधुसूदन
११. अरण्य - नरसिंह
१२. आग्नि - जलशायिनः
१३. जलमध्ये - वराह
१४. पर्वत - रघुनंदन
१५. गमनकाळी - वामन
१६ सर्वप्रसंगी - माधव

१४ विद्या

४ वेद - ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद
६ षडंगे - छंद, शिक्षा, व्याकरण
निरुक्त, ज्योतिष, कल्प
न्याय, मीमांसा, पुराण, धर्मशास्त्र.

अंगानि वेदश्चत्वारो मीमांसा न्यायविस्तरः।
पुराणं धर्मशास्त्रं च विद्यास्त्वेता चतुर्दशाः॥

१४ मन्वंतरे - स्वायंभुव, स्वारोचिष, उत्तम, तामस, रैवत, चाक्षुष, वैवस्वत, सावर्णि, धर्मसावर्णि सावर्णिक, पिशंग, अपिशंगाभ, शबल व वर्णक - - -

चतुर्दश भुवने -

अधोलोक - अतल, वितल, सुतल, तलातल, रसातल, महातल पाताळ.

ऊर्ध्वलोक - भूलोक, भुवर्लोक, स्वर्लोक, महर्लोक, जनलोक, तपोलोक, सत्यलोक

लक्ष्मीनिवासाची १४ स्थाने –

१. सुवर्ण　२ रुपे　३. मोती
४. रत्न　५. अश्व　६. रस
७. अन्न　८. कापूर　९. कमळ
१० कुंकुम　११. घट　१२. धूप
१३ अशोक　१४. आम्रपल्लव

१४ रत्ने –

लक्ष्मी कौस्तुभ पारिजातक सुरा
धन्वंतरीश्चन्द्रमा
गाव: कामदुघा: सुरेश्वरगजो
रम्भादि देवांगना।
अश्व: सप्तमुखो विषं हरिधनु:
शंखोऽमृतं चाम्बुधे:
रत्नानीह चतुर्दश प्रतिदिने
कुर्वन्तु वो मंगलम्॥

लक्ष्मी, कौस्तुभ, पारिजातक सुरा, धन्वंतरी, चंद्रमा
कामधेनु, ऐरावत, रंभा (अप्सरा) उच्चैश्रवा (सप्तमुखी)
कालकूट विष, शार्ङ्ग धनुष्य, पांचजन्य शंख, अमृत

चौदा चौकड्यांचे रावणाचे राज्य –

दशाक्षरी मंत्र – राम, कृष्ण, शिव, हरी
सप्तकोटि महामंत्राश्चित्तविभ्रमकारका:।
एक एव परो मंत्र: श्रीराम ~~[illegible]~~ त्र्यक्षरद्वयम्।

वचनद्वयम् – अष्टादशपुराणेषु व्यासस्य वचनद्वयम्।
परोपकार: पुण्याय पापाय परपीडनम्॥



© www.madhuveer.com

31 MARCH

TUESDAY
WEEK 14
DAY 090-275
DATE 31.03.2015

| MARCH | | | | | | 2015 |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

नर नारायण - पविन

द्विज - ब्राम्हण, पक्षी

द्विजिव्हा - सर्प, चहाडखोर

द्विप, द्विरद - हत्ती

द्वैत - ब्रह्म + जीव | जीव जगत

08 दोन अयने - उत्तरायण —— दक्षिणायन

09 स्वर्गापेक्षाही श्रेष्ठ - अपि स्वर्णमयी लंका न मे लक्ष्मण रोचते। जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी ॥

10 दोन पक्ष - शुक्ल —— कृष्ण, शुद्ध - वद्य

दोन ध्रुव - उत्तर —— दक्षिण

11 दोन नृत्ये - तांडव —— लास्य

दोन द्वारपाल - जय —— विजय

12 दोन अश्विनीकुमार - देवतायुग्म

दोन उपासना - सगुण निर्गुण

13 जीवनाच्या २ अवस्था - जीवन x मृत्यु, सुख x दुःख

विश्वाच्या " " - जड x चेतन

14 वेदांतात समजून घेण्यासारख्या दोन गोष्टी -

15 ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या।

16 संसाररथाची दोन चाके —— पती पत्नी

अनादि जोडपे - प्रकृति पुरुष

17 दोन आदर्श दांपत्ये - सारस (क्रौंच) चक्रवाक

18 दोन पुरुष - क्षर अक्षर

पुरुषोत्तम - मर्यादा पुरुषोत्तम - राम

19 पुराण पुरुषोत्तम - योगेश्वर श्रीकृष्ण

Media वार्ताहर - संजय, नारद

20 मंगलवाचक २ शब्द - अथ - ॐ

राष्ट्रगीत - वंदे मातरम् - जनगणमन

दोन विद्या, संपत्ति - परा + अपरा, दैवी + आसुरी

द्वंद्व - विरुद्ध गोष्टी साहचर्याने राहतात प्रपंच - परमार्थ | इह - आमु(ष्मिक) त्याग x भोग | जन्म मरण | नीति अनीति | सापेक्ष - निरपेक्ष



पतन रक्षन नश्वित - प्रकाश x संधार | आसक्ती x विरक्ती | दैव x दैन्य

© www.madhaveeraghuveer.com

२ मार्च २०२१

॥ श्री ॥

दुर्लभ शरीरी दुर्लभ आयुष्य। याचा करू नये नास।
दास म्हणे सावकास। विवेक पहावा ॥ १८.३.१

अवगुण अवघेचि सांडावे। उत्तम गुण अभ्यासावे।
प्रबंद पाठ करीत जावे। गूढ अर्थ ॥ (खोल)

या जगामध्ये अनेक प्रकारचे प्राणी आहेत. त्या प्रत्येकाच्या ठिकाणी जाणिव आहे. भुचर, जलचर, नभचर या सर्वांमध्ये भुकेची जाणिव आहे. भयाची जाणिव आहे. या नैसर्गिक प्रेरणा आहेत. त्या सहज घडत असतात. त्यामध्ये काही विचार नसतो. परंतु केवळ माणसाच्या जीवनातच बुध्दीचा खरा विकास दिसून येतो. माणसाच्या बुध्दीला विवेकाचे स्वरूप येते. विवेकामध्ये सारासार विचार येतो. विवेकानेच शाश्वत - अशाश्वताचा निवाडा करता येतो. सत्यासत्याचा भेद स्पष्ट दिसतो. विवेकामुळेच आत्मानात्म चिकित्सा निश्चित निर्णय देते. या द्वैताच्या पसाऱ्यातून अद्वैताची निवड करण्यासाठी विवेक आवश्यक आहे.

असार टाकून सार घ्यावे. अशाश्वताचा अव्हेर करून शाश्वत स्वीकारावे. असत्य सोडून सत्याच्या मार्गे लागावे. आणि अनात्म्यास विन्मुख होऊन आत्मस्वरूपास सन्मुख व्हावे अशी स्वच्छ प्रेरणा देणे हे विवेकशक्तीचे कार्य आहे.
अशा विवेकाने आचरण करणारा मनुष्य धर्माचरण करत असतो.

आहारनिद्रा भय मैथुनं च
सामान्यमेतत् पशुभिर्नराणाम्।
धर्मस्तु तेषामधिको विशेषो
धर्मेण हीनः पशुभिः समानः॥

या सद्धर्मामुळेच मानवी जीवनात विविध मूल्ये, आदर्श, चांगल्या वाईटाच्या कल्पना, नाना कला, विद्या शास्त्रे उदय पावतात. मात्र अशा सर्व ध्येयांपैकी, मूल्यांपैकी आदर्शांना विद्यांमध्ये ईश्वरदर्शन हेच सर्वश्रेष्ठ जीवनध्येय आहे. अर्थातच ईश्वरदर्शन हे कुठे बाहेर घडणार नाही तर ते अंतरंगामध्ये घडणारे आत्मदर्शनच आहे. आणि खरोखर

© www.madhaveeraghuveer.com

परमार्थ मार्गावरून वाटचाल करत असताना अत्यंत कल्याणमय मंगलमय, ज्ञानमय व आनंदमय असे हे ध्येय व मूल्य आहे. मनुष्याला अनेक ध्येय असू शकतात. परंतु आत्मदर्शन मात्र प्रथम क्रमांकावर आहे.

भोगवादी विचारवंत हे दृष्टीने दिसणाऱ्या या भौतिक जगाला संपूर्ण सत्य मानतात. तर संन्यासवादी विचारवंत जगाला मिथ्या मानतात. भोगवादामध्ये माणसाच्या देहाला अत्यंत महत्त्व आहे कारण या देहाच्या माध्यमातूनच सारे उपभोग घेता येतात. याच्या उलट संन्यासवादामध्ये देहाला किळसवाणा मानून त्याची भरमसाट निंदा केली आहे. मात्र श्री समर्थ या दोन्हींचा सुवर्णमध्य साधतात. देह हा जरी हाडामासाचा गोळा किंवा घाणीचे पोतडे असले तरी देखील त्याच्यासारखे विलक्षण दुसरे यंत्र नाही. या देहाचा व त्यातील शक्तीचा साधन म्हणून उपयोग केला तर त्याच्याच माध्यमातून परमध्येयापर्यंत पोहोचता येईल. या देहाला साध्य (Ultimate value) न मानता साधनमूल्य (Instrumental Value) जाणून त्याच्याकडून साधना उपासना करून घ्यायला हवी. जगात अनेक थोर पुरुषांनी या नरदेहाचा उत्तम उपयोग करून घेऊन आत्मसाक्षात्कार करून घेतला आहे.

आत्मा सर्वांत श्रेष्ठ आहे हे जरी खरे असले तरी तो एकटा काहीही करू शकत नाही. आत्म्याचे सामर्थ्य जरी फार मोठे असले तरी तो एक साधी टाचणी देखील उचलू शकत नाही. देहाच्या सहाय्याशिवाय त्याला या जगात स्वतःचे अस्तित्व व सामर्थ्य प्रकट करता येत नाही. देह व आत्मा यांचे साहचर्य म्हणजे प्रकृती पुरुषाची एकरूपता आहे.

Without him she can not exist &
Without her he can not manifest. ---

म्हणून साधकाने माणसाने देहाची किंमत बरोबर ओळखावी देहाला भोगी बनवू नये तसेच त्याला संन्यासीही करू नये. अति भोग घेतल्याने देह जर्जर होऊ शकतो. परंतु [illegible]

©www.madhaveeraghuveer.com

| APRIL 2015 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | | | |

देहाचा तिरस्कारही करू नये. त्याची घृणाही बाळगू नये. देहाची योग्य किंमत ओळखावी. देहधारणेला आवश्यक तितकेच भोग घ्यावे. त्याचा उत्तम वापर करून घ्यावा परंतु तरीही त्यात न अडकता, न गुंतता परमार्थासाठी त्याचा भरपूर उपयोग करून घ्यावा. आणि या सृष्टीतील असाराचा पसारा दूर सारून एकमेव अद्वितीय असणारे जे सार त्याचाच ध्यास घ्यावा.

द्वा सुपर्णा सयुजा सखाया:

या मुण्डकोपनिषदातील मंत्रामध्ये देखील दोन पक्ष्यांच्या दृष्टांतामधून जीव हाच शिव आहे. जीवाला शिवाविषयी आकर्षण वाटते आणि अखेरीस त्याला उमगते की मी कोणी वेगळा नाही. तर मी तोच आहे.
अहं ब्रह्मास्मि ।
आपल्यालाही त्या शिवापर्यंत, त्या परमेश्वरापर्यंत, त्या एकापर्यंत पोहोचायचे आहे. तदाकार, तद्रूप व्हायचे आहे. इतके की मी मीपणाने शिल्लक उरणारच नाही. मी तोच होऊन जाणार आहे.

(१३) त्रयोदशगुणी तांबूल - पान, सुपारी, कात, चुना, लवंग, वेलची, जायफळ, जायपत्री, कंकोळ, केशर, खोबरे, बदाम, कापूर
स्वाद — कडसर, सुवासिक, उष्ण, मधुर, खारट, तुरट, जंतुहारक, दुर्गंधिनाशक, पित्तशामक, कफशामक, मुखशोभा वाढवणारा, मुखशुद्धि करणारा आणि कामवासना प्रदीप्त करणारा

© www.madhaveeradhuveer.com

त्रयोदशाक्षरी मंत्र -- श्रीराम जयराम जय जय राम।
नव्हे मिथ्य ते बोलणे सत्य वाचा।
जपा अंतरी मंत्र तेराक्षराचा॥

राज्यशासनाचे तेरा प्रकार - मंत्रपुष्पांजली
साम्राज्य, भौज्य, स्वाराज्य, वैराज्य, पारमेष्ठ्य, राज्य
महाराज्य, आधिपत्यमय, समन्तपर्यायी,
जनराज्य, विप्रराज्य, समर्थराज्य, अधिराज्य

द्वादशाक्षरी मंत्र --
ॐ नमो भगवते वासुदेवाय।
पुंडलिक वरदा हारि विठ्ठल।

१२ आदित्य - सूर्यनमस्कार - समंत्रक

मित्र - जगमित्र
सूर्य - संचालक
खग - इंद्रियांद्दीपक
हिरण्यगर्भ - वीर्यबलवर्धक
आदित्य - सर्वाकर्षक
अर्क - आदरणीय

रवि - पूजनीय
भानु - तेजदायक
पूषन - पोषणकर्ता
मरीचि - रोगनाशक
सविता - सर्व उत्पादक
भास्कर - प्रकाशमान

प्रत्येक महिन्यानुसार आदित्य नावे --

| | | |
|---|---|---|
| १. धाता | २. मित्र | ३ अर्यमा |
| ४. शुक्र | ५. वरुण | ६. अंशु |
| ७. भग | ८. विवस्वान | ९. पूषा |
| १० सविता | ११. त्वष्टा | १२. विष्णु |

१२ ग्रह - सूर्यमाला - Galaxy -
रवि मंगळ बुध गुरु शुक्र शनि
राहु केतु चंद्र हर्षल नेपच्यून प्लुटो - -



© www.mahaveeraghuveer.com

| APRIL |  |  |  |  |  | 2015 |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
|  |  | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 |  |  |  |

बारा क्षार, बारा हवनद्रव्ये
चंदन, तीळ, धूप, साखर, अगरु, तगर
कापूर, केशर, नागरमोथा, पंचमेवा, जव, तांदूळ —

बारा बलुतेदार — जाती अनुसार
तेली, तांबोळी, साळी, माळी, जंगम, कळावंत
डौरी, ठाकार, घडशी, तराळ, सोनार, चौगुला — —

व्यवसायानुसार — सुतार, लोहार, महार, मांग
कुंभार, चांभार, परीट, न्हावी
भट, मुलाणा, गुरव, कोळी

१२ ज्योतिर्लिंग —
सौराष्ट्र — सोरटी सोमनाथ (गुजरात)
श्री शैल — हैद्राबादजवळ शैल पर्वतावर
महांकाळेश्वर — उज्जयिनी (म. प्र.)
ओंकार मांधाता — मध्य प्रदेश
परळी वैजनाथ — परभणीजवळ
भीमाशंकर — पुणे जिल्हा
काशी विश्वेश्वर — वाराणसी
त्र्यंबकेश्वर — नाशिकजवळ
सेतुबंध — रामेश्वर
औंढ्या नागनाथ — नागनाथ (मराठवाडा)
केदारेश्वर — हिमालय
घृष्णेश्वर — वेरूळजवळ

सौराष्ट्रे सोमनाथं च श्रीशैले मल्लिकार्जुनं

© www.madhaveeraghuveer.com

MAY 2015

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

MONDAY

WEEK 15

DAY 096-269

DATE 06.04.2015

३ मार्च २०२१

06

APRIL

सौराष्ट्रे सोमनाथं च श्रीशैले मल्लिकार्जुनम्।
उज्जयिन्यां महाकालमोङ्कारममलेश्वरम् ॥१॥

परल्यां वैजनाथं च डाकिन्यां भीमशङ्करम्।
सेतुबन्धे तु रामेशं नागेशं दारुकावने ॥२॥

वाराणस्यां तु विश्वेशं त्र्यम्बकं गौतमीतटे।
हिमालये तु केदारं घुश्मेशं च शिवालये ॥३॥

एतानि ज्योतिर्लिङ्गानि सायंप्रातः पठेन्नरः।
सप्तजन्मकृतं पापं स्मरणेन विनश्यति ॥४॥

परब्रह्म परमेश्वर सच्चिदानंद आहे. सत् म्हणजे शुद्ध अस्तित्व, कोरे करकरीत अस्तित्व! या असण्यातूनच होणे प्रकट होऊ शकते. जे नाही त्यातून काहीही निर्माण होणे शक्य नाही. या दृश्य नामरूपाचा पूर्ण विलय झाला तरीसुद्धा परमात्मवस्तु असणेपणाने कायम राहते. शुद्ध असणेपणाचा नुसत 'असणे' हा प्राण आहे. या असण्याचे असणेपण कशावरही अवलंबून नाही.

व्यवहारात आपण कितीतरी गोष्टींना 'आहे' हे क्रियापद लावतो. झाड आहे. वाघ आहे. सूर्य तारे आहेत तू आहेस मी आहे. यामध्ये असणेपण आहे परंतु ते अपूर्ण आहे कारण हे सतत टिकणार नाही. त्याला नाश आहे. ह्रास आहे बदल आहे. कारण ते निर्मित आहे.

आ हा न

सर्हन नअनरकअरे 03.03.2021

©www.madhaveeraghuveer.com

एकाचीच ही वीणा

अपूर्णांकाला जर छेद देत गेलो तर उरते ते केवळ एक) एकमेवाद्वितीय - परब्रह्म। या अणुच्या असणेपणाच्या पलीकडे राहते ते शुद्ध अस्तित्व। परंतु अशा शुद्ध कालातीत अस्तित्वाला काळाच्या चौकटीत राहून अनुभवता येत नाही. दृश्य नाहीपणाने लीन होते तेव्हा उरते ते शुद्ध अस्तित्व
या जगताचा आत्मा एकच आहे तो म्हणजे जगदात्मा।
या एकत्वाशी तेजाच्या आश्रयाखाली सर्व दृश्य सृष्टी वावरते.
सूर्याच्या रथाला एकच चाक आहे.

एकेश्वरवाद — एकदन्त, एकवाणी, एकवचनी, एकपत्नी
एकाक्षर मंत्र - ॐ ओमित्येकाक्षरं ब्रह्म
एको देवः सर्वभूतेषु गूढः - श्वेताश्वतर उपनिषद ६.११)
एक झाड दोन पक्षी - मुण्डकोपनिषद
एकात्मवाद — एकच आत्मा सर्वांमध्ये व्याप्त आहे.
एकाध्यायी गीता - १८ वा अध्याय
एकश्लोकी गीता - तस्मात्सर्वेषु कालेषु मामनुस्मर युध्य च।
मय्यर्पितमनोबुद्धिर्मामेवैष्यस्यसंशयम्॥

१ ला १ ने गुणले / भागले तरी १ च उत्तर येते.
आयुष्याच्या गणिताचे उत्तरही एकच यायला हवे.
अंततः गन्तव्य त्या एकापर्यंत पोहोचणे हाच मार्ग!
करी सुखसंवाद जो उगमाचा।
जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा॥

त्या एकाचीच ही सारी वीणा आहे.